# दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ.

दत्तात्रय बळवंत पारसनीस.

१९१२.

किंमत ६ आणे.

# दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ.

( ऐतिहासिक स्थलवर्णन.

दत्तात्रय बळवंत पारसनीस.

पुणें येथें

" ज्ञानप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

इसवी सन १९१२.

किंमत ६ आणे.

हें पुस्तक
पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत नटेश अप्पाजी
द्रवीड यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

हें पुस्तक

श्रीमंत

क्षत्रियकुलावतंस

# छत्रपति श्रीशाहूमहाराज

जी. सी. एस्. आय्., एल्. एल्. डी.,

संस्थान कोल्हापूर

स्वामींचे सेवेसी

प्रेमपूर्वक

अर्पण केलें असे.

पुस्तककर्ता.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ ह्या प्राचीन व इतिहासप्रसिद्ध शहराचें वर्णन मराठी भाषेमध्यें असणें अत्यंत अवश्य आहे. त्यांतून येत्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस हिंदुस्थानचे बादशाहा राजाधिराज सातवे एडवर्ड ह्यांच्या राज्याभिषेकसमारंभानिमित्त तेथें मोठा दरबार भरणार आहे, त्यामुळें ह्या शहराची ऐतिहासिक माहिती व तेथील स्थलवर्णन जाणण्याची पुष्कळ लोकांस इच्छा होईल. ती अंशतः पूर्ण करण्याच्या उद्देशानें हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे.

इ० स० १८९३ सालीं प्रस्तुत लेखकास दिल्ली पाहण्याचा सुप्रसंग आला होता. त्या वेळीं तेथील प्रेक्षणीय स्थळें पाहून त्यांची कांहीं माहिती लिहून ठेविली होती, तिचा ह्या पुस्तकांत मुख्यत्वेंकरून उपयोग केला आहे. त्याचप्रमाणें हंटर, कीन, मरे, हारकोर्टप्रभृति इंग्रज लेखकांनीं दिल्लीची जी माहिती आपल्या ग्रंथांत दिली आहे, तिचेंही साहाय्य घेतलें आहे; व माझे मित्र रा० रा० हरि नारायण आपटे ह्यांनीं आपल्या 'करमणूक' पत्रामध्यें दिल्लीसंबंधानें जी माहिती प्रसिद्ध केली होती, तिचाही त्यांच्या परवानगीनें उपयोग केला आहे. ह्याबद्दल ह्या सर्वांचे आभार येथें प्रदर्शित करणें अवश्य आहे.

हें पुस्तक अतिशय लवकर छापून देण्याचे कामीं 'ज्ञानप्रकाश' छापखान्याचे मालक रा० रा० हरि नारायण गोखले ह्यांनीं उत्कृष्ट मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहें.

पुणें,
ता. १३ डिसेंबर १९०२. } पुस्तककर्ता.

# विषयानुक्रम.


| भाग. | पृष्ठ. |
|---|---|
| १ प्राचीन व अर्वाचीन माहिती ... ... ... | १ |
| २ दिल्लीचा किल्ला व मुख्य राजवाडे ... ... ... | १९ |
| ३ दिल्लीची जुम्मा मशीद ... ... ... ... | ३५ |
| ४ इंद्रप्रस्थ ... ... ... ... ... | ४३ |
| ५ दिल्लीच्या सभोंवतालचीं स्थळें ... ... ... | ४९ |
| ६ हिंदु राजांचीं प्राचीन स्मारकें ... ... ... | ५९ |
| ७ कुतुबमिनार ... ... ... ... ... | ६४ |
| **परिशिष्ट (अ)** | |
| दिल्लीचे राजे ... ... ... ... | १ |
| **परिशिष्ट (ब)** | |
| दिल्लीचे बादशाहा ... ... ... ... | ५ |

# परिशिष्ट ( अ ).

## दिल्लीचे प्राचीन राजे.

| राजाचें नांव. | | | कारकीर्दीची मुदत. वर्षे | महिने | दिवस. |
|---|---|---|---|---|---|
| १ राजा युधिष्ठिर | ... | ... | ...३३ | ८ | २५ |
| २ राजा परिक्षिति | ... | ... | ...६० | १ | ० |
| ३ राजा जनमेजय | ... | ... | ...८४ | ५ | २७ |
| ४ राजा अश्वमेध | ... | ... | ...८२ | ८ | २४ |
| ५ राजा धर्म | ... | ... | ...८८ | २ | ८ |
| ६ राजा मनजित | ... | ... | ..८१ | ११ | २४ |
| ७ राजा जसरथ | ... | ... | ...७५ | ८ | ८ |
| ८ राजा दीपपाल | ... | ... | ...७५ | १० | १८ |
| ९ राजा उग्रसेन | ... | ... | ...७७ | ७ | २४ |
| १० राजा सूरसेन | ... | ... | ...७९ | ८ | ६ |
| ११ राजा भूपति | ... | ... | ...६१ | ५ | २ |
| १२ राजा रणजित | ... | ... | ...६५ | १० | २९ |
| १३ राजा वीरजित | ... | ... | ...६४ | ७ | ३ |
| १४ राजा भीमसेन | ... | ... | ...५५ | ८ | २९ |
| १५ राजा शुकमलदेव | ... | ... | ...६२ | ० | ३ |
| १६ राजा नरहरिदेव | ... | ... | ...६१ | १० | ४ |
| १७ राजा सुजितरथ | ... | ... | ...७२ | ११ | ३ |
| १८ राजा शूर | ... | ... | ...५८ | ० | ८ |
| १९ राजा पर्वत | ... | ... | ...५० | ८ | २१ |
| २० राजा मधुकरशाहा | ... | ... | ...५२ | ४ | ७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ राजा तोडरमल्ल | ... ... | ...४८ | १० | २९ |
| २२ राजा भीष्मदेव | ... ... | ...४७ | १० | २९ |
| २३ राजा नरहरिरथ | ... ... | ...४७ | ११ | ० |
| २४ राजा पूर्णमल | ... ... | ...४४ | ८ | १७ |
| २५ राजा सारंगदेव | ... ... | ...५६ | ० | ० |
| २६ राजा रूप | ... ... | ...५४ | १० | २ |
| २७ राजा अभिमन्य | ... ... | ...५१ | ११ | ८ |
| २८ राजा धनपाल | ... ... | ...४८ | ७ | ४ |
| २९ राजा भीम | ... ... | ...५८ | ५ | १५ |
| ३० राजा लखमीदेव | ... ... | ...४८ | ११ | २१ |
| | एकूण | १८५३ | ११ | |

यानंतर लखमीदेवाचा वीरसेन नामक प्रधान होता, त्यानें लखमीदवास मारून राज्य घेतलें. त्याचे वंशजः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ राजा वीरसेन | ... ... | ...१७ | ७ | ० |
| २ राजा सूरसेन | ... ... | ...३२ | ८ | |
| ३ राजा अनंतशाहा | ... ... | ...३७ | ८ | २३ |
| ४ राजा वीरशाहा | ... ... | ...३२ | १० | ७ |
| ५ राजा हरिरूप | ... ... | ...३५ | ९ | १७ |
| ६ राजा सुलोचन | ... ... | ...४३ | १ | ४ |
| ७ राजा पर्वत | ... ... | ...४२ | ९ | २४ |
| ८ राजा सुरपाळ | ... ... | ...३८ | २ | ५ |
| ९ राजा कृप | ... ... | ...३५ | ४ | १४ |
| १० राजा पृथ्वीपाल | ... ... | ...३१ | ८ | ११ |
| | एकूण | ३४७ | ९ | २६ |

यानंतर पृथ्वीपालाचा वजीर नरहरिनाथ होता; त्यानें पृथ्वीपालास मारून राज्य घेतलें. त्याचे वंशजः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ राजा नरहरिनाथ | ... ... | ...१५ | १० | ८ |
| २ राजा जेतासिंग | ... ... | ...२७ | ७ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ राजा बैरामगत | ... | ... ...२१ | २ | १३ |
| ४ राजा दीपपाल | ... | ... ...३५ | ४ | १ |
| ५ राजा महाबल | ... | ... ...३५ | ८ | ७ |
| ६ राजा अमृतपाल | ... | ... ...२८ | ८ | १० |
| ७ राजा जेतपाल | ... | ... ...२८ | ११ | १० |
| ८ राजा माणिकचंद | ... | ... ...१९ | ७ | २१ |
| ९ राजा कामचंद | ... | ... ...३२ | ५ | १० |
| १० राजा हरगौण | ... | ... ...१७ | ० | ११ |
| ११ राजा जीवनगौण | ... | ... ...२३ | ९ | २७ |
| १२ राजा रीम्यवंग | ... | ... ...१३ | ७ | २९ |
| १३ राजा त्रिविक्रम | ... | ... ...१० | २ | १० |
| १४ राजा भारमल | ... | ... ...२३ | ११ | २४ |
| १५ राजा भूपति | ... | ... ...१० | २ | २ |
| १६ राजा उदितकंठ | ... | ... ...३५ | २ | २० |
| | | एकूण ३८९ | ६ | ८ |

यानंतर उदितकंठाचा मंत्री होता त्यानें उदितकंठास मारून राज्य घेतलें. त्याचे वंशजः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ राजा मंत्री ( ? ) | ... | ... ...२४ | २ | ० |
| २ राजा चंद्रपाल | ... | ... ...१६ | ९ | २४ |
| ३ राजा सुंदरपाल | ... | ... ...२१ | ४ | १८ |
| ४ राजा देशपाल | ... | ... ...१९ | १ | ११ |
| ५ राजा रसिकपाल | ... | ... ...१८ | ० | १२ |
| ६ राजा अनंतपाल | ... | ... ...१८ | ० | २२ |
| ७ राजा रामपाल | ... | ... ...२७ | ११ | १२ |
| ८ राजा गोविंदपाल | ... | ... ...२८ | ७ | २७ |
| ९ राजा भीमपाल | ... | ... ...१६ | १० | १३ |
| १० राजा अमृतपाल | ... | ... ...१६ | ७ | १९ |
| ११ राजा हालपाल | ... | ... ...१२ | ५ | २७ |
| १२ राजा भूपपाल | ... | ... ...१४ | ९ | २२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ राजा हरिपाल | ... | ... | ...१३ | ८ | ४ |
| १४ राजा मदनपाल | ... | ... | ...१७ | ७ | १९ |
| १५ राजा कर्णपाल | ... | ... | ...१५ | २ | २५ |
| १६ राजा विक्रमपाल | ... | ... | ...१९ | ११ | १३ |
| | | | एकूण ३११ | ५ | ८ |

राजा विक्रमपाल ह्यास त्याचा वजीर सादतखान ह्यानें मारून राज्य बळकाविलें.

त्यानंतर दिल्ली येथें फार धामधूम झाली. नंतर सोळा पुरुषांनीं राज्य केलें. त्यांचीं नावें:—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ सादतखान | ... | ... | ...२४ | ० | ० |
| ( ह्या सादतखानास विक्रमाजितानें मारून राज्य घेतलें. ) | | | | | |
| २ विक्रमाजित | ... | ... | ...३३ | ० | ० |
| ३ मुल्कचंद | ... | ... | ... ० | २ | २ |
| ४ विक्रमचंद | ... | ... | ...१२ | ७ | १९ |
| ५ कुळचंद | ... | ... | ... ० | २ | २ |
| ६ रामचंद | ... | ... | ...१३ | ११ | ७ |
| ७ कल्याणचंद | ... | ... | ...१० | ५ | ४ |
| ८ श्रीचंद | ... | ... | ...१४ | ९ | १४ |
| ९ सूरचंद | ... | ... | ...२६ | ३ | २१ |
| १० भीमचंद | ... | ... | ...१६ | ३ | १ |
| ११ गोविंदचंद | ... | ... | ...२१ | ७ | १२ |
| १२ भावति | ... | ... | ... १ | ० | ० |
| १३ प्रतिमल | ... | ... | ... ७ | ५ | १९ |
| १४ गोविंद | ... | ... | ...२० | २ | १७ |
| १५ पूर्णप्रेम | ... | ... | ... ७ | ७ | १९ |
| १६ महानंद | ... | ... | ...१५ | ७ | १८ |
| | | | एकूण २२५ | ३ | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १ राजा जयसिंग ... ... | ...१८ | ५ | २१ |
| २ राजा मालुसेन ... ... | ...१२ | ४ | १२ |
| ३ राजा शूरसेन ... ... | ...१५ | ७ | १२ |
| ४ राजा गंधर्वसेन ... ... | ...११ | ३ | १३ |
| ५ राजा देवसन ... ... | ...१० | १ | ५ |
| ६ राजा भूसेन ... ... | ... ५ | १० | ५ |
| ७ राजा कल्याणसेन ... ... | ... ४ | ८ | २१ |
| ८ राजा हरिसेन ... ... | ...१२ | ० | २५ |
| ९ राजा ब्रह्मसेन ... ... | ... ८ | ११ | ५ |
| १० राजा नारायणसेन ... ... | ... ५ | २ | १८ |
| ११ राजा लखमीसेन ... ... | ...१६ | ७ | १५ |
| १२ राजा दामोदरसेन ... ... | ...११ | ५ | १६ |
| एकूण | १३२ | ८ | १८ |

यानंतर माधवसिंग उत्तरेहून आला, त्यानें दामोदरास मारून त्याचें राज्य घेतलें. त्याचे वंशजः—

| | | | |
|---|---|---|---|
| १ राजा माधवसिंग ... ... | ...१७ | १० | ६ |
| २ राजा दीलसेन ... ... | ...१४ | ५ | ० |
| ३ राजा राजसिंग ... ... | ...१२ | ३ | २४ |
| ४ राजा शेरसिंग ... ... | ...१० | ८ | ११ |
| ५ राजा वीरसिंग ... ... | ...२५ | ० | १५ |
| ६ राजा नृपसिंग ... ... | ... ८ | ० | ४ |
| एकूण | ८८ | ४ | ० |

यानंतर नृपसिंगास राजा धिरंधर यानें मारून राज्य घेतलें. त्याचे वंशजः—

| | | | |
|---|---|---|---|
| १ राजा धिरंधर ... ... | ...२२ | ७ | ० |
| २ राजा सेन ... ... | ...३५ | १० | ९ |
| ३ राजा लालजी ... ... | ...३५ | २ | ८ |
| ४ राजा मदानु ... ... | ...२० | ३ | ९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ राजा बीरनाथ | ... | ... | ...२८ | ५ | २५ |
| ६ राजा जीवन | ... | ... | ...२२ | २ | २५ |
| ७ राजा उदयासिंग | ... | ... | ...२७ | ४ | २९ |
| ८ राजा कुलानंद | ... | ... | ...२२ | ३ | ८ |
| ९ राजा राजपाल | ... | ... | ...१३ | २ | ६ |
| | | | एकूण २२७ | ५ | २९ |

यानंतर पृथ्वीपाल पूर्वेहून आला त्यानें राजपालास मारून त्याचें राज्य घेतलें. त्याचे वंशज:—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ राजा पृथ्वीपाल | ... | ... | ...१४ | ७ | १७ |
| २ राजा उजनपाल | ... | ... | ...१२ | ७ | १३ |
| ३ राजा उदयपाल | ... | ... | ...१३ | ७ | १४ |
| ४ राजा चैनपाल | ... | ... | ...१९ | २ | १९ |
| ५ राजा पिठोरा ऊर्फ पृथ्वीराज चव्हाण | | | ...३६ | ४ | २५ |
| | | | एकूण ६५ | ४ | २८ |

# परिशिष्ट ( ब ).

## दिल्लीचे बादशाहा.

### घोरी घराणें.

| | | |
|---|---|---|
| १ शाहाबुद्दीन ऊर्फ महमद ... ... | इ. स. | ११८६–१२०६ |

### गुलाम घराणें.

| | | |
|---|---|---|
| २ कुतुबुद्दीन ... ... ... | ” | १२०६–१२१० |
| ३ शमसुद्दीन अल्तमश ... ... | ” | १२१०–१२३५ |
| ४ सुलतान रेझिया ... ... | ” | १२३६–१२३९ |
| ५ मोहझुद्दीन बहिराम ... ... | ” | १२३९–१२४१ |
| ६ अल्लाउद्दीन मसाऊद ... ... | ” | १२४१–१२४३ |
| ७ नासिरुद्दीन महमूद ... ... | ” | १२४३–१२६६ |
| ८ बल्बन ... ... | ” | १२६६–१२८६ |
| ९ कैकूबाद ... ... | ” | १२८६–१२८८ |

### खिलजी घराणें.

| | | |
|---|---|---|
| १० जलालउद्दीन ... ... | ” | १२८९–१२९५ |
| ११ अल्लाउद्दीन ... ... ... | ” | १२९६–१३१६ |
| १२ मुबारिक ... ... ... | ” | १३१६–१३२० |

### तघलख घराणें.

| | | |
|---|---|---|
| १३ ग्यासुद्दीन ... ... ... | ” | १३२०–१३२६ |
| १४ महमद ... ... ... | ” | १३२६–१३५१ |
| १५ फिरोजशाहा ... ... ... | ” | १३५१–१३८८ |
| १६ ग्यासुद्दीन (दुसरा) ... ... | ” | १३८८–१३८९ |
| १७ अबूबकर ... ... ... | ” | १३८९–१३९० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ महमद | ... | ... | ... | इ. स. | १३९०-१३९४ |
| १९ हुमायून | ... | ... | ... | ” | १३९४- |
| २० महमूद | ... | ... | ... | ” | १३९४-१४१४ |

### सय्यद घराणें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ खिजरखान (तैमूरलंगाचा कारभारी)... | | | | ” | १४१४-१४२७ |
| २२ मुबारिक | ... | ... | ... | ” | १४२७-१४३५ |
| २३ महमद | ... | ... | ... | ” | १४३५-१४४५ |
| २४ अल्लाउद्दीन | ... | ... | ... | ” | १४४५-१४५० |

### लोदी घराणें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५ बहलोलखान | ... | ... | ... | ” | १४५०-१४८८ |
| २६ शिकंदर | ... | ... | ... | ” | १४८८-१५१७ |
| २७ इब्राहिमखान | ... | ... | ... | ” | १५१७-१५२५ |

### मोंगल घराणें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ बाबर | ... | ... | ... | ” | १५२६-१५३० |
| २९ हुमायून | ... | ... | ... | ” | १५३०-१५४० |
| | | | | पुनः | १५५५-१५५६ |
| ३० अकबर | ... | ... | ... | ” | १५५६-१६०५ |
| ३१ जहांगीर | ... | ... | ... | ” | १६०५-१६२७ |
| ३२ शहाजहान | ... | ... | ... | ” | १६२७-१६५८ |
| ३३ औरंगजेब | ... | ... | ... | ” | १६५८-१७०७ |
| ३४ बहादूरशाहा | ... | ... | ... | ” | १७०७-१७१२ |
| ३५ जहांदरशाहा | ... | ... | ... | ” | १७१२-१७१३ |
| ३६ फरुखशीर | ... | ... | ... | ” | १७१३-१७१९ |
| ३७ महमदशाहा | ... | ... | ... | ” | १७१९-१७४८ |
| ३८ अहमदशाहा | ... | ... | ... | ” | १७४८-१७५४ |
| ३९ आलमगीर ( दुसरा ) | | ... | ... | ” | १७५४-१७५९ |
| ४० शहाअलम | ... | ... | ... | ” | १७५९-१८०६ |
| ४१ अकबरशाहा ( दुसरा ) | | ... | ... | ” | १८०६-१८३७ |
| ४२ बहादूरशाहा | ... | ... | ... | ” | १८३७-१८५७ |

# दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ.

## भाग १ ला.

### प्राचीन व अर्वाचीन माहिती.

दिल्ली शहर हें हिंदुस्थानांतच काय, पण सर्व जगामध्यें जीं इतिहास-प्रसिद्ध नगरें आहेत, त्यांतील प्रमुखांपैकीं एक असून, राज्यवैभव, कला-कौशल्य, विद्यावृद्धि इत्यादि गोष्टींमध्यें तें एके वेळीं अग्रेसर होतें. त्याचप्रमाणें अनेक वेळां राज्यक्रांति घडून येऊन कालचक्राच्या विचित्र गतीचा प्रभाव येथें जितका दृष्टिगोचर झाला आहे, तितका अन्यत्र क्वचितच पहावयास सांपडेल. बाबिलोन अथवा बालबेक, पालमिरा अथवा पर्सिपालिस, अथेन्स, कार्थेज, अथवा रोम, हीं शहरें इतिहासांतील अनंत राज्यकारस्थानें व घडामोडी ह्यांचीं अग्रस्थानें किंवा मानवी नाटकाच्या प्रख्यात रंगशाळा होत. तथापि त्या सर्वांमध्यें दिल्लीची कीर्ति अद्भुत आहे. बाबिलोन येथील चमत्कृतिप्रचुर तरंगणाऱ्या पुष्पवाटिका, सालोमननगरीचें चित्ताकर्षक सौंदर्य, पर्सिपालिस येथील अपार प्राचीन वैभव आणि कार्थेज नगरीचें लोकोत्तर ऐश्वर्य, हीं सर्व आजमितीस नामशेष झालीं आहेत. रोमक-पत्तन येथील साम्राज्यवैभव व्यक्त करणारीं प्राचीन शेष चिन्हें लक्ष्यांत घेतलीं नाहींत, तर जगामध्यें प्राचीन व अर्वाचीन इतिहास मूर्तिमंत दाखविणारें नगर फक्त दिल्ली हें एक आहे, असें मोठ्या गर्वानें म्हणावें लागेल. तीन हजार वर्षेपर्यंत कालचक्राच्या अनंत लीला पाहून, पुनः सर्वांचीं अंतःकरणें वेधून टाकण्याचें सामर्थ्य ह्या नगरामध्यें खरोखर फार विलक्षण आहे. पांडव, कौरव, अशोक, जैन, विक्रम, चव्हाण, पठाण, मोंगल, मराठे आदिकरून सर्वांस सार्वभौमत्व किंवा चक्रवर्तित्व प्राप्त करून

देण्याचा मान ह्या शहरानें आपणाकडे घेतला असून, त्या सर्वांना त्यानें आपल्या पदीं लीन करून सोडिलें होतें. एवढेंच नव्हे तर सर्व पृथ्वीवर आपली राजसत्ता गाजविणारे जे आंग्लप्रभु त्यांस देखील ह्या नगरानें मोहून टाकिलें आहे. पौराणिक काळांतील इंद्रप्रस्थ मुसलमानी अमदानी-मध्यें जितकें महत्त्वाचें होतें, तितकेंच तें मराठी अमदानीमध्यें महत्वाचें होतें; व ब्रिटिश अमदानीमध्येंही तें तसेंच महत्वाचें आहे. अशा ठिकाणीं पांडवांचा राजसूय यज्ञ, मयासुराची अपूर्व मयसभा, शहाजहान बाद-शहाच्या बहुमूल्य व रत्नजडित मयूरसिंहासनापुढील आमदरबार, महादजी शिंद्याचा वकीलमुतालकीचा समारंभ, चक्रवर्तिनी देवी व्हिक्टोरिया हिच्या 'केसर-इ-हिंद' पदाचा जंगी दरबार, किंवा हिंदुस्थानचे व्हाइस-रॉय लॉर्ड कर्झन ह्यांच्या हस्तें झालेला राजाधिराज. सातवे एडवर्ड बादशहा ह्यांच्या राज्यारोहणाचा दरबार, ह्यांसारखे दुर्लभ व प्रेक्षणीय महोत्सव येथेंच व्हावेत, ह्यांत आश्चर्य नाहीं. अशा विशिष्ट स्थलाचें वर्णन कोणास नको आहे ?

दिल्ली शहराचीं इंद्रप्रस्थ व हस्तिनापूर अशीं दोन प्राचीन नांवें व शहा-जहानाबाद हें अर्वाचीन नांव हीं प्रसिद्ध आहेत. स्थूलमानानें दिल्ली ह्या नांवाच्या ऐवजीं वरील नांवें जुन्या ग्रंथांत व कागदपत्रांत योजिलीं जातात. परंतु सांप्रत हीं ठिकाणें भिन्न भिन्न असून, त्यांपैकीं कांहींचा 'नवी दिल्ली' व 'जुनी दिल्ली' ह्या दिल्लीच्या दोन भागांत समावेश होतो. इंद्रप्रस्थ हें स्थान 'पुराणा किल्ला' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. हस्तिनापूर हें ठिकाण दिल्लीपासून वेगळें आहे. आणि शहाजहानाबाद हें नव्या दिल्लीमध्यें अंतर्भूत होतें. दिल्ली हें पूर्वी विस्तीर्ण नगर असून त्याचा परिघ ४५ मैल होता असें म्हणतात. या शहरास इंद्रप्रस्थ हें नांव फार प्राचीन काळापासून मिळा-लेलें आहे. जनरल कॅनिंगहॅम ह्यांच्या मताप्रमाणें इसवी सनापूर्वी १५ व्या शतकामध्यें ही नगरी उत्तरेकडून येणाऱ्या आर्य लोकांनीं यमुनानदीचा सुंदर प्रवाह पाहून तिच्या कांठीं वसविलेली असावी. महाभारत ग्रंथा-वरून तिची स्थापना युधिष्ठिर म्हणजे धर्मराज ह्यांनीं केली असें दिसून येतें. त्यावरून तिचा काल ७००० वर्षांपूर्वी असावा, असें अनुमान होतें. भारती युद्धाचा काल अर्वाचीन ज्योतिषशास्त्रज्ञांच्या मतें ७११४ वर्षें हा आहे. त्याअर्थी या कालापूर्वी ही नगरी प्रस्थापित झाली असावी हें

उघड आहे. इंद्रप्रस्थ नगरी ज्या वेळीं वसविण्यांत आली, त्या वेळीं यमुनेचा प्रवाह सांप्रतच्या प्रवाहापेक्षां वेगळा होता, असें कित्येकांचें मत आहे. महाभारतापूर्वींच्या देशस्थितीचा विचार करण्यास चांगलेसें साधन नसल्यामुळें इंद्रप्रस्थ नगरी पांडवांच्या कालापासून अस्तित्वांत आली, असें मानण्यास हरकत नाहीं.

इंद्रप्रस्थाचें राज्य पांडवांकडे तीस पिढ्यांपर्यंत म्हणजे सुमारें १८६४ वर्षें होतें.* नंतर त्यांचा तिसाव्या पिढीचा राजा क्षेमक अथवा लक्ष्मीदेव ह्याचा प्रधान वीरसेन अथवा विसर्व ह्यानें तें राज्य बळकाविलें. त्यानें व त्याच्या वंशजांनीं मिळून ३४७ वर्षें राज्य केलें. त्यानंतर त्याच्या पिढींतील शेवटचा राजा पृथ्वीपाल ह्याच्या नरहरिनाथ नामक दिवाणानें तें राज्य घेतलें. ह्या राजास गौतम राजे म्हणतात. ह्यांच्याकडे ३८९ वर्षें राज्य होतें. नंतर मयूरांचें राज्य झालें. ह्या वंशांतील शेवटच्या राजास शकादित्यानें मारून राज्य घेतलें. पुढें रजपूत राजे झाले. ह्याप्रमाणें बरींच वर्षें इंद्रप्रस्थ हें हिंदुराजांकडे होतें. नंतर अनुक्रमें पठाण, मोंगल, मराठे आणि अखेर इंग्रज ह्यांच्याकडे येथील राजसत्ता आली. इंद्रप्रस्थाचें दिल्ली अथवा दिल्लीपूर हें नांव इ० स० पूर्वींच्या एका शतकामध्यें अस्तित्वांत आलें असावें, असें जनरल कॅनिंगहॅम ह्यांचें मत आहे. त्यांनीं मुसलमानी इतिहासकार फेरिस्ता ह्याच्या ग्रंथाधारें असें प्रतिपादिलें आहे कीं, दिल्ली हें शहर पूर्वीं, सांप्रतच्या शहरापासून पांच मैल अंतरावर यमुनेच्या तीरीं असून, त्याचें ' दिल्ली ' हें नांव दिलू नामक मयूरवंशीय राजापासून उत्पन्न झालें. परंतु ह्यापेक्षां अधिक विश्वसनीय माहिती इसवी सनाच्या तिसऱ्या किंवा चवथ्या शतकापासून मिळूं शकते. दिल्ली येथें जो एक प्रख्यात लोहस्तंभ आहे त्यावर एक संस्कृत लेख आहे. त्यांतील मजकुरावरून हा लोहस्तंभ धाव नामक राजानें आपला प्रतापमहिमा लोकविश्रुत करण्याकरितां उभारिला असावा असें दिसून येतें. ह्या लोहस्तंभाचा काल इ० स० ३१९ हा असावा, असें जनरल कॅनिंगहॅम ह्यांचें मत आहे. ह्या समयास कनोज येथील गुप्त नामक

---

* दिल्लीच्या बादशाहांची संपूर्ण यादी पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्टरूपानें जोडिली आहे. तिजमध्यें पांडवांपासून मोंगल बादशाहीच्या अखेरपर्यंत सर्व राजांचीं नांवें व त्यांच्या कारकीर्दींचा काल हीं दिलीं आहेत.

राजघराणें सत्ताहीन झालें, त्याअर्थी त्या समयीं ह्या राजानें आपलें पराक्रम-तेज व्यक्त करून, विजयानंदानें हा लोहस्तंभ उभारला असावा असें त्यांनीं अनुमान काढिलें आहे. परंतु या लोहस्तंभावरील संस्कृत लेखाचा आधारही रद्द पडून परंपरेनें चालत आलेल्या दंतकथांनीं आठव्या शतकांतील तुंवर अथवा तोमर घराण्याचा प्रस्थापक राजा बिल्हणदेव ऊर्फ अनंगपाळ ह्यास ह्या लोहस्तंभाचें जनकत्व दिलें आहे. दिल्ली येथें ह्यासंबंधानें वेगवेगळ्या दंतकथा प्रचलित आहेत, त्यांत अशी एक दंतकथा आहे कीं, " एका ब्राह्मणानें एके दिवशीं राजास येऊन सांगितलें कीं, आपण हा स्तंभ स्थापन केला, याचें जमिनींतलें टोंक शेषाच्या मस्तकाला जाऊन लागलें आहे, व आपला स्तंभ अगदीं भक्कम बसला आहे; त्याअर्थी आपलें राज्यही तितकेंच भक्कम व्हाणार. जोंपर्यंत तो स्तंभ तेथें राहील तोंपर्यंत आपलें राज्य अबाधित राहील, आणि आपल्या वंशांत राहील. " राजास ब्राह्मणाचें बोलणें खरें वाटून त्याची प्रचीति घेण्याकरितां त्यानें तो स्तंभ पुनः उपटून काढून पहाण्यास हुकूम दिला. तो स्तंभ उपटून काढून पहा-तात तों त्याच्या टोंकाशीं खरोखरच रक्त लागलेलें दिसलें. कारण स्तंभ शेषाच्या मस्तकांत शिरलेला होता ! तें पाहून राजाची खात्री झाली; परंतु तो स्तंभ पुनः पुरूं जातां, तो पहिल्याप्रमाणें भक्कम बसेना, ढिला बसला. म्हणून ज्या ठिकाणची एवढी लोखंडाची लाट ' ढिली ' बसली, त्या गांवास ' ढिल्ली ' ( दिल्ली ) असें नांव प्राप्त झालें. म्हणून,

" खिली तो ढिल्ली भई । तोमर भया मतहीन "

असा दोहरा लोकांच्या तोंडीं आहे. ह्याशिवाय आणखीही पुष्कळ दंत-कथा प्रचलित आहेत.

टॉलेमी ह्याच्या ग्रंथांत ' दैदल ' आणि ' इंद्रवर ' अशीं दोन जवळ जवळ असलेलीं जीं शहरें दिलीं आहेत, त्यांच्याशीं ' दिल्ली ' व 'इंद्रप्रस्थ' ह्या दोन नांवांचें बरेंच साम्य आहे. त्याअर्थी हीं पुष्कळ जुनीं असावींत हें उघड आहे. कित्येक प्राक्कालीन इतिहाससंशोधकांच्या मतें ' दिल्ली ' हें नांव दिलू अथवा धिलू राजापासूनच निर्माण झालें असून, विक्रमादित्य राजाच्या शकापूर्वीं म्हणजे इसवी सनापूर्वीं ५७ वे वर्षाच्या सुमारास तें प्रचारांत आलें असावें. विक्रमराजासंबंधानें हिंदी भाषेंत जीं कवित्तें आहेत त्यांत " दिल्लीपत कहयो " म्हणजे विक्रमास दिल्लीपति म्हणूं लागले,

असा उल्लेख आहे. तात्पर्य, दिल्ली हें नांव फार जुनें आहे एवढें मानण्यास हरकत नाहीं.

दिल्ली येथील राजांची विश्वसनीय माहिती इ० स० ७३६ वर्षापासून लागते. अनंगपाळ हा तुंवर वंशाचा मूळ संस्थापक होय. ह्याचा राज्याभिषेक सन इ. स. ७३६ हा आहे. ह्यानें प्रथमतः दिल्ली येथें राज्य केलें. नंतर त्याचे वंशज कनोज येथें गेले. त्यांना तेथून राठोडांचा मूळपुरुष चंद्रदेव ह्यानें हांकून दिलें. नंतर दुसरा अनंगपाळ हा दिल्लीस आला, व त्यानें तेथें आपली राजधानी केली. त्यानें तेथें नवीन शहर वसविलें, व त्यासभोंवतीं चांगली तटबंदी केली. कुतुबमिनारच्या आसमंतात् भागीं जुन्या इमारतीच्या ज्या खुणा दिसतात, त्यावरून ती अनंगपाळ राजाची राजधानी असावी असें मानितात. अनंगपाळानें दिल्ली येथें राज्य केल्याचा सन वर निर्दिष्ट केलेल्या प्राचीन लोहस्तंभावर "संवत् दिहली ११०९ अंगपाळ वही" असा अक्षरांत दिलेला आहे. ह्यावरून इ. स. १०५२ मध्यें अनंगपाळ राजा दिल्लीचें राज्य करीत होता हें सिद्ध होतें. ह्यानंतर एक शतकानें तुंवर घराण्याचा शेवटचा राजा—म्हणजे तिसरा अनंगपाळ—येथें राज्य करीत असतां, अजमीरचा चव्हाण राजा विशाळदेव ह्यानें दिल्ली जिंकून घेतली. ह्या विजयी राजानें अनंगपाळाचा सर्वस्वी नाश न करतां, त्यास लहानसें राज्य देऊन आपला मांडलिक केलें, आणि त्याच्याशीं शरीरसंबंध केला. ह्या दोन घराण्यांच्या शरीरसंबंधाचें फळ राजा पृथ्वीराज चव्हाण हा होय. पृथ्वीराज हा उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु स्वातंत्र्याचा अभिमान बाळगणारा व त्याच्या संरक्षणार्थ लढणारा शेवटचा नृपति होय. ह्यानें दिल्ली येथें ' राय पिठोरा ' नामक किल्ला बांधिला, व अनंगपाळाच्यतटासभोंवतीं पुनः दुसरा भरभक्कम तट बांधिला, आणि दिल्ली शहर परशत्रूस जिंकून घेतां येऊं नये असा बंदोबस्त केला. परंतु हिंदुस्वातंत्र्यावर काळाची वक्रदृष्टि होऊन पृथ्वीराजाचा अजिंक्य किल्ला व बळकट तटबंदी जागच्याजागींच राहून तें पृथ्वीराजाच्या कारकीर्दीतच रसातळास गेलें. इ० स० ११९१ मध्यें शहाबुद्दीन अथवा महमद घोरी ह्यानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. त्याशीं पृथ्वीराजानें मोठ्या शौर्यानें टक्कर दिली, आणि त्याचा ठाणेश्वरच्या लढाईंत पराभव करून त्याच्या सैन्याचा ४० मैलपर्यंत पाठलाग केला, व त्यास " दे माय, धरणी ठाय " असें करून सोडिलें.

परंतु दोन वर्षांनीं पुनः हें मुसलमानी परचक्र आलें, व त्यानें पृथ्वीराजास जिंकून व त्याचा वध करून, दिल्लीचें साम्राज्यपद आपल्या ताब्यांत घेतलें.

महमद घोरीचा सेनापति कुतुबुद्दीन ह्यानें दिल्ली जिंकून घेतल्यानंतर तेथें यवनी सत्तेचा हिरवा ध्वज उभारिला, व इ० स० १२०६ मध्यें महमद घोरी मृत्यु पावतांच, आपण स्वतःच दिल्लीच्या तख्ताचा अधिपति होऊन इतिहासांत गुलाम घराण्याचा प्रस्थापक म्हणून कीर्ति मिळविली. सांप्रत जुनी दिल्ली म्हणून जो गांवाचा भाग आहे, तेथें या बादशाहाची राजधानी होती; व तिचीं शेष चिन्हें अद्यापि कायम आहेत. तेथें कुतुबुद्दिनाची जी मशीद आहे, तिच्या प्रवेशद्वारावर जो शिलालेख आहे, त्यावरून इ० स० ११९३ मध्यें ह्या विजयशाली बादशाहानें दिल्ली येथें स्वधर्म स्थापन करण्याच्या उद्देशानें ही मशीद उभारिली असें दिसून येतें. ह्या मशिदीचें सर्व साहित्य हिंदूंचीं देवालयें जमीनदोस्त करून आणिलें होतें. असो. ह्याच बादशहानें आपला प्रतापसूर्य यावच्चंद्रदिवाकरौ लोकांच्या नेत्रांपुढें चमकत ठेवण्याच्या उद्देशानें, आपल्या नांवानें ' कुतुबमिनार ' नामक एक प्रचंड विजयस्तंभ उभारिला. ही इमारत इतकी अपूर्व व जगद्विख्यात आहे कीं, ती सर्व पृथ्वीवरील लोकोत्तर चमत्कारांपैकीं एक चमत्कार होऊन राहिली आहे. असो.

दिल्लीचें सार्वभौमत्व गुलाम घराण्याकडे असतांना त्या घराण्यामध्यें एक राजकारणी स्त्री निर्माण झाली, आणि तिनें दिल्लीचे इतिहासांत पहिली राज्यकर्त्री स्त्री असा लौकिक मिळविला. हिचें नांव रेझिया बेगम असें होतें. ज्याप्रमाणें हंगेरियन देशभक्तांनीं यूरोपमधील प्रसिद्ध राज्ञी मेरिया थेरिसा हिचा जयजयकार केला, त्याप्रमाणें ह्या स्त्रीचा तिच्या प्रजेनें जयजयकार करून तिला ' सुलतान ' असें पुरुषवाचक पद दिलें. ह्या गुलाम घराण्याकडे दिल्लीचें राज्य इ. स. १२९० पर्यंत होतें. नंतर जलालुद्दीन खिलजी ह्यानें आपली राज्यसत्ता दिल्लीवर प्रस्थापित केली. त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी त्याचे मागून गादीवर बसला. त्याचे कारकीर्दींत दोन वेळां मध्यएशियांतील मोंगल लोकांनीं दिल्लीवर स्वाऱ्या केल्या, परंतु त्यांचा पराभव होऊन त्यांना परत जावें लागलें.

इ. स. १३२१ मध्यें दिल्ली येथें राज्यक्रांति होऊन तघलख घराण्याकडे तेथील राज्यसूत्रें आलीं. ह्या घराण्याचा मूळपुरुष ग्यासुद्दीन तघलख ह्यानें

दिल्लीपासून पूर्वेस ४ मैल अंतरावर उच्चस्थानीं तघलखाबाद नांवाची स्वतंत्र राजधानी उभारली. ह्या तघलखनगरीचा कोट, व तिच्यांतील उध्वस्त झालेले रस्ते अद्यापि दृग्गोचर होतात. परंतु तेथें सांप्रत लोकवस्ती मुळींच नाहीं. ग्यासुद्दीन हा इ. स. १३२५ मध्यें मृत्यु पावला व त्याच्या मागून महमद तघलख हा गादीवर बसला. ह्यानें आपली राजधानी दिल्लीहून काढून देवगीर ऊर्फ दौलताबाद येथें नेण्याचा तीन वेळां प्रयत्न केला. इब्न बुटा म्हणून जो तुर्क प्रवासी इ. स. १३४१ ह्या वर्षी ह्या बादशहाच्या दरबारीं आला होता, त्यानें त्याच्या राजधानीचें अगदीं हुबेहूब वर्णन दिलें आहे. त्यांत त्यानें ह्या शहराची निर्जन स्थिति, व तेथील भव्य इमारती आणि इतर शिल्पकलेचीं सुंदर कामें ह्यांचें चित्र चांगलें उमटाविलें आहे. फिरोजशाहा तघलख ह्यानें पुनः एकदां दिल्लीची राजधानी बदलून, फिरोजाबाद नामक नवीन शहर बसविलें. हें शहर सांप्रतच्या हुमायून बादशाहाच्या थडग्याजवळ असून तेथील राजवाड्यांचा मागमूस अद्यापि दृष्टीस पडतो. ह्या वाड्याच्या दक्षिणदरवाज्याजवळ चक्रवर्ती अशोक राजाचा इ. स. पूर्वी तिसऱ्या शतकांतला विजयस्तंभ दृष्टीस पडतो. हा स्तंभ ४२ फूट उंच असून त्यास लोक ‘ फिरोजशाहीचा लाट ’ असें म्हणतात. ह्यावर पाली भाषेमध्यें अशोक राजाचा शिलालेख आहे. हा स्तंभ फिरोजशाहानें यमुनेच्या तीरावरील खिजराबाद नामक ठिकाणाहून येथें आणून उभारिला. ह्या विजयस्तंभावरून फिरोजशाहाच्या राजधानीचें स्थल नेमकें समजून येतें.

इ. स. १३९८मध्यें महमद तघलखाच्या कारकीर्दींत तैमूरलंगाची स्वारी दिल्लीवर आली. त्या वेळीं महमद तघलख गुजराथमध्यें पळून गेला व त्याच्या सैन्याचा पराभव होऊन दिल्ली शहर द्रव्याभिलाषी तैमूरलंगाच्या भयंकर जबड्यांत सांपडलें. त्या वेळीं पंधरा दिवसपर्यंत एकसारखी लूट व कत्तल चालली होती. नंतर मग ह्या अधाशी मानवी राक्षसाची तृषा शांत झाली; आणि त्यानें द्रव्याच्या राशी व गुलाम लोकांचे थवे आपल्याबरोबर घेऊन स्वदेशास गमन केलें. तैमूरलंग दिल्लीहून गेल्यानंतर दोन महिनेपर्यंत तेथें राज्यसत्तेचा मागमूसही राहिला नव्हता. सर्व नगर उध्वस्त होऊन बेचिराक झालें होतें. महमद तघलखानें पुनः तेथें येऊन आपल्या राजधानीचें गतवैभव परत आणण्याचा थोडासा प्रयत्न केला. परंतु इ. स. १४१२ मध्यें तो मृत्यु पावला, व त्याचें तघलख घराणें रसातळास गेलें. पुढें अल्पकालपर्यंत म्हणजे

इ. स. १४५४ पर्यंत सय्यद घराण्यानें तेथें राज्य केलें. पुढें लोदी घराणें आलें. त्यानें दिल्लीची राजधानी मोडून टाकून, आग्रा हें आपल्या राजधानीचें व रहाण्याचें ठिकाण केलें. ह्या घराण्यांतला शेवटचा बादशाहा इब्राहिम लोदी ह्यावर इ. स. १५२६ मध्यें तैमूरलंगाचा सहावा वंशज बाबर ह्यानें स्वारी करून पानिपत येथें घनघोर रणसंग्राम केला, व त्याच्या ताब्यांतून दिल्ली जिंकून घेऊन, तेथें मोंगल बादशाहीचा पाया घातला. ही बादशाही इ. स. १५२६ पासून अखेरपर्यंत कायम होती.

बाबर बादशाहा ह्यानें दिल्ली जिंकून तेथें आपलें राज्य स्थापन केलें, तथापि त्यानें आपली राजधानी तेथें केली नाहीं. तो नेहमीं आग्रा येथें राहत असे. तेथेंच त्याचा इ. स. १५३० मध्यें अंत झाला. हा बादशहा फार विद्वान् असून उत्तम कवि होता. ह्यानें आपलें स्वतःचें मनोरंजक आत्मचरित्र तुर्की भाषेमध्यें लिहून ठेविलें आहे. मोंगल बादशाही लयास गेली, तथापि त्याचा ग्रंथ अद्यापि कायम असून त्याची कीर्ति गात आहे. मि० विक्रगीज नामक एका आंग्ल गृहस्थानें ह्या ग्रंथासंबंधानें असें लिहिलें आहे कीं,* "बाबराचें आत्मचरित्र हा ग्रंथ सर्व काळीं ज्याचें महत्व अबाधित राहतें, अशा अमूल्य ग्रंथांपैकीं एक आहे, आणि त्याची योग्यता सेंट आगस्टिन आणि रूसो ह्यांचीं आत्मचरित्रें, किंवा गिबन आणि न्यूटन ह्यांचे चरित्रलेख यांच्या बरोबरीची आहे. एशियाखंडामध्यें असा ग्रंथ हा एवढाच होय." अर्थात् "असा ग्रंथ, बाबराच्या घराण्याची राजसत्ता आणि वैभव हीं लयास गेलीं, तरी काळाच्या वक्रदृष्टीस न जुमानतां, उलट, मोठ्या गर्वानें, 'मी पहा जसाच्या तसाच कायम आहें,' म्हणून काळाचाच उपहास करीत आहे. †" असे रसिक आंग्ल विद्वानांनीं मोठ्या कौतुकानें उद्गार काढावेत, ह्यांत आश्चर्य तें काय ?

---

* "His autobiography is one of those priceless records which are for all time, and is fit to rank with the confessions of St. Augustine and Rousseau, and the memoirs of Gibbon and Newton. In Asia it stands almost alone."—*Calcutta Review*, 1897.

† "The power and pomp of Babar's dynasty are gone; the record of his life—the *Littera Scripta* that mocks at time—remains unaltered and imperishable."—*S. Lane-Poole.*

बाबर मृत्यु पावल्यानंतर त्याचा पुत्र हुमायून हा मोंगलबादशाहीचा अधिपति झाला. ह्यानें दिल्ली येथें पुनः राजधानी केली, आणि इंद्रप्रस्थाच्या प्राचीन भूमीवर एक किल्ला बांधिला. त्यास अद्यापि 'पुराणा किल्ला' असें नांव चालत आहे. इ० स० १५४० मध्यें हुमायून बादशहास अफगाण प्रधान शीरशाहा ह्यानें पळवून लावून त्याची दिल्लीची गादी स्वतः चालविली. त्यानें दिल्लीसभोंवतीं पुनः मोठा तट बांधिला. ह्या तटाचें 'लाल दरवाजा' नामक एक चिन्ह अद्यापि शेष राहिलें आहे. शीरशाहा मृत्यु पावल्यानंतर त्याचा पुत्र सालिम हा गादीवर बसला. त्यानें सालिमगड नांवाचा किल्ला बांधिला आहे, त्यावरून त्याचें नांव चिरकालिक झालें आहे. इ० स० १५५५ मध्यें हुमायून बादशाहानें पुनः दिल्लीवर स्वारी करून तेथील राज्य परत घेतलें; परंतु सहा महिन्यांच्या आंतच तो मृत्यु पावला. त्याचें थडगें दिल्ली येथें फार प्रसिद्ध असून, तें उत्तम कलाकौशल्याचें प्रेक्षणीय असें स्मारक आहे. हुमायून बादशाहाच्या पश्चात् त्याचा पुत्र अकबर हा दिल्लीच्या गादीवर बसला.

अकबर बादशाहा दिल्लीच्या सर्व बादशाहांमध्यें, किंबहुना हिंदुस्थानांतील सर्व राजांमध्यें उत्तमोत्तम असून, त्याची पुण्यश्लोक नृपतींमध्यें गणना करण्यास हरकत नाहीं. त्याचे, उत्तम राज्यव्यवस्था, न्यायनिपुणता, प्रजाहितदक्षता, इत्यादि गुण प्रसिद्धच आहेत. पण त्याशिवाय त्याचे अंगीं धर्मसंबंधाचे बाबतींत सहिष्णुता ( Toleration ) हा गुण सर्वांत प्रशंसनीय असून, सर्व धर्मांच्या लोकांस त्यानें समभावानें वागविल्याबद्दल सर्व जातींचे लोक त्याचें धन्यत्व गात आहेत. हा विद्वानांचा चाहता असून त्याचे पदरीं फैजी, अबुल फजल यांच्यासारखे नामांकित पंडित होते. त्यांच्याकडून त्यानें महाभारत, रामायण, वगैरे पौराणिक ग्रंथ व बीजगणित, लीलावती वगैरे गणितशास्त्राचे ग्रंथ फारसी भाषेमध्यें भाषांतररूपानें तयार केले होते. त्याचप्रमाणें त्याच्या सभेमध्यें ब्राह्मण, यहुदी, पारसी आणि ख्रिस्ती वगैरे सर्व धर्मांचे विद्वान् पंडित होते. आणि ह्या सर्वांचीं धर्मतत्वें समजून घेऊन त्यानें,

"There was no god but God, and that Akbar was his Calif."

" जगामध्यें एका परमेश्वरावांचून दुसरा जगन्नियंता नाहीं; आणि त्या परमेश्वराच्या धर्माचें शासन करणारा फक्त अकबर होय. " अशा प्रकारचा धर्मसिद्धांत ठरविला होता. त्यानें गोहत्या बंद केली, हिंदु व मुसलमान ह्यांचें ऐक्य केलें, आणि स्वतः जोधपूर व जयपूर येथील रजपूत राजांच्या मुलींशीं लग्न करून, त्यांच्या मनांत आपणाविषयीं प्रेमभाव उत्पन्न केला. ह्याच्या कारकीर्दीचा आदर्शरूप ग्रंथ 'ऐने अकबरी' हा सर्वप्रसिद्ध असून, तो अकबराच्या राज्यांत काय काय सुधारणा झाल्या, हें उत्तम प्रकारें व्यक्त करीत आहे. दिल्लीच्या सिंहासनाचें महत्त्व अकबराच्या कारकीर्दीमध्यें जितकें वाढलें, तितकें इतर कोणत्याही बादशाहाच्या कारकीर्दींत वाढलें नाहीं. 'दिल्लीश्वर' म्हणून दिल्लीच्या बादशाहास जें पूज्यभाव व आदर यांचें दर्शक असें विशेषण मिळालें, तें ह्या सर्वश्रेष्ठ सद्गुणसंपन्न नृपतीपासूनच मिळालें. बर्नियर आणि परचास ह्या दोन युरोपियन प्रवाशांनीं अकबराच्या-संबंधानें फार स्तुतिपर लेख आपल्या प्रवासवृत्तांतामध्यें लिहिले आहेत. त्यांचा आशय असा आहे कीं, अकबर बादशाहा हा अतिशय सुस्वभावी असून त्याचें राजतेज विलक्षण होतें. त्याचे शत्रु त्याच्या प्रतापापुढें भयभीत होत असत; तथापि दीनजनांविषयीं त्याचें अंतःकरण अत्यंत सदय असून त्यांचें तो आश्रयस्थान होता. कलाकौशल्याकडे त्याचें चांगलें लक्ष्य असून प्रजापालन हें त्याचें ब्रीद होतें. अर्थात् परकीय लोकांनींही ज्या नृपतींचें इतकें स्तुतिस्तोत्र गाइलें आहे, तो आमच्या संस्कृत कवींच्याही वर्णनाचा एक आवडता विषय व्हावा ह्यांत आश्चर्य तें काय ? अकबराविषयीं संस्कृत कवींनीं पुढील वर्णन केलेलें दृष्टीस पडतें:—

हस्ताम्भोजमाला नखशशिरुचिरश्यामलच्छायवीचिः
तेजोग्नेर्धूमधारा वितरणकरिणो गण्डदानप्रणाली ।
वैरिश्रीवेणिदण्डो लवणिमसरसी बालशैवालवल्ली
वेल्लत्यम्भोधरश्रीरकब्बरधरणीपालपाणौ कृपाणः ॥ १ ॥

धीर त्वं कार्मुकं चेदकबर कलयस्युग्रटंकारघोषं
दूरे सद्यः कलंका इव धरणिभृतो यान्ति कंकालशेषाः ।
शंकापन्नश्च किं कारणमिति मनसा भ्रांतिपंकायितेन
त्यक्त्वाहंकारमंकाद्दिमृजाति गृहिणीं किं च लंकाधिनाथः ॥ २ ॥

कर्णाटं देहि कर्णाधिकविधिविहितत्याग लाटं ललाट-
प्रोत्तुंग द्राविडं वा प्रचलभुजबलप्रौढिमागाढगाढम् ।
प्रस्फूर्जद्गुर्जरं वा दलितरिपुवधूगर्भवैदर्भकं वा
गाजी राजीवदृष्टे कुशशतमथवा शाहजल्लालुद्दीन ॥३॥
गाजीजल्लालुद्दीन क्षितिपकुलमणे द्राक्प्रयाणे प्रतीते
प्रेयस्यः प्रारभन्ते तरलतरगतिर्व्याकुला मंगलानि ।
नेत्रांभःपूरपूर्णस्तनकलशमुखन्यस्तबालप्रवालाः
स्त्रुट्यन्मुक्ताकलापच्युतकुचकुसुमच्छप्रनाकीर्णलाजाः ॥ ४ ॥

ह्या वर्णनावरून अकबराची योग्यता व्यक्त होते.

अकबर बादशाहा इ. स. १६०५ मध्यें मृत्यु पावल्यानंतर, त्याचा पुत्र 'जगज्जेता' जहांगीर हा दिल्लीच्या सिंहासनावर आरूढ झाला. अकबर बादशाहा व जहांगीर हे दिल्लीस फार दिवस न रहातां, मुख्यत्वेंकरून, आग्रा, अजमीर आणि लाहोर येथें रहात असत, त्यामुळें दिल्लीचें वैभव त्यांचे कारकीर्दींत म्हणण्यासारखें वाढलें नाहीं. परंतु जहांगिराचा पुत्र शहाजहान हा इ. स. १६२७ मध्यें दिल्लीच्या गादीवर आल्यानंतर त्यानें मात्र दिल्लीस अद्वितीय शोभा आणिली. हा बादशहा भव्य व सुंदर इमारतींचा फार शोकी असल्यामुळें ह्यानें दिल्ली येथें 'शहाजहानाबाद' नांवाचें नवीन शहर वसविलें. सांप्रत ज्यास 'नवी दिल्ली' असें म्हणतात, तीं या बाद-शहाच्या डामडौली स्वभावाचें दर्शक होय. दिल्लीचा किल्ला व त्यामधील भव्य, रमणीय व नेत्रानंददायक राजवाडे, येथील जुम्मामशीद आणि यमु-नेचा कालवा हीं सर्व कामें ह्याच बादशाहाच्या कारकीर्दींमध्यें झालीं आहेत. ह्या सुंदर व दर्शनीय इमारतींशिवाय ह्या बादशाहानें आग्रा येथें आपल्या प्राणप्रिय राणीच्या स्मरणार्थ जी अपूर्व इमारत उभारली आहे, तिची बरोबरी जगांतील एकही इमारत करूं शकणार नाहीं. आग्रा येथील 'ताजमहाल' हें नुसतें नांव उच्चारिलें, म्हणजे सर्व कुशलतेची परमावधि करून जगतांतील अखिल सौंदर्य आणि सर्व शोभा एकवटून येथें आणली आहे असें वाटतें. ह्याच बादशाहानें रत्नजडित मयूरसिंहासन करून आ-पल्या अपार वैभवानें सर्व राजांचे नेत्र दिपवून सोडिले होते.

ह्या बादशाहाच्या पश्चात् औरंगजेब बादशाहा दिल्लीचा अधिपति झाला. हा अत्यंत धर्मवेडा मनुष्य असून सर्व हिंदुस्थानभर यवनी धर्माचा प्रसार

करण्याची महत्त्वाकांक्षा त्यास अगदीं अनावर होती. ह्याच्या धर्मच्छलानें व लोभातिशयानें सर्व प्रजाजन त्रस्त झाले. ह्याच्याच कारकीर्दीमध्यें हिंदुधर्माचे कैवारी छत्रपति श्रीशिवाजीमहाराज महाराष्ट्रामध्यें उदयास येऊन त्यांनीं स्वतंत्र राज्य संस्थापित केलें. औरंगजेबाचें सर्व आयुष्य विशेषेंकरून दक्षिणेमध्यें, मराठ्यांशीं व विजापूर, गोवळकोंडें येथील बादशाहांशीं झगडण्यांत गेल्यामुळें दिल्लीचें वैभव वाढविण्याचा यत्न त्याचे हातून विशेष झाला नाहीं. औरंगजेबानें छत्रपति शिवाजीमहाराजांस दिल्लीस नेऊन कैदेंत ठेविलें, व तेथून त्यांनीं मोठ्या युक्तीनें आपली सुटका करून घेतली, ही जी इतिहासप्रसिद्ध गोष्ट घडून आली, तिच्या योगानें मराठ्यांस दिल्लीची ओळख विशेष झाली. औरंगजेब बादशाहा इ. स. १७०७ मध्यें हताश होऊन मृत्यु पावला, व त्याच्या पश्चात् मोंगल बादशाहीस उतरती कळा लागली.

औरंगजेबाच्या पश्चात् जे बादशाहा दिल्लीपदावर अधिष्ठित झाले, त्यांच्यामध्यें सर्व साम्राज्य आपल्या ताब्यांत ठेवण्याची आक्रमशक्ति नसल्यामुळें दिल्लीपतीची सत्ता विगलित झाली; आणि ' बळी तो कान पिळी ' ह्या न्यायानें सरदार लोक सर्वसत्ताधारी होऊन राज्यकारभार पाहूं लागले. दिल्लीदरबारामध्यें परस्पर मत्सर, राज्यतृष्णा आणि अधिकारलालसा, ह्यांचें साम्राज्य बनून परकीयांस तिकडे प्रवेश करण्यास संधि मिळाली. मराठ्यांचे मुख्य प्रधान बाळाजी विश्वनाथ व त्यांचे चिरंजीव बाजीराव पेशवे ह्यांनीं दिल्लीवर स्वाऱ्या केल्या, व तेथील नामधारी बादशाहांकडून मराठ्यांकरितां चौथ सरदेशमुखीच्या सनदा मिळवून आणिल्या. इ. स. १७३९ मध्यें दिल्लीच्या संपत्तीचा हेवा करणारा इराणचा बादशाहा नादिरशाहा ह्यानें दिल्लीवर स्वारी करून, मोंगल राजधानीमध्यें मोठ्या विजयानंदांत प्रवेश केला, आणि तीन शतकांपूर्वी तैमूरलंगानें तेथें लूट व कत्तल करून जी धुमाकूळ करून सोडली होती, तिचें स्मरण पुनः जागृत करण्याकरितां तोच देखावा सुरू केला. सुमारें ५८ दिवसपर्यंत दिल्ली येथील श्रीमान् व गरीब अशा दोन्ही प्रकारच्या लोकांची एकसारखी लूट चालली होती. शेवटीं दिल्लींतील लोक अगदीं निष्कांचन बनले, व त्यांच्याजवळ अगदीं त्राण राहिला नाहीं, तेव्हां नादिरशहानें लूट बंद केली. त्यानें ज्या वेळीं स्वदेशास प्रयाण केलें, त्या वेळीं ९,००,००,००० रुपयांची संपत्ति नेली,

असा एका मुसलमान इतिहासकारानें अजमास केला आहे. दिल्लीची पातशाहात अगदीं कमजोर झाल्यामुळें तिच्यावर स्वारी करून ती हस्तगत करावी व पूर्वीच्या इंद्रप्रस्थाचा जीर्णोद्धार करून या पवित्र स्थानीं हिंदुपद्-पादशाही स्थापन करावी, अशा उद्देशानें मराठ्यांचा मोहरा लवकरच तिकडे वळला. परंतु मराठ्यांना हार जाऊन पादशाहात गमावणें दिल्लीच्या नामधारी बादशाहास व त्याच्या सूत्रधारी मुत्सद्यास इष्ट न वाटून, त्यांनीं अहमदशाहा दुराणीकडे संधान बांधिलें; व त्याची मदत घेऊन मराठ्यांशीं त्यांनीं पानिपत येथें मोठी घनघोर लढाई केली. ह्या लढाईमध्यें दुर्दैवानें मराठ्यांचा पुरा पराभव होऊन त्यांचे सर्व रथीमहारथी धारातीर्थी पतन पावले. इंद्रप्रस्थाच्या तख्ताकरितां कौरवपांडवांचें जसें भारतीय युद्ध झालें, त्याप्रमाणें दिल्लीच्या तख्ताकरितां हें पानिपतचें युद्ध होय. ह्या युद्धामध्यें अपरिमित नाश झाल्यामुळें मराठ्यांचें राष्ट्र कांहीं काल उत्साहशून्य झालें. परंतु,

" कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें । "

ह्या वामन पंडितांच्या उक्तीप्रमाणें तें राष्ट्र पुनः जोमदार बनून लवकरच सरसावलें; व महादजी शिंदे व विसाजी कृष्ण बिनीवाले ह्यांनीं मोंगल व रोहिले ह्यांचा सूड घेऊन दिल्लीच्या शहाअलम बादशाहास अंकित केलें; आणि इ. स. १७७१ सालीं इंद्रप्रस्थावर मराठ्यांचा झेंडा फडकावून त्या बादशाहास आपल्या हस्तें तख्तनशीन केलें. इ. स. १७८९ मध्यें गुलाम कादराचें व महादजी शिंद्यांचें युद्ध होऊन पाटिलबोवांनीं दिल्लीपतीस खुष केलें व त्यांच्याकडून पेशव्यांकरितां वकील मुतालकीचीं वस्त्रें व आपणांस स्वतःस अलिजाबहादर हें पद मिळविलें. ह्या वेळेपासून दिल्ली येथें मराठ्यांचा पूर्ण अंमल झाला; आणि मराठी सैन्य दिल्लीच्या संरक्षणार्थ राहूं लागलें. महादजी शिंद्यांचे जांवई लाडोजी शितोळे देशमुख हे कांहीं कालपर्यंत खुद्द दिल्ली शहराचे सुभेदार होते. ग्वाल्हेर येथील शितोळ्यांस 'राजराजेंद्र रुस्तुमजंग बहादुर' असा जो किताब चालत आहे, तो मराठ्यांच्या दिल्ली येथील प्रभुत्वाचा दर्शक आहे.

महादजी शिंद्यांच्या कारकीर्दीमध्यें दिल्लीपदावर मराठ्यांचा वरचष्मा झाल्यानंतर मराठ्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली; व पुढें लवकरच इंग्रजांचें प्राबल्य होऊन, त्यांच्या सैन्यानें दिल्ली येथें दौलतराव शिंद्यांचा

पराभव केला; आणि लॉर्ड लेक ह्यांनीं ता० १४ मार्च इ० स० १८०३ रोजीं दिल्ली आपल्या ताब्यांत घेऊन तेथील बादशाहास आपल्या संरक्षणाखालीं घेतलें. पुढील वर्षी यशवंतराव होळकरानें दिल्लीवर चाल करून इंग्रजांचा दिल्ली येथील पहिला रेसिडेंट कर्नल ( पुढें सर डेव्हिड ) आक्टरलोनी ह्याशीं टक्कर दिली, व त्याच्याकडून दिल्ली घेण्याचा यत्न केला. परंतु त्या वेळीं लॉर्ड लेक ह्यांचें त्यास वेळेवर साह्य झाल्यामुळें इंग्रजांची सत्ता तेथून नष्ट झाली नाहीं. त्या वेळेपासून इंग्रजांनीं दिल्लीच्या बादशाहाच्या नांवानें राज्यकारभार चालविण्यास सुरुवात केली.

इ० स० १८०४ मध्यें दिल्ली येथें इंग्रजांची राजसत्ता सुरू झाल्यानंतर दिल्लीचा बादशाहा फक्त नामधारी बाहुलें होऊन त्याचा अंमल दिल्लीच्या किल्ल्यांत किंवा राजवाड्यांत मात्र चालत असे. इ. स. १८०६ मध्यें दुसरा शहाअलम मृत्यु पावला; व त्याचे मागून अकबरशाहा हा दिल्लीच्या नामधारी गादीचा अधिपति झाला. ह्यास इंग्रजसरकाराकडून सालीना १५ लक्ष रुपये पेन्शन मिळत असे. ह्याचे कारकीर्दींत बिशप हिबर नामक एक प्रवासी दिल्लीस गेला होता. त्या वेळीं त्यानें अकबरशाहाची भेट घेतली होती. त्यानें बादशाहासंबंधानें असा उल्लेख केला आहे कीं, "अकबरशाहाच्या चेहेऱ्यावरून त्याचें वय अजमासें ७४।७५ वर्षांच्या वयाचें असावें असें दिसतें. परंतु त्याचें खरें वय ६३ वर्षांचें असावें. परंतु हिंदुस्थानांत इतकें वय झालें म्हणजे फार समजतात. तो चांगल्या स्वभावाचा असून त्याची वृत्ति अगदीं शांत असे. त्याची बुद्धि सामान्य होती, परंतु याच्या अंगीं शिष्टाचार व आदरकौशल्य विशेष होतें. हा बादशाहा इ. स. १८३७ मध्यें मृत्यु पावला. नंतर त्याचे मागून त्याचा पुत्र बहादूरशाहा हा त्याच्या गादीवर बसला. ह्या बादशाहास कवितेची अभिरुचि विशेष असून तो स्वतः कवि होता. ह्याच्या कित्येक कविता अद्यापि प्रसिद्ध आहेत. ह्याच्या कारकीर्दींमध्यें दक्षिणेंतील श्रीमंत रघुनाथराव विंचूरकर हे दिल्लीस गेले होते. त्यांच्या प्रवासवृत्तामध्यें दिल्लीसंबंधानें पुढील उल्लेख आहेः—" दिल्ली शहर फार मोठें व विस्तीर्ण आहे. सर्व शहरास बांधीव कोट असून यमुनातीरालगत बादशाही किल्ला आहे. तेथें बहादूरशाहा नांवाचा बादशाहा होता. किल्ल्याचे बाहेरील दरवाज्यावर युरोपियन लोक रहात असून दरवाज्याचा बंदोबस्त त्यांजकडेस होता. किल्ल्यांत बादशाही

महाल आहेत. त्यावर सर्व घुमट असून वर सोन्याचे पत्रे बसविले आहेत. किल्ल्यांत बहुत चांगल्या इमारती आहेत, व बादशाहाचा दरबार करण्याची एक मोठी जागा आहे. तेथें तख्त ठेवण्याचे ओस्यावर दगडी सिंहासन होतें. त्यावर पूर्वी रत्नजडित सिंहासन मांडीत असत, असें तेथील लोक सांगतात. ही जागा संगमरवरी दगडानें फार सुशोभित बांधलेली आहे. तेथील भिंतीवर सोनेरी वेल काढिलेले आहेत, आणि ठिकठिकाणीं रत्नें बसविलेलीं होतीं. त्यांच्या खुणा हल्लीं दृष्टीस पडतात. किल्ल्यांत एक मोठा बाग आहे. तेथें बादशाहा राहण्याच्या इमारती असून त्यांत जनानखान्याच्या जागा आहेत. त्यांखेरीज बाकी जागा पाहण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांस तेथील हुकुमानें पाहण्यास हरकत होत नाहीं. शहरचे रस्ते चांगले असून दुतर्फा उत्तम इमारती बांधिलेल्या आहेत. तेथें अनेक जातींचे व्यापारी आहेत, त्यांचा मोठा व्यापार चालतो. शहरामधून यमुनेचा नहर वाहत आहे. त्यास ठिकठिकाणीं घाट बांधून इकडून तिकडे जाण्यास थोडे थोडे अंतरावर उतारपूल आहेत. ती सर्व शोभा पाहून मनुष्य चकित होतें. शहरांत तारकशी कामें व अनेक प्रकारचे नकशी केलेले पदार्थ फार चांगले मिळतात. शहरांत मुख्य जागा जुम्मामशीद नामें आहे. त्या ठिकाणीं जाण्यास हिंदु लोकांस प्रतिबंध आहे. मशिदीबाहेर संध्याकाळीं उत्तम प्रकारचे कापडाचा व्यापार चालतो, व अनेक प्रकारचे पक्षी विकण्यास येतात. चांदणी चौक ह्मणून जागा आहे, तेथें जवाहिराचा व्यापार चालतो. शहरांत बहुतेक मुसलमानलोकांचीच वस्ती आहे. बादशहा याची हुकमत त्या वेळीं फक्त किल्ल्याचे आंत चालत असे; व त्या मर्यादेंतील इनसाफ त्यांनीं नेमलेले अधिकारी पहात असत.” ह्या वर्णनावरून दिल्ली शहराचें वैभव व व्यापार बहादुरशाहाचे वेळीं सर्वस्वीं नाश न पावतां, अल्पसा तरी कायम होता असें दिसतें.

कंपनीसरकारानें दिल्ली येथें अंमल बसवून दिल्लीच्या बादशाहास अंकित केलें होतें, तथापि त्याचा मोठेपणा व मानमरातब ह्यांत अंतर पाडलें नाहीं. सर्व हिंदुस्थानचा राज्यकारभार दिल्लीचा शहानशाहा (राजाधिराज) बहादुरशाहा ह्याचे ‘ फिदवी ’ ( नौकर ) ह्या नात्यानें चालविला होता. ह्या बादशाहाचा मोठेपणा कसा ठेविला होता, त्याचें वर्णन एका ग्रंथ-

कागनें हुबेहूब दिलें आहे.* तें वाचिलें असतां त्याचा आशय असा दिसून येतो कीं, ईस्ट इंडिया कंपनीनें प्रथमपासून दिल्लीच्या बादशाहाशीं जें वर्तन ठेविलें होतें, त्यायोगानें आपण सार्वभौम पृथ्वीपति आहोंत व ईस्ट इंडिया कंपनी आपली नौकर आहे, अशी शुष्क मौढीची कल्पना त्याच्या अंतःकरणांत पूर्णपणें प्रतिबिंबित झाली होती. त्यामुळें त्यास आपल्या सार्वभौमत्वाचा दर्जा कायम राहून आपला मानमरातब याप्रमाणें सतत चालावा असें वाटणें साहजिक आहे. दिल्ली येथील प्रजेच्या दृष्टीनें–

* "Bahadur Shah is really a King; not merely by consent of the Honourable Company, but actually created such by their peculiar letters patent. Lord Lake found the grandfather of the present sovereign and Emperor, in rags, powerless, eyeless, and wanting the means of sustaining existence. The firmans of the Padshahah made the General an Indian noble; the sword of the latter made the descendant of Tamerlane a Company's king, the least dignified, but the most secure of eastern dominations. In public and private, Bahadur Shah receives the signs of homage which are considered to belong to his pre-eminent station. The representative of the Governor-General, when admitted to the honour of an audience, addresses him with folded hands in the attitude of supplication. He never receives letters, only petitions and confers an exalted favour on the government of British India by accepting a monthly present of 80,000 Rupees. In return he tacitly sanctions all our acts; withdraws his royal approbation from each and all our native enemies, and fires salutes upon every occasion of a victory achieved by our troops. Though he may not have been served with all the zeal inspired by that line of Sadi,—'should the prince of noonday say, it is night, declare that you behold the moon and stars;'—he was suffered, however to believe that he was the lord of the world, master of the universe, and of the Honourable East India Company, King of India and of the infidels, the superior of the Governor-General, and proprietor from sea to sea."—*Travels of a Hindoo*—Page 343.

किंबहुना हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या दृष्टीनें–दिल्लीपति म्हणजे सर्वश्रेष्ठ–प्रतिपरमेश्वर–अशी समजूत होती. ह्यामुळें त्यांच्या अंतःकरणांत त्याजबद्दल पूज्यबुद्धि व अभिमान हीं वसत असावीं हें उघड आहे. परंतु पुढें पुढें जसजसें कंपनी सरकारचें प्राबल्य अधिक होत गेलें व खरेंखुरें सार्वभौमत्व त्यांजकडे आलें, तसतसें ह्या नामधारी बाहुल्यास सार्वभौम नृपति समजून, त्याच्या पदारविंदीं लीन होण्याची कल्पना कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांस अप्रयोजक वाटूं लागली. दिल्लीचा पहिला रेसिडेंट सर चार्लस मेटकॉफ हा राजकारणी व चतुर मुत्सद्दी बादशाहाच्या आदरसत्कारांत कधीं उणें पडूं देत नसे; परंतु लॉर्ड ॲम्हर्स्ट वगैरे मानी पुरुषांस त्याला इतका सन्मान देणें रुचेनासें आलें. त्यांनीं, आपण बादशाहाच्या बरोबरीचे आहों असें समजून, दरबारामध्यें बूट काढून जाण्याचें व त्याच्या पायाशीं बसण्याचें मान्य केलें नाहीं. उलट, त्यांनीं त्याच्या शेजारीं दरबारी कोचावर बसण्याचा आपला हक्क प्रस्थापित केला. पुढें लॉर्ड बेंटिंक ह्यांनीं नजरनजराण्याचे बाबतींत काटकसर केली. पुढें लॉर्ड एलिन्बरो ह्यांनीं त्यांच्याही पुढें एक पाऊल टाकून, बादशाहाची भेट एखाद्या सार्वभौम प्रभुप्रमाणें घेतली, व बादशाहास जी वार्षिक नजर द्यावयाची चाल होती ती बंद करून, ती त्याच्या तैनातीमध्यें दाखल केली. यामुळें बादशाहास वैषम्य वाटून त्याचें मन उदास झालें. लॉर्ड एलिन्बरो नंतर लॉर्ड डलहौसी हे हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल होऊन आले. त्यांनीं दिल्लीच्या बादशाहाचें वृथा अवडंबर अजीबाद मोडून टाकण्याचा प्रयत्न केला. बहादुरशाहाचा औरसपुत्र शहाजादा इ. स. १८२९ मध्यें मृत्यु पावला. तेव्हां त्याच्या पुत्रास बहादुरशाहा बादशाहाच्या पश्चात् दिल्लीच्या सिंहासनाचा अधिपति करण्याचा प्रसंग येऊं नये, म्हणून त्याजपासून अगोदरच गादीची सोडचिठ्ठी लॉर्डसाहेबांनीं लिहून घेतली. ह्या सर्व अपमानामुळें बादशाहास विशेष त्रास यावा व मोंगल बादशाही आपल्या मागें अजीबाद रसातळास जाते, हा दुःखकारक विचार मनांत येऊन त्याचें अंतःकरण प्रक्षुब्ध व्हावें, ह्यांत आश्चर्य काय ? अर्थात् अशा स्थितींत इ. स. १८५७ हें साल प्राप्त झालें, व त्यानें बहादुरशाहासारख्या हताश होऊन संतप्त झालेल्या राजवंशीय लोकांस बंड करण्याची संधि दिली. तिचा भयंकर परिणाम दिल्लीच्या इतिहासांत नमूद आहे.

इ. स. १८५७ सालीं दिल्ली येथें जें भयंकर बंड झालें, त्यांत बहादूर-शाहा सामील झाला. ह्या बंडामध्यें त्याचा फायदा तर कांहींच झाला नाहीं, परंतु त्याचे पुत्र, मेजर हड्सन ह्यांच्या बंदुकीस बळी पडून, खुद्द बादशाहा इंग्रजांच्या हातीं सांपडला. त्यांनीं त्याची लष्करी न्यायासनासमोर चौकशी करून त्यास आजन्म काळेपाण्याची शिक्षा दिली. यामुळें त्यास जें दिल्ली येथें अल्प वैभव उपभोगितां येत होतें तेंही नाहींसें होऊन तो विपदावस्थेमध्यें रंगून येथें ता. ७ ऑक्टोबर १८६२ रोजीं मृत्यु पावला. अशा रीतीनें मोंगल बादशाहीचा समूळ नाश होऊन ती काळाच्या विश्वभक्षक दंष्ट्रेमध्यें सांपडली ! दिल्लीच्या सार्वभौम पदाचा उपभोग घेतलेल्या सुष्ट व दुष्ट अशा सर्व राजांच्या नाममालिका व त्यांच्या सुकृति अथवा दुष्कृति मात्र इतिहासांत कायम आहेत; आणि दिल्ली शहर हें सांप्रत त्या राजांचे भव्य राजवाडे, त्यांचे विशाल मनोरे, त्यांचे अत्युच्च जयस्तंभ, आणि त्यांच्या प्रचंड मशिदी ह्यांचें प्रदर्शन करून, प्रेक्षकांच्या अंतःकरणांत एकसमयावच्छेदें-करून आश्चर्य व खेद हीं उत्पन्न करीत आहेत; आणि त्यांस मार्कस आंटोनियसच्या

"O ! Mighty Sovereigns ! do ye lie so low ?
Are all thy conquests, glories, triumphs, spoils
Shrunk to this little measure ? Fair thee well ! "

ह्या उक्तीचें व कविराज भर्तृहरीच्या

सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामन्तचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चन्द्रबिम्बाननाः ॥
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बन्दिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥

ह्या उक्तीचें स्मरण देत आहेत.

# भाग २ रा.

## दिल्लीचा किल्ला व मुख्य राजवाडे.

### दिवाणी आम व दिवाणी खास.

दिल्ली पाहण्यास येणाऱ्या प्रेक्षकांस दिल्लींतील मुख्य मुख्य स्थळें पाहण्यास निदान तीन दिवस तरी लागतात. ह्या तीन दिवसांमध्यें पहिला दिवस दिल्लीचा प्रसिद्ध किल्ला व त्यांतील मुख्य राजवाडे आणि त्या जवळचीं इतर इतिहासप्रसिद्ध स्थळें पाहण्यांत व फेरोजाबाद आणि इंद्रप्रस्थ ह्यांचें दर्शन घेण्यांत जातो. कोणीही नवीन मनुष्य दिल्लीस आला कीं, त्याचें लक्ष्य प्रथम दिल्लीचे राजवाडेच वेधून घेतात. त्यांचें सौंदर्य, त्यांचा भव्यपणा, त्यांचें तेज, त्यांचें नक्षीकाम आणि त्यांची रचना हीं इतकीं कांहीं मनोरम आहेत कीं, तीं पाहून ज्याचें अंतःकरण वेधून जाणार नाहीं व ज्यास आनंदाश्चर्य वाटणार नाहीं, असा मनुष्य विरळा. ह्या राजवाड्यांचें वर्णन देण्यापूर्वी त्यांची थोडीशी माहिती देणें अवश्य आहे.

दिल्लीचा किल्ला व त्यांतील राजवाडे हे शहाजहान बादशाहानें बांधिले असून त्यांस वीस वर्षें लागलीं, व त्या वेळच्या मानाप्रमाणें पंधरा लक्ष रुपये खर्च आला, असें 'मिरत-इ-आफताबनामा' नामक ग्रंथावरून दिसून येतें. ह्या किल्ल्याचा परिघ एक मैल असून त्यामध्यें पूर्वी दहाबारा राजवाडे होते. परंतु आतां त्यांपैकीं मुख्य मुख्य राजवाडे कायम राहिले असून, बाकीच्या इमारती नाहींशा झाल्या आहेत. ह्या किल्ल्यास शहराच्या बाजूनें दोन दरवाजे असून त्यांपैकीं एका दरवाज्यावर जयमल्ल आणि फत्तेसिंग नामक दोन विजयी रजपुतांच्या गजारूढ अशा दगडी मूर्ति होत्या. ह्या मूर्ति हिंदुस्थानांतील शिल्पकारांनीं तयार केलेल्या होत्या. हे दोन वीर चितोर येथें अकबर बादशाहाबरोबर फार शौर्यानें लढले, व धारातीर्थीं पतन पावले; म्हणून अकबरानें त्यांच्या संस्मरणार्थ हे पुतळे तयार केले व आपल्या राजद्वाराजवळ उभे केले, अशी त्यांची आख्यायिका ऐकण्यांत येते. कोणी ह्मणतात कीं, हे पुतळे जहांगीर बादशाहानें तयार

करविले. ते कोणींही तयार करविलेले असोत, परंतु ते शहाजहान बाद्शाहाच्या राजद्वाराजवळ उभे होते, असें बर्नियर नामक प्रवाशानें स्वतः पाहिलें होतें. त्यांच्या सौंदर्याबद्दल त्यानें फार तारीफ केली असून, असें मनुष्याकाराचें मूर्तिकाम हिंदुस्थानामध्यें हेंच पहिलें असावें असें त्यानें ह्मटलें आहे.* असो.

किल्ल्याचा दुसरा दरवाजा जो आहे, तो 'लाहोर दरवाजा' ह्या नांवानें प्रसिद्ध असून तेथील खंदकाचें काम फार प्रेक्षणीय आहे. खुद्द दरवाजा अतिशय मजबूत व अभेद्य असून, त्याच्या शिरोभागावरून फार सुंदर देखावा दृष्टीस पडतो. त्याच्या पश्चिमेकडील बाजूस जुम्मा मशीद व पूर्वेकडे शहर व जैन देवालय हीं दृष्टीस पडतात. ह्या लाहोर दरवाज्यापासून अगदीं चांदणी चौकापर्यंत समोर रस्ता जातो. ह्या दरवाज्यांतून किल्ल्यांत शिरलें ह्मणजे प्रथम नगारखाना अथवा नौबतखाना ही इमारत दृष्टीस पडते. त्यानंतर 'दिवाणीआम' आणि 'दिवाणीखास' हे दोन मुख्य राजवाडे दृष्टीस पडतात. हेच दिल्लीपतींचे लोकोत्तर प्रासाद होत.

दिल्ली येथें जीं अनेक प्रेक्षणीय स्थळें आहेत त्यांत दिवाणीआम व दिवाणीखास हे दोन बादशाही दरबार मुख्य होत. हे दिल्ली येथील किल्ल्यामध्यें आहेत. हा किल्ला शहाजहान बादशाहानें बांधला असून फार भव्य व प्रचंड आहे. ह्याचें बांधकाम आग्र्याच्या किल्ल्याप्रमाणें सुंदर असून सर्व तांबड्या दगडांचें आहे. हा यमुनेच्या तीरावर असून त्याचा परिघ दीड मैल आहे. त्याच्या सभोंवतीं एक भक्कम कोट असून त्याची उंची सुमारें चाळीस फूट आहे. ह्या किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यास 'लाहोर गेट' असें नांव होतें, परंतु सांप्रत तें नष्ट होऊन त्यास आतां 'व्हिक्टोरिया गेट' असें नांव मिळालें आहे. त्या दरवाज्याच्या शिरोभागावर नील-रक्त-शुभ्र असा वर्णत्रयमिश्रित एक लहानसा ध्वज फडकत असतो. तो,

* "The statues of Jaymal and Pattá are simply valuable as works of art, as they are, perhaps, the only portrait statues that have been erected in India for many centuries. They are made of red sand-stone, and are of life-size, while the huge elephants on which they sit are of black marble, and the hinsings are decorated with white and yellow marbles."

—*Bernier's Travels.*

सर्ववर्णप्रजेस सारख्या प्रेमानें वागवूं, असा बाणा बाळगणाऱ्या आपल्या कृपाळू ब्रिटिश सरकारचा आहे, हें निराळें सांगावयास नकोच. ह्या प्रवेश- द्वारांतून आंत गेलें म्हणजे प्रथम अनेक प्रचंड कमानी लागतात; व तेथून किल्ल्यांतील सर्व वैभवशून्य देखावा दिसूं लागतो. सन १८५७ च्या बंडाचे वेळीं येथील अनेक सुंदर इमारती जमीनदोस्त झाल्यामुळें सर्व किल्ला ओसाड झाला आहे. तथापि त्याचें दीनस्वरूप ओळखूं न येण्याकरितांच कीं काय सर्व जागा साफ करून व रस्ते वगैरे व्यवस्थित ठेवून थोडीशीं झाडें ला- विलीं आहेत; व कित्येक ठिकाणीं लहान लहान बगीचेही केले आहेत. राजवाड्यांतील प्रेक्षणीय भाग कायम ठेवून बाकीच्या पुष्कळ महालांचा नाश केला आहे. ज्या राजवाड्यांचा उपयोग सहज रीतीनें लष्करी अधि- काऱ्यांना करतां आला, ते मात्र कायम ठेविले आहेत. त्यांचें तें मिश्र स्वरूप अवलोकन करून प्रेक्षकांस खेद वाटल्यावांचून राहत नाहीं ! ज्या राजवाड्यांत संगमरवरी दगडाचें शुभ्र तेज चमकत असावयाचें, तेथें पब्लिक वर्क्स खात्याकडून जी इंग्रजी तऱ्हेची डागडुजी झाली आहे, ती फारच विसंगत दिसते ! ज्या राजवाड्याच्या प्रवेशद्वारांत अनेक द्वारपाल उभे असावयाचे, तेथें फुलझाडांच्या कुंड्यांवांचून दुसरें कांहीं दृष्टीस पडत नाहीं. असो. अशा प्रकारचा सर्व किल्ल्यांतील निस्तेज देखावा पाहून कालचक्राच्या कुटिल गतीचें वारंवार स्मरण होत आहे, तोंच आपल्यापुढें नेत्राकर्षक, तांबूस वर्णाची, खुली पण अत्यंत भव्य, अशी इमारत दृष्टीस पडते. हा इतिहासप्रसिद्ध ' दिवाणीआम ' नांवाचा दिल्लीपतीचा मुख्य दरबार !

हा सुप्रसिद्ध दिवाणखाना सोनेरी रंगाच्या वेलपत्तीनें सुशोभित केला असून, येथें पूर्वीं फार वैभव वास करीत होतें. ह्या दिवाणखान्यास जें छत होतें, तें सर्व रुप्याचें असून, त्यावर कलाकुसरीचें सुंदर काम केलें होतें. येथील प्रत्येक खांबास अस्मानी रंगाचा चकचकीत मुलामा केला असून त्यामधून सुंदर पुष्पें कोरलीं होतीं. ह्या दिवाणखान्याचें एकंदर नक्षीकाम अप्रतिम केलें होतें; एवढेंच नव्हे तर, त्यामधून कित्येक इतिहासप्रसिद्ध गोष्टींचीं फार मार्मिक रीतीनें चित्रें काढिलीं होतीं. शहाजहान बाद- शाहानें आग्र्याचा ताजमहाल बांधला, त्या वेळीं त्यानें शिराज येथील प्रसिद्ध कारागीर अमानतखान ह्यास आपलें नांव घालण्याची परवानगी

दिली होती; त्याचप्रमाणें त्यानें ताजमहालाच्या एका बाजूस “ शिराज येथील नम्र फकीर अमानतखान ” असें नांव घातलें असून, हिजरी शक १०४८ लिहिला आहे. त्याप्रमाणें शहाजहान बादशाहानें ह्या महालाच्या चित्रमालेमध्यें एका युरोपियन चित्रकलाकुशलास आपली स्पानिश पो-पाखानिशीं तसबीर काढण्यास परवानगी दिली होती. ह्या इसमाचें नांव ‘ अस्टिन डी बोर्डो ’ असें होतें. ह्या कुशल कलमबहाद्दरानें हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या पक्ष्यांच्या सुंदर प्रतिकृति ह्या दिवाणखान्यामध्यें रंगविल्या होत्या. त्याचप्रमाणें, एके ठिकाणीं त्यानें एका पाणीदार तलवारीचें चित्र काढिलें होतें. ह्या चित्राचा इतिहास असा होता कीं, एके वेळीं चितोरचा एक राजपुत्र दरबारांत बसला असतांना, बादशाहाच्या मर्जीतल्या एका मुसलमान सरदारानें त्याचा थोडासा अपमान केला. त्यासरशी त्या तेजस्वी रजपुताच्या छाव्यानें आपला खंजीर उपसून भरदरबारांत बाद-शाहासमोर त्याचा सूड घेतला; आणि बादशाहानें जबाब विचारतांच ‘ लेडी ऑफ दि लेक ’ काव्यांतील रॉडरिक डूप्रमाणें

“ I right my wrongs where they are given
Though it were in the court of Heaven.”

अशासारखें बाणेदार उत्तर दिलें, व सर्व दरबारी लोकांस आश्चर्यचकित करून सोडलें ! असो. ह्या महालाची सौंदर्यमर्यादा येथेंच संपली नाहीं. ह्या महालाच्या मध्यंतरीं दहा फूट उंचीचा एक संगमरवरी दगडांचा चौथरा केला असून, त्यावर मेघडंबरी थाटाचा एक शिखराकार शिरोभाग केला आहे. तो स्फटिकवत् शुभ्र असून त्यांत कारागिराच्या कौशल्याची परमावधीच झाली आहे, असें म्हटलें तरी चालेल. ह्या सुंदर स्थलाच्या मध्य-भागीं दिल्लीपतीचें तख्त ऊर्फ जगत्प्रसिद्ध रत्नजडित मयूरासन ठेवीत असत. ह्याचें मुसलमानी इतिहासांत ‘ तक्त-इ-तौस ’ असें नांव आहे.

ह्या तख्ताचें वर्णन जितकें करावें तितकें थोडें आहे. दिल्लीच्या अनेक बादशाहांनीं अनेक सिंहासनें केलीं असतील, पण असें अद्वितीय मयूरासन कोणींच केलें नव्हतें. हें सिंहासन दीर्घवर्तुलाकार असून त्याची लांबी ६ फूट व रुंदी ४ फूट होती. त्याचा वरील सर्व भाग हिरे, माणकें, पाच इत्यादि अमूल्य रत्नांचा असून खालील भाग सुवर्णाचा होता, व त्याच्या दर्शनीय बाजूस हिरे बसविले होते. ह्यास लाविलेलीं नुसतीं माणकेंच १०८

होतीं. ह्याशिवाय जागोजाग नीलमणि व पाचा ह्यांचाही उपयोग केला होता. ह्या सिंहासनावर सुवर्णवृक्ष करून त्यावर रत्नजडित मयूर बसविला होता, आणि त्याचा रत्नखचित पिसारा सिंहासनाधीशावर अनायासें उडत रहावा अशी योजना केली होती. मयूरपिसाऱ्याचें काम अगदीं अप्रतिम केलें असून त्याजवरील विविध रंग हुबेहूब खुलविण्याकरितां तऱ्हेतऱ्हेचीं रत्नें त्यांत जडलीं होतीं. बादशाहाच्या शिरोभागावरील छत्रही हिऱ्यामोत्यांचें असून त्याला बकुळाएवढ्या पाणीदार मोत्यांची झालर लाविली होती. या मयूरासनाचे सर्व हिरे गोवळकोंड्याच्या खाणींतील असून ते तारकापुंजाप्रमाणें चमकत असत. ह्या मयूरासनावर सरकार-स्वारी जामानिमा करून मागील द्वारानें येऊन विराजमान होत असे. ह्या अद्वितीय सिंहासनाच्या योगानें या दरबार-महालास अप्रतिम शोभा येत असे. ह्या सिंहासनाची किंमत टाव्हर्नियर नामक एका फ्रेंच प्रवाशानें सुमारें १०॥ कोटी केली आहे ! असो. दिल्लीपतीवर कालाची वक्रदृष्टि होऊन सन १७३९ सालीं हें मयूरासन इराणचा प्रबल बादशाहा नादिर-शाहा ह्याच्या हस्तगत झालें ! ! तथापि हा दिवाणीआम दरबार पुढें बरेच दिवस कायम होता. परंतु सन १७६० सालीं पुण्यपत्तनस्थ पेशवे सदाशिवरावभाऊ ह्यांनीं पानिपतच्या रणकंदनाचे समयीं त्वेषाम पेटून ह्यावर हल्ला केला; व सुरजमल्लजाटाचा सदुपदेश न ऐकतां, मागें मोंगलांनीं रायगडच्या नूतन संस्थापित हिंदुपदपादशाहीच्या तख्ताचा भंग केला होता, त्याचा सूड घेण्याच्या उद्देशानें, ह्या सुंदर महालाचें सर्व रुप्याचें छत तोडून काढलें, आणि त्याचे रुपये करून सैन्याची बेगमी केली. ह्या छताची किंमत सतरा लक्ष रुपये झाली, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. या वैभवालंकृत महालाचें प्रस्तुतचें दीन स्वरूप पाहून कोणास बरें दुःखाश्रु येणार नाहींत? सांप्रत येथें तें सुवर्णमय रत्नखचित नक्षीकाम राहिलें नाहीं; अथवा पृथ्वी-पतींनीं हेवा करण्यासारखें तें मयूरासनही कोठें दिसत नाहीं ! ज्या संगम-रवरी चवुऱ्यावर हें रत्नासन ठेवीत असत, तो मात्र कायम असून आ-पली विपदवस्था दाखवीत आहे ! ह्या पूज्य स्थलास बहुविध प्रेक्षकांचा हस्तस्पर्श होऊं नये म्हणून त्यासभोंवतीं लोखंडी गज ठोकिले आहेत.

असो. ह्या दुर्दैवग्रस्त 'दिवाणीआम' महालाचें दर्शन घेऊन प्रेक्षकांच्य मनामध्यें वैभवाच्या क्षणभंगुरतेविषयीं अनंत कल्पनातरंग येऊं लागतात

व त्याचें मन किंचित् अस्वस्थ होतें; तोंच त्यांस ' दिवाणीखास ' ह्या नांवाची दुसरी मनोरम इमारत दिसूं लागते. ह्या इमारतीच्या स्फटिकतुल्य शुभ्र प्रभेनें प्रेक्षकांच्या नेत्रांचें इतकें कांहीं आकर्षण होतें कीं, त्यांस पूर्वीच्या अवस्थेचें स्मरणही राहत नाहीं ! खरोखर, यावरून संसारचक्रामध्यें गुंतलेल्या मानवी प्राण्यास मायापाश कसा वारंवार बद्ध करीत असतो, हें सहज व्यक्त होतें. असो. ह्या प्रसिद्ध दिवाणीखास महालामध्यें जाण्यास प्रेक्षकांस एका सुंदर पुष्पवाटिकेमधून जावें लागतें. तेथें जाऊन सन्मुख उभें राहिलें म्हणजे आपणांपुढें अत्यंत धवल व तेजःपुंज अशी कांहींतरी अपूर्व वस्तु आहे असा भास होतो. ह्या खास महालाचें सर्व काम अतिशुद्ध व अत्युत्तम संगमरवरी दगडांचें असून, त्यांमध्यें बहुविध रंगांचीं रत्नें बसवून व जागोजागीं सुवर्णाचें काम करून त्यास अद्वितीय शोभा आणिली आहे. ह्या महालाच्या एका बाजूस यमुना नदीचा सुंदर देखावा दृष्टीस पडतो. एकीकडे उद्यानाची शोभा दिसत असते. एकीकडे सुवर्णांकित न्यायतुलेचें चित्र काढलेलें शुभ्र प्रवेशद्वार चमकत असतें. ह्या महालावर सायंकाळीं केव्हां कोमल पण आरक्त सूर्यकिरणांच्या प्रकाशलहरी परावर्तन पावून चमकूं लागतात, त्या वेळीं येथें जो तेजोमय देखावा दिसूं लागतो, तो अगदीं अवर्णनीय असतो. खरोखर ज्या वेळीं येथें खरीं रत्नें विराजत असतील, त्या वेळीं येथें केवढी अप्रतिम शोभा दिसत असेल बरें ? कवि मोरोपंत ह्यांनीं एके ठिकाणीं असें वर्णन केलें आहेः—

पूर्ण-सुधांशु-ज्योत्स्ना लाजति त्या स्फटिकरत्न भित्तीतें ।
प्रतिबिंब दाविती जें बिंब गमे सुकविच्याहि चित्तीं तें ॥ १ ॥
प्रासादीं रत्नांचे सुस्थूळ अखंड आणि बहु लांब ।
खांब सहस्रावधि रविकरनिकरा म्हणति जे शिशी थांब ॥ २ ॥
रत्नांचींच विचित्रें कनकाचींही कितेक हो खचितें ।
दंत प्रवाल चंदन यांची तरि अमित आसनें रचितें ॥ ३ ॥
मणिकनकदंडमंडित शतसंख्य सुरम्य चामरें व्यजनें ।
ज्यांच्या विलोकनासहि पात्र न व्हावें कधीं अभव्य जनें ॥ ४ ॥

खरोखर हें वर्णन ह्या महालास कितीतरी अन्वर्थक आहे ! ह्या मयूरसिंहासनाधीशाच्या अलौकिक कृतीचें वर्णन करण्यास मयूरवाणीच पाहिजे ! इतरांचें काम नव्हे !

ह्या महालाच्या पूर्वाभिमुख द्वाराच्या शिरोभागावर पर्शियन भाषेंत असें लिहिलें आहे कीं:-

" अगर फर्दोस बरु इ-झमिन् अस्थ,
हमिन् अस्थ, वो हमिन् अस्थ, वो हमिन् अस्थ ! "
" If on the earth be an Eden of bliss,
It is this, it is this, none but this ! "

खरोखर हें इंद्राचें पृथ्वीतलावरील नंदनवनच होय ह्यांत कांहीं शंका नाहीं.

ह्या सौंदर्यमंदिरामध्यें अनंत महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या आहेत. त्यांवरून जणूं त्यास राजकीय उलाढाली अवलोकन करण्यास निर्माण केलें आहे कीं काय, असा भास होतो. ह्याच महालामध्यें शहाजहान बादशहानें मोठ्या थाटानें सिंहासनाधिष्ठ होऊन दिल्लीचा राज्यकारभार चालविला. ह्याच महालांतून ईस्ट इंडिया कंपनीच्या हॅमिल्टन नामक साहेबास बादशाहाची प्रकृति बरी केल्याबद्दल ३७ गांवें इनाम देण्याचा व कंपनीच्या मालावरील जकात माफ करण्याचा हुकूम सुटला. ह्याच महालांत बसून औरंगजेब बादशाहानें आपल्या दारा व मुराद ह्या बंधुद्वयाचा शिरच्छेद केला. ह्याच ठिकाणीं नादिरशाहानें दिल्लीपति महंमदशाहा ह्यास गोगलगाय करून आपल्यापुढें नाकदुऱ्या काढण्यास लाविलें. ह्याच महालामध्यें गुलाम कादरानें शहाअलम बादशाहाचे डोळे काढून त्याच्या मुलाचा वध केला. ह्याच महालापुढें महादजी शिंद्यांनीं त्याच गुलाम कादरास पिंजऱ्यांत घालून बादशाहापुढें हजर केलें व आपल्या बहादुरीबद्दल वकीलमुतलकीची सनद व नालकीपालखी मिळविली. एवढेंच नव्हे, तर **गोरक्षणाची सनद**ही ह्याच दिवाणीखास महालामधून मिळाली! बंगाल, बहार व ओरिसा ह्या प्रांतांची सनद ऊर्फ सुप्रसिद्ध ' दिवाणी ' नांवाची फरमान येथूनच ईस्ट इंडिया कंपनीस देण्यांत आली. खरोखर ह्या महालामध्यें किती तरी महत्त्वाच्या व राज्यक्रांतीच्या गोष्टी घडून आल्या! सन १७७३ पासून सन १८०३ पर्यंत दिल्लीचा बादशाहा अगदीं मराठ्यांच्या सूत्रानें वागत असे. एवढेंच नव्हे, पण त्या प्रांतावर खरा अंमलही त्यांचाच होता. हें ईस्ट इंडिया कंपनीस असह्य होऊन त्यांनीं बादशाहास स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं लॉर्ड लेकसाहेबांस " सुमसनउद्दौंवला अशगार उलमुल्क खान दौरानखान जनरल लेक बहादुर फतेसिंग" म्हणून जो

किताब मिळाला, तो देखील ह्याच महालामधून ! हाय ! हाय ! ज्या स्थळीं अनेक बादशाहांना राज्याभिषेक व्हावा, त्याच स्थळीं त्यांची पद्च्युतता देखील नेमलेली असावी, ही सर्वांत परम खेदकारक गोष्ट होय ! ज्या राजवाड्यामध्यें दिल्लीपतींस वैभवाचें अत्युच्च स्थान प्राप्त झालें, त्याच स्थळीं त्या राजवैभवाचा अंत व्हावा काय ? इंग्रजसरकारानें कृपाळू होऊन जी नेमणूक दिली होती, ती न पुरल्यामुळें मृत्यूची मार्गप्रतीक्षा करीत असलेला बिचारा वृद्ध बहादूरशाहा, दिल्लीचा शेवटचा बादशाहा, ह्यावर सन १८५७ च्या बंडांत सामील झाल्याचा आरोप येऊन, त्याची चौकशी करण्याकरितां कर्नल डावेस, मेजर पामर, मेजर रेडमंड, मेजर सांयर्स, क्याप्टन रोद्ने ह्यांचें जें कमिशन बसलें, तें देखील ह्याच "दिवाणीखास" महालामध्यें !! ज्या सार्वभौम नृपतीनें इतर लोकांचे न्याय करावयाचे, त्याचा न्याय त्याच्याच सिंहासनावर बसून इतरांनीं करण्याचा प्रसंग यावा, यापेक्षां दुर्दैवाची कमाल दुसरी कोणतीच नाहीं ! ह्या दिवाणीखास महालाच्या एका बाजूस मोंगल बादशहांनीं न्यायतुलेचें चित्र काढलें आहे, असें वर सांगितलें आहे; त्याचा उद्देश इतकाच कीं, तेथून जो न्याय मिळेल तो तराजूंत जोखून दिल्याप्रमाणें खरा न्याय असावयाचा. त्याच न्यायाच्या तराजूपुढें बसून आमच्या कृपाळू इंग्रजसरकारच्या वरील अधिकाऱ्यांनीं बादशाहास जो न्याय दिला, तो अगदीं सत्य असलाच पाहिजे ! बादशाहावर जे आरोप ठेविले होते, त्यांमध्यें एक आरोप असा होता कीं, त्यानें आपणास दिल्लीचा बादशहा ह्मणवून द्वाही फिरविली ! ह्या व इतर आरोपांबद्दल त्याची रीतीप्रमाणें चौकशी होऊन बिचाऱ्यास काळ्यापाण्याची शिक्षा झाली ! ह्या बादशाहाच्या त्या वेळच्या स्थितीचें हुबेहूब वर्णन ता० ११ मे सन १८५८ रोजीं लंडन येथील सेंट जेम्स हॉलमध्यें आडल्सबरी तर्फेच्या पार्लमेंटच्या एका सभासदानें केलें आहे. तें त्यानें आपल्या नेत्रांनीं पाहून केलें आहे. तो ह्मणतो:—

* " मी त्या थकलेल्या वृद्ध बादशाहास भेटलों, तो आपल्या राज-

* "I saw that broken down old man, not in a room, but in a miserable hole of his palace, lying on a bedstead with nothing to cover him, but a miserable tattered coverlet. As I beheld him, some remembrance of his former greatness [ *See page 27.*

वाड्याच्या महालामध्यें नव्हे, पण एका भिकार कोठडीमध्यें अंथरुणावर पडला होता. त्याला पांघरावयाला पुरतें धड वस्त्रही नव्हतें ! मीं त्याच्याकडे पाहिल्याबरोबर त्याला आपल्या पूर्वीच्या वैभवाचें स्मरण आल्यासारखें दिसलें. तो आपल्या कोंचावरून मोठ्या प्रयत्नानें उठून बसला, व त्यानें मला आपले हात दाखविले. ते व्याधीनें ग्रस्त झाले असून माशांनीं खाऊन टाकिले होते ! ह्याचें अंशतः कारण, त्यास पाणी मिळत नसे. शोकयुक्त स्वरानें त्यानें असें सांगितलें कीं, **मला खायला कांहींएक मिळत नाहीं ! !** अशा प्रकारें ज्या रीतीनें त्याला आपण ( इंग्रज ) वागवीत आहों, ती रीति आपल्या प्रचंड राष्ट्रास योग्य आहे किंवा नाहीं, ह्याबद्दल मी आपलें मत सांगूं शकत नाहीं, पण मी ख्रिश्चन ह्या नात्यानें असें विचारतों कीं, राजाला अशा रीतीनें वागविणें योग्य आहे काय ! "

असो; ह्या बादशाहाच्या दीन स्थितीबद्दल बरीच वाटाघाट झाली, व अखेर त्यास रंगुन येथें पाठविलें ! खरोखर ' दिवाणीखास ' महालांतील आणखी महत्त्वाच्या विशेष गोष्टी काय सांगाव्या ? हें स्थळ पाहून कोणाच्या अंतःकरणांत शोककल्लोळ उत्पन्न होणार नाहींत बरें ?

' दिवाणीखास ' महालाचे बाजूस एक सुवर्णांकित न्यायतुळेचें चित्र काढिलें आहे. ह्या चित्राचा इतिहास फार मौजेचा आहे. शहाजहान बादशाहाची स्वारी या महालांत बसून इनसाफ करीत आहे. तो इनसाफ ताजव्यांत वजन केल्याप्रमाणें अगदीं बरोबर असावयाचा, हें दाखविण्याकरितां, ही न्यायतुला त्यानें तयार केली होती. ह्या न्यायतुळेजवळ एक घंटा असे. ती घंटा वाजवून प्रजाजनांनीं बादशाहाजवळ अर्ज करावा अशी येथें पद्धति होती. ही पद्धति शहाजहान बादशाहानें आपल्या वडिलांपासून घेतली होती असें म्हणतात. जहांगीर बादशाहाच्या न्यायपद्धतीच्या दोन

---

*(Continued)*

seemed to arise in his mind. He rose with difficulty from his couch, showed me his arms, which were eaten into by disease and by flies, and partly from want of water; and he said in a lamentable voice that he had nothing to eat! I will not give any opinion as to whether the manner in which we are treating him is worthy of a great nation, but is this a way in which, as Christians, we ought to treat a king?"

आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यांवरून मोंगल बादशाहाची न्यायाची मौजेची तऱ्हा दिसून येते. ह्या आख्यायिका येणेंप्रमाणेः-

" अकबर बादशाहाचा पुत्र जहांगीर यास आपल्या इनसाफाचा मोठा अभिमान असे. गरीबगुरिबांची दाद थेट बादशाहापर्यंत लागावी म्हणून त्यानें आपल्या महालांत एक घंटा बांधली. तिला दोरी बांधून त्या दोरीचें शेवट किल्ल्याचे बाहेर नेऊन एका खांबाला बांधून ठेविलें. खुद्द बादशाहाकडे अर्ज यावयाचा असला, तर दोरी ओढावी, ह्मणजे घंटा वाजे. घंटा वाजली कीं, घंटा वाजविणाराची भेट होऊन त्याला इनसाफ मिळे. एकदां दोरी बांधलेल्या खांबावर एका पखालीच्या बैलानें आपली मान घांसली; त्यामुळें घंटा वाजली. चौकशी करतां खरा मजकूर समजला. तेव्हां दरबारच्या लोकांनीं हात जोडून अर्ज केला, 'मुकें जनावर आहे. मान घांसली. सोडून द्यावें.' बादशाहा म्हणाला, 'नाहीं, ह्या बैलावर कांहींतरी जुलूम झाला आहे; पखालींतलें पाणी तोला.' तें पाणी पांच मण भरलें. तेव्हां बादशाहानें हुकूम केला, 'हें पाणी फार आहे; साडेतीन मणांपेक्षां जास्त पाणी पखालींत भरूं नये. भरल्यास शिक्षा होईल !'

दुसरी एक गोष्ट अशी प्रसिद्ध आहे कीं, नूरजहान हिजवर जहांगिराचा जीव कीं प्राण असे. ती मोठी बुद्धिमती व फार शूर असून राज्यकारभारही चालवीत असे. नूरजहानला शिकारीचा फार शोक असे. ती फावल्या वेळीं सकाळ संध्याकाळ निशाण मारण्याची कसरत करी. दिल्लीचा किल्ला यमुनेच्या कांठीं आहे. त्यांत जनानखाना व तिचा महाल यमुनेच्या बाजूलाच होते. एके दिवशीं नदीच्या पैलतीरीं चांद लावून बेगमसाहेब निशाण मारीत होत्या. एक निशाण चुकून गोळी एका धोब्यास लागून तो मेला. धोबीण आक्रोश करीत करीत, किल्ल्याचे दरवाज्यापाशीं आली, व तिनें दोरी ओढून घंटा वाजविली. त्याबरोबर पहारेवाल्यांनीं बादशाहापुढें नेऊन तिला उभें केलें. तिनें हात बांधून अर्ज केला कीं, 'आपल्या जनानखान्यांतून गोळी येऊन माझ्या नवऱ्याला लागली व तो मेला.' चौकशी करतां असें समजलें कीं, नूरजहानच्या हातून गोळी लागून धोबी मेला. तें ऐकतांच बादशाहा फिका पडला. दरबारचे लोक बादशाहाच्या तोंडाकडे टक लावून, आतां हा काय इनसाफ देतो, तें पाहूं लागले. बादशहानें शांतपणानें, एक बंदूक, दारू, गोळी व तोडा शिलगावलेला मागविला; आणि धोबिणीच्या

समोर बंदूक भरून, गोळी घालून, तोंडा चढवून, तिच्यापुढें केली; आणि बादशाहा म्हणाला, 'आमच्या मुसलमानी न्यायशास्त्राप्रमाणें तुला खुनाच्या बदला खून मिळाला पाहिजे. नूरजहाननें तुझ्या नवऱ्याला मारून तुला रंडवा केलें, याचेबद्दल तूं तिचा नवरा मारून तिला रंडवा कर. ही बंदूक भरून तयार आहे, व तिचा नवराही मी तुझ्यापुढें उभा आहें. चलाव बंदूक !'

हें बादशाहाचें भाषण ऐकून सर्व दरबारचे लोक चकित होऊन गेले. धोबिणीनें हात जोडून विनंति केली कीं, मीं खून माफ केला. बादशाहानें नूरजहानच्या नेमणुकींतून धोबिणीस गांव इनाम दिले. ते गांव अद्यापि तिजकडे चालत आहेत."

ही घंटा वाजवून न्याय मागण्याची रीत ह्या न्यायतुलेच्या चित्रांतील न्यायमंदिरांत कायम होती. तेथें घडून आलेल्या शहाजहान बादशाहाच्या न्यायाच्या गोष्टी अनेक प्रसिद्ध आहेत. त्यांतील एक मासल्याकरितां येथें देण्यासारखी आहेः—एकदां एका मनुष्यानें बादशाहाजवळ असा अर्ज केला कीं, 'माझ्या बापाची दोन लक्षांची संपत्ति माझ्या आईजवळ असून, ती माझ्या गैरवर्तनाची सबब सांगून ती मला देत नाहीं; तरी सरकारांनीं ती संपत्ति देववावी.' बादशाहानें बाइस पाचारण केलें, व तिला हुकूम दिला कीं, 'तूं आपल्या पुत्रास पन्नास हजार रुपये दे; आणि एक हजार रुपये सरकारांत दाखल कर.' त्या बाईनें बादशाहास अशी विनंति केली कीं, 'सरकार, आपल्या दरबारांत न्यायाची तुला आहे. तेव्हां येथून जो न्याय मिळेल तो रास्त असणार ह्यांत संशय नाहीं. आपण खुदावंत खाविंद आहांत. माझ्या पुत्रास पन्नास हजार रुपये देण्याबद्दल जो हुकूम झाला, त्याबद्दल माझें कांहीं म्हणणें नाहीं. कारण, तो माझ्या नवऱ्याचा औरस पुत्र आहे. पण खाविंदांनीं मला सरकारांत एक हजार रुपये देण्याबद्दल हुकूम केला, त्याबद्दल माझी एवढीच विनंति आहे कीं, सरकारचें व माझ्या नवऱ्याचें नातें काय आहे तें मला समजावें.' हें त्या बाईचें मार्मिक भाषण ऐकून बादशाहानें तिला ते हजार रुपये माफ केले.

ह्या वरील आख्यायिकेवरून ह्या न्यायतुलेचा उद्देश व तेथील कामाचा मासला समजून येण्यासारखा आहे. ह्या न्यायतुलेचें सुवर्णांकित चित्र पाहिलें म्हणजे वरील आख्यायिकांचें स्मरण होतें.

## रंगमहाल अथवा मोतीमहाल.

हा महाल दिवाणीखास महालाच्या नजीक असून येथें पूर्वी बादशाही जनानखाना होता. दिल्लीपतिच्या पट्टराण्या जेथें वास करीत होत्या, तें स्थळ अतिशय सुंदर असावें ह्यांत नवल नाहीं. ह्या महालामध्यें सुंदर वेलपत्तीचें नक्षीकाम केलेलें असून आग्र्याच्या ताजमहालाप्रमाणें निरनिराळ्या रंगांचे खडे संगमरवरी दगडांमध्यें बसवून त्यास फार शोभा आणलेली आहे. येथील पूर्वीचें काम सर्व रत्नजडित होतें असें सांगतात. त्या वेळीं ह्या महालाचें सौंदर्य अपूर्व असेल ह्यांत शंका नाहीं. सर्व महालामध्यें जागजागीं जडलेलीं विविध रंगांचीं बहुमूल्य रत्नें आपल्या उज्ज्वल प्रभेनें तेथील मूर्तिमंत सुरुचिर स्त्रीरत्नांच्या दिव्य तेजास लाजविण्याचा प्रयत्न करीत; परंतु त्यांत त्यांस कधींच यश न येतां, त्यांस मात्र त्यांच्या लावण्यानें लाजून अगदीं निश्चल व स्तब्ध बसावें लागे ! ह्या तेजोमय रंगमहालाच्या सभोंवतीं आल्हाददायक अशीं सहस्रधारी कारंजीं, सुंदर पुष्पवाटिका, रमणीय लताकुंज आणि सुगंधशीतल वायूचा आनंद उपभोगण्याकरितां जागजागीं केलेलीं आरामस्थानें इत्यादि श्रांत हृदयाचें रंजन करणाऱ्या व स्थलसौंदर्यास परिपोषक अशा गोष्टी बहुविध असत. सांप्रत त्यांपैकीं कांहींच येथें नसून, फक्त हा 'रंगमहाल' मात्र राहिला आहे. ह्या महालांतील 'मुमताजमहाल' 'झिनतमहाल' वगैरे वगैरे सौंदर्यलतिका आजमितीस नामशेष झाल्यामुळें, हा रंगमहाल केवळ नामधारी 'महाल' झाला आहे, हें रसिक वाचकांस सांगावयास नकोच.

## हमामखाने अथवा स्नानगृहें.

दिवाणीखास महालाच्या उत्तरेच्या बाजूस बादशाही हमामखाने ऊर्फ स्नानगृहें आहेत. ह्यांस 'आकाब' असें नांव आहे. ह्या स्नानगृहांचीं तीन दालनें आहेत. प्रत्येक दालनाच्या जमिनीवर संगमरवरी दगडांची फरसबंदी असून त्यांच्या मध्यभागीं मुख्य स्नानगृह आहे. त्यासभोंवतीं नक्षीकाम फारच सुबक केलेलें आहे. ह्या स्नानगृहांमध्यें जमिनींतून पाण्याच्या अनेक नळ्या खेळविल्या आहेत; व त्यांतून उष्णोदकाची व शीतोदकाची फार सुंदर योजना केली आहे. स्नानगृहामध्यें चारी बाजूंनीं पडद्पोशी केली असून उजेडाची योजना वरच्या बाजूनें कांचेच्या खिडक्यांतून केलेली आहे. ह्या कांचा अंधक असून त्यांतून फक्त प्रकाश येतो, परंतु आंतील

स्नानविलास मात्र बाहेरील मनुष्यास दिसत नाहीं. ह्या रम्य स्थानीं गेलें म्हणजे दिल्लीपतींच्या विलासांची अस्पष्ट कल्पना नेत्रांपुढें उभी राहते, व त्या विलासांचा प्रत्यक्ष अनुभव पाहण्याची लालसा उत्साही अंतःकरणांत उत्पन्न होते. ' दिवाणी आम ' दरबारमहालांतील मयूरसिंहासनाचें वर्णन ऐकून, किंवा त्याचें स्थान पाहून, कधीं कोणास, आरबी भाषेंतल्या गोष्टींतील अबूहुसेनप्रमाणें एक दिवस देखील बादशाहा होण्याची इच्छा होत नाहीं; किंवा मोतीमहाल अथवा रंगमहाल पाहून सौंदर्यलतिकांसमवेत बहुविध क्रीडा करणाऱ्या दिल्लीपतीच्या ऐश्वर्याचा हेवा वाटत नाहीं; परंतु हीं सुंदर व मनोवेधक स्नानगृहें व त्यांची व्यवस्था कायम पाहून मात्र, मोंगल बाद-शाहांच्या विलासांचा येथें अनुभव घ्यावा, असें रंगेल प्रेक्षकास वाटल्या-वांचून रहात नाहीं. तेथील स्वच्छ व दुग्धधवल संगमरवराचें मार्दव, आणि प्रशस्त व प्रगमनशील अशी स्नानस्थानरचना इतरत्र क्वचितच पहावयास सांपडेल ! अपूर्व तें अपूर्वच !!

## शाहाबाग आणि शाहाबुरूज.

शाहाबाग आणि शाहाबुरूज हीं ह्या राजवाड्यांपैकीं दोन प्रेक्षणीय स्थळें होतीं. पैकीं शाहाबाग जमीनदोस्त झाल्यामुळें तिचें पूर्वरूप राहिलें नाहीं. परंतु शाहाबुरूज मात्र अद्यापि कायम आहे. बर्नियर नामक फ्रेंच-प्रवाशानें ही बाग स्वतः अवलोकन केली होती. ह्या बागेंतील नानाप्रका-रचीं संगमरवरी कारंजीं आणि निरनिराळे संगमरवरी हौद व त्यांची अ प्रतिम शोभा पाहून तो विदेशीय प्रवासी आश्चर्यचकित झाला होता. ह्या बागेमध्यें एक अष्टकोनी बुरूज होता. त्याचें नांव शाहाबुरूज असें होतें. त्याच्यावरून कालिंदी नदीच्या रमणीय तीराचा सुंदर देखावा दिसत असे. ह्या स्थळीं खुद्द बादशाहाची स्वारी विराजमान होत असे, म्हणून ह्याचें अंतर्बाह्य सर्व काम सुवर्णाचें केलेलें होतें; व त्यामध्यें सुंदर तसबिरी व मोठ-मोठे आरसे लाविलेले होते. ह्या स्थळाचें दर्शन फ्रांक्लिन ह्यानें इ. स. १७९३ मध्यें घेतलें असून, त्याचा उल्लेख त्यानें येणेंप्रमाणें केला आहे:— "शाहाबाग नामक नृपोद्यानामध्यें एक अष्टकोनी बंगली आहे. तिजवरून यमुनेचा देखावा दृष्टीस पडतो. ह्या मंदिराचें नांव शाहाबुरूज अथवा बादशाही महाल असें आहे. ह्याच्या आंतून संगमरवरी दगडांचें काम केलेलें आहे. ह्या मंदिराच्या खिडकींतून राजपुत्र जवानबख्त ह्यानें इ. स.

१७८४ मध्यें उडी टाकून आपली सुटका करून लखनौस पलायन केलें. ह्या मंदिरावर मराठ्यांचे हल्ले झाल्यामुळें त्याचा फार नाश झाला आहे. " हीबर नामक प्रवाशानें त्यानंतर ३१ वर्षांनीं हें स्थल पाहून त्याबद्दल असें लिहिलें आहेः-"येथील बगीचा मीं पाहिला, तो फार मोठा नव्हता, परंतु तो पूर्वीं फार सुंदर व रमणीय असला पाहिजे. येथें नारिंगांचीं जुनाट फळझाडें दिसत होतीं. गुलाबांच्या कुंड्या व इतर पुष्पलतिकाही येथें बऱ्याच होत्या. शुभ्र संगमरवरी दगडांचे पाट बांधून जागोजाग पाणी खेळविलें होतें. बागेमध्यें एक अष्टकोणाकृति सुंदर मंडप किंवा उद्यानगृह होतें. हें फार उंच असून त्याच्या खिडक्यांतून शहराचा व नदीचा उत्कृष्ट देखावा दिसत होता. परंतु आम्ही त्या स्थळीं गेलों, त्या वेळीं तें सर्व अस्वच्छ व अव्यवस्थित दिसत होतें. स्नानगृहें व कारंजीं जलरहित असून अगदीं शुष्क झालीं होतीं. उद्यानमंदिरांतील फरसबंदीवर केर सांचल्यामुळें तेथील नक्षीकाम बुजून गेलें होतें. आणि सभोंवतालच्या भिंतीमध्यें पक्ष्यांनीं घरटीं केलीं होतीं !" सांप्रत हा बगीचा तर पूर्णपणें नष्ट झाला आहे, व फक्त हा 'शाहाबुरुज' हें स्थळ मात्र विपन्न स्थितींत कायम राहिलें आहे. जेथें दिल्लीपतीची स्वारी दररोज हवा खाण्याकरितां बसत असे, तेथें आतां पाकोळ्यांनीं वास केलेला पाहून त्या स्थळास आपल्या दुर्दैवाबद्दल खेद वाटत असेल. त्यांत आश्चर्य तें काय ?

## मोती मशीद.

मोती मशीद ही इमारत खास बादशाहाच्या ईश्वरप्रार्थनेची जागा होती. ही औरंगजेब बादशाहानें इ. स. १६३५मध्यें बांधली व त्यास १६,००,००० रुपये खर्च आला. ही इमारत लहान असून फार टुमदार आहे. मुख्य इमारत तीन कमानींची असून दुजोडी आहे. ह्या कमानींवर व भिंतींवर नक्षीकाम फार साधें पण सुबक केलें आहे. तें पाहून सर्व शिल्पकलाविशारद आनंद-भरानें डोलूं लागतात; व ही मशीद ह्मणजे शिल्पकलेचें एक अद्वितीय रत्न आहे असें ह्मणतात. या मशिदीचा दरवाजा पंचरसी धातूचा असून त्यावरील नक्षीकामही फार मनोरम आहे. इ. स. १८५७ च्या बंडामध्यें ह्या इमारतीवर तोफेच्या गोळ्यांचा भडिमार झाल्यामुळें तिला बराच धक्का बसला आहे. कित्येक दिवसपर्यंत तिची कोणी काळजी न घेतल्यामुळें तिच्या भिंतींवर अश्वत्थाचे कोमल पल्लव दिसूं लागले होते; परंतु सांप्रत

तें स्वरूप बदलून ती पुनः नव्याप्रमाणें दिसावयास लागली आहे. ही मशीद बांधल्यानंतर खुद्द औरंगजेब बादशाहानें तिची प्राणप्रतिष्ठा करून तिच्यामध्यें निमाज पढण्यास सुरुवात केली. तो जेव्हां ह्या राजवाड्यांत असे, तेव्हां मुद्दाम शुभ्र वस्त्रें परिधान करून ह्या मशिदीमध्यें ईश्वरप्रार्थना करीत असे. ह्या त्याच्या प्रार्थनेवरून त्याच्या दारा नामक भावानें त्यास दिलेलें 'निमाझी' हें नांव किती सार्थ होतें, हें दिसून येईल. ह्या मशिदीची दुरुस्ती आतां चांगली झाली आहे.

दिल्लीच्या किल्ल्यांत वर वर्णन केलेलीं स्थळें मुख्य आहेत. ह्याशिवाय तेथें आणखी कांहीं राजवाडे होते, परंतु ते आतां सर्व नाहींसे होऊन, त्यांच्या जागीं इंग्रज शिपायांच्या बराकी झाल्या आहेत. दिल्लीच्या किल्ल्याचें भव्य व जुनें स्वरूप, बाहेरून त्याच्या लाल रंगाच्या कोटावरून किंवा प्रचंड खंदकावरून जितकें व्यक्त होतें, तितकें त्याचें अंतःस्वरूप दिसत नाहीं. ह्याचें कारण, त्यामध्यें इंग्रजी राज्य झाल्यापासून नवीन इमारती फार झाल्या आहेत व जागोजाग पाडापाडही बरीच झाली आहे. तथापि, वर सांगितलेल्या बादशाही इमारती अद्यापि मोंगल–वैभवाची साक्ष पटवीत असून प्रेक्षकांच्या अंतःकरणास प्रसन्न केल्यावांचून रहात नाहींत.

## सालिमगड.

शहाजहान बादशाहाचा राजवाडा आणि यमुनेचा पूल ह्यांच्या दरम्यान सालिमगड नामक एक जुना किल्ला आहे. हा किल्ला शीरशाहाचा पुत्र सालिम ह्यानें बांधिला, ह्मणून त्यास सालिमगड हें नांव प्राप्त झालें आहे. हुमायून बादशाहा दिल्लीस आल्यानंतर, त्याला आपल्या शत्रूच्या पुत्राचें नांव कायम राखणें बरें न वाटल्यामुळें त्यानें तें बदलण्याचा प्रयत्न केला; व 'सालिमगड' ह्या नांवाच्या ऐवजीं त्यानें 'नहरगड' असें नांव ठेविलें. कारण, यमुनातीरीं हा किल्ला असल्यामुळें तें नांव सार्थ होतें. किल्ल्याची रचना मातीची व ओबडधोबड आहे. तथापि त्याचा बाह्य देखावा भव्य आहे. किल्ल्याची जागा यमुनेच्या प्रवाहांत असल्यामुळें हा किल्ला एखाद्या बेटाप्रमाणें दिसतो. येथून नदी ओलांडून येण्यास सुलभ पडावें ह्मणून जहांगीर बादशहानें पांच कमानींचा पूल बांधिला होता. तो मात्र अद्यापि कायम आहे. असो. सालिमगड हा किल्ला जरी विशेष प्रेक्षणीय नाहीं तरी त्याचा इतिहास अतिशय महत्वाचा आहे. लंडन येथें ज्याप्रमाणें

' टॉवर ऑफ लंडन ' म्हणून एक प्रख्यात किल्ला आहे, त्याप्रमाणें ह्यास ' टॉवर ऑफ दिल्ली ' असें नांव देण्यास हरकत नाहीं. ' टॉवर ऑफ लंडन ' किल्ल्यामध्यें ज्याप्रमाणें अनेक राजेलोक व अनेक मुत्सद्दी कैदेंत होते, त्याप्रमाणें ह्या किल्ल्यांमध्यें दिल्लीच्या राजघराण्यांतले पुष्कळ राजपुरुष व दिल्लीदरबारचे सरदार बंदिवासांत होते. शाहाजादा मुराद् हा मद्यपानानें बेशुद्ध असतांना, हत्तीच्या पाठीवर बसवून सालिमगड येथील कैदखान्यांमध्यें आणून ठेविला होता. दाराचा धाकटा मुलगा शेखो ह्याचें औरंगजेब बादशहाच्या मुलीशीं लग्न लावून त्यास ह्याच किल्ल्यामध्यें बंदिवासांत ठेविलें होतें. औरंगजेबाचा वडील पुत्र महंमद् सुलतान ह्यासही ह्याच किल्ल्यामध्यें पंधरा वर्षेंपर्यंत पारतंत्र्यदुःख भोगावें लागलें. याशिवाय राजकारणी व महत्वाकांक्षी मुत्सद्दी येथें किती आले असतील व येथील बंदिवासांत झुरून झुरून किती मेले असतील त्याचा पत्ता नाहीं. इंग्लंडमधील ' टॉवर ऑफलंडन ' किल्ल्यांतील कृष्णकृत्यांचें वर्णन वाचून अंगावर रोमांच उभे रहातात, त्याप्रमाणें सालिमगड किल्ल्याचें वर्णन वाचून वाचकांची स्थिति होईल. राज्यलोभ किंवा अधिकारलोभ अनावर होऊन त्याच्या पायीं जीं अनन्वित कृत्यें घडून आलीं आहेत, त्यांचें प्रदर्शन करण्याकरितांच ' सालिमगड ' अथवा ' टॉवर ऑफ लंडन ' किंवा ' बॅस्टिली ' असले उग्र व भयानक किल्ले अद्यापि अस्तित्वांत आहेत असें वाटतें. भीमरूपी सालिमगडाचा पूर्वीं एवढा दरारा होता, परंतु सांप्रत तो गोगलगाय झाला आहे !

# भाग ३ रा.

## दिल्लीची जुम्मामशीद.

दिल्लीचा राजवाडा पाहून गांवांत आलें ह्मणजे प्रथम ही प्रचंड मशीद दृष्टीस पडते. हिंदुस्थानामध्यें ज्या लोकोत्तर इमारती आहेत, त्यांपैकींच ही एक आहे. ख्रिश्चन लोकांचें सेंटपीटर्सचें चर्च, किंवा हिंदूंचें जगन्नाथाचें देवालय, त्याप्रमाणें मुसलमानांची ही जुम्मामशीद होय. आग्र्याचा 'ताजमहाल' ही सर्वांत उत्कृष्ट इमारत होय. तिच्या खालोखाल ह्या मशिदीची गणना करण्यास हरकत नाहीं. ही सर्व इमारत तांबूस दगडांची असल्यामुळें हिच्यामध्यें असलेलें संगमरवरी दगडांचें काम शालजोडीच्या ठिगळाप्रमाणें दिसतें. ही सर्व इमारत जर शुद्ध संगमरवरी दगडांची असती तर आग्र्याच्या ताजमहालाप्रमाणें हिनें आपल्या धवलप्रभेनें जनमनें वेधून टाकिलीं असतीं. असो. ही मशीद जरी संपूर्ण संगमरवरी दगडांची नाहीं, तथापि तिचें बांधकाम कमी योग्यतेचें अथवा कमी प्रेक्षणीय आहे असें मात्र मुळींच नाहीं. किंबहुना, सर्व दिल्ली शहरामध्यें अत्युच्च इमारत एवढीच असून, ती बाकीच्या इमारतींस आपल्या भव्यपणानें आणि आपल्या आरक्त प्रभेनें लाजवीत आहे असें म्हटलें तरी चालेल.

ही मशीद एका उंच खडकावर बांधली असून तिच्याकरितां तेथील खडक फोडून साफ केला आहे. ह्या मशिदीच्या चारी बाजूंस चार रस्ते आहेत. परंतु हिचीं प्रवेशद्वारें मात्र उत्तर, दक्षिण आणि पूर्व ह्या तीन बाजूंस आहेत. पश्चिमेस मुळींच द्वार नसून नुसत्या उंच दगडांची भिंत बांधिलेली आहे. हा मशिदीचा पश्चिम भाग होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. जीं मुख्य तीन द्वारें आहेत, त्या तिन्ही बाजूंस नदीच्या घाटावरील पायऱ्यांप्रमाणें सलग मोकळ्या पायऱ्या आहेत. मुख्य प्रवेशद्वारें जीं आहेत तीं पितळेचीं ओतीव असून फार प्रचंड व भक्कम आहेत. त्यांपैकीं पूर्वेकडील द्वार फार मोठें व सुंदर आहे. ह्यासच आपण महा दरवाजा म्हणूं. त्या द्वारांतून आंत गेलें म्हणजे एक मोठें पटांगण लागतें. हें पटांगण

१४०० घनयार्ड असून ह्याची फरसबंदी एका नमुन्याच्या तांबूस रंगाच्या दगडांची केली आहे. ह्याच्या मध्यभागीं एक सुंदर संगमरवरी दगडाचा मोठा हौद आहे. ह्यामध्यें खडकांतील जिवंत झऱ्याचें पाणी आणून सोडिलें आहे. ह्या चतुष्कोणी अंगणामध्यें ५००० मुसलमान प्रार्थनेस जमा होऊं शकतील. ह्या इमारतीमध्यें जी मुख्य मशीद आहे, ती ह्या मुख्य पटांगणाच्या पश्चिमबाजूस आहे. ह्याचें कारण मक्का पश्चिमेस आहे, म्हणून त्या दिशेचा बोध व्हावा ह्या हेतूनें तशी रचना केलेली आहे. ही मुख्य मशीद दीर्घ चौकोन असून तिची लांबी २०१ फूट लांब आणि १२० फूट रुंद आहे, तिच्या शिरोभागीं शुभ्र संगमरवराच्या तीन सुंदर मेहेरपी आहेत, व त्यांवर सुवर्णाचा मुलामा दिलेलें नक्षीकाम आहे, दोन्ही बाजूंस दोन मनोरे आहेत. त्यांची उंची १३० फूट आहे, व त्यांवर लहानसे सुबक व सुंदर घुमट आहेत. मशिदीच्या अग्रभागामध्यें दहा दालनें केलीं असून त्यांच्यावरील उंच अर्धवर्तुलाकार कमानी अतिशय सुंदर आहेत.

ह्या इमारतीमध्यें एका शीर्षभागीं काळ्या रंगाच्या दगडांचीं शुभ्ररंगाच्या संगमरवरी दगडावर नस्की भाषेतील अक्षरें काढलेलीं आहेत. त्यांमध्यें ह्या इमारतीस लागलेला खर्च व ती तयार झाल्याचा सन दिलेला आहे. त्यावरून असें समजतें कीं, ह्या इमारतीचें बांधकाम इ० स० १६४४ सालीं सुरू होऊन तें इ० स० १६५० मध्यें समाप्त झालें. सुमारें सहा वर्षेपर्यंत ह्या इमारतीसाठीं ५००० लोक खपत होते ! ह्या इमारतीस त्या वेळच्या भावाप्रमाणें १० लक्ष रुपये खर्च आला आहे.

ह्या मशिदीमध्यें फरसबंदीचें काम सर्व संगमरवरी दगडाचें असून त्यावर तीन फूट लांब व दीड फूट रुंद अशा प्रकारच्या कमानी एका हारीनें काढिल्या आहेत. ही प्रत्येक कमान भोजनसमारंभांतील रांगोळ्यांच्या पंक्तीप्रमाणें दिसत असून, त्यांची एकंदर संख्या ९०० आहे. ह्यांमध्यें निमाज पडण्यास बादशाहा व अमीरउमराव बसत असत. किबल्याजवळ— म्हणजे मध्यभागाच्या अर्धगोलाकृति शिरोभागाखालीं, नक्षीकाम सर्वोत्कृष्ट केलेलें आहे. ह्याच्या सन्मुखभागीं धर्माध्यक्षांचें मुख्य पीठ असून तें एका अखंड संगमरवरी दगडाचें केलें आहे. येथील एका भिंतीवर शहाजहान व बहादुरशाहा ह्यांचीं हस्ताक्षरें दाखविलीं आहेत.

ह्या मशिदीच्या एका दालनामध्यें एक खोली आहे, तेथें जें जाळीकाम केलेलें आहे, तें फार प्रेक्षणीय आहे. ह्या खोलीमध्यें मुसलमान लोकांच्या दृष्टीनें अत्यंत प्रिय अशा महमदाच्या वेळच्या जुन्या वस्तु आहेत. त्यांमध्यें सातव्या शतकांतील जुन्या कुराणाची एक हस्तलिखित प्रत आहे. त्याचप्रमाणें इमाम हुसेन व इमाम हसेन ह्यांनीं लिहिलेल्या कुराणांच्या दोन प्रती आहेत. त्याचप्रमाणें ' कप्प-इ-मुबारक ' म्हणजे महमद-पैगंबराच्या चर्मपादुका सुगंधि द्रव्यांत घालून ठेविल्या आहेत. ' कदम-उल्-मुबारक ' म्हणजे त्याच्या पायाचा ठसा, आणि ' मुइ-इ-मुबारक ' म्हणजे त्याच्या दाढीचे केंस हे ठेविलेले आहेत. तसेंच त्याच्या कबरावरील आच्छादनाचा थोडासा शेषभाग राखून ठेविलेला आहे. तो पहाण्याची जिज्ञासा ज्या प्रेक्षकांस असेल, त्यांस तेथील मुसलमान काजी थोडी दक्षिणा घेऊन अवश्य दाखवितो. ह्या वस्तु शहाजहान बादशाहानें भक्तिपुरस्सर येथें आणून ठेविलेल्या आहेत असें सांगतात.

जुम्मामशिदीचा मोंगल बादशाहीच्या वेळीं फार मान होता. ईदच्या दिवशीं येथें बादशाहा व त्याचे सर्व अमीरउमराव मोठ्या लवाजम्यानिशीं येत असत. त्या वेळीं येथील देखावा फार अपूर्व दिसत असे. येथें प्रत्येक शुक्रवारीं ईश्वरप्रार्थना होत असे. मुसलमान लोक फार धर्मवेडे असल्यामुळें ह्या मशिदींत जमल्यानंतर त्यांच्या ठिकाणीं वाटेल ती प्रेरणा करण्यास ही मशीद समर्थ असे. इ. स. १८५७ च्या बंडाच्या वेळीं सप्टेंबर महिन्यांतील एका शुक्रवारीं येथें खुतबा पढण्यांत आला व दिल्लीच्या सर्व मुसलमानांनीं त्या वेळीं " खुल्क खुदाका मुल्क बादशाहाका, अंमल बहादुरशाहाका " अशी द्वाही फिरविली. त्यामुळें त्या भयंकर प्रसंगीं ही मशीद स्वधर्माभिमानाची व स्वदेशाभिमानाची प्रेरणा करणारी एक मुख्य जागा झाली होती. परंतु ती प्रेरणा क्षणभंगुर होऊन सुदैवानें राजद्रोही बंडवाल्यांचा लवकरच अंत आला. बंडानंतर ह्या मशिदीस जमीनदोस्त करावें असा बूट निघाला होता; परंतु कृपाळु इंग्रजसरकारनें मोंगल रियासतींतील हें अजस्र काम नाहींसें करून, आपली जगभर दुष्कीर्ति न करितां, ही इमारत कायम ठेवून आपलें औदार्य व्यक्त केलें आहे. ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन कोण करणार नाहीं ! बिशप हीबर ह्या प्रवाशानें जुम्मामशिदीचें अलौकिक काम पाहून आनंदभरानें मान डोलविली आहे. त्यानें असे उद्गार

काढलेले आहेत कीं, " ह्या मशिदीचा आकार, तिचा खंबीरपणा, आणि तिच्या बांधकामाचें उंची सामान हीं पाहून माझ्या अवलोकनांत आलेल्या हिंदुस्थानांतील तशा प्रकारच्या दुसऱ्या सर्व इमारतींपेक्षां माझ्या मनावर हिचा अधिक परिणाम झाला. "† रसेल नामक दुसऱ्या एका युरोपियन गृहस्थानें असें लिहिलें आहे " कीं, ह्या इमारतीची विशुद्ध शोभा, तिच्या रचनेंतील प्रमाणसौंदर्य, आणि बांधकामाची उदात्त कल्पकता ह्यांचा व आमच्या ख्रिस्ती प्रार्थनामंदिराच्या क्षुद्र आणि दरिद्री बांधकामाची तुलना केली, म्हणजे दुःखानें खालीं मान घालण्यासारखा विरोध दृष्टीस पडतो. "* अर्थात् परकीयांस देखील ज्या इमारतीच्या रचनाचातुर्याचें इतकें आश्चर्य वाटतें, ती इमारत दिल्ली शहरास किंबहुना सर्व हिंदुस्थानास भूषणप्रद व्हावी हें साहजिक आहे.

## दिल्ली शहर.

दिल्लीचा किल्ला, जुम्मामशीद व सांप्रतचें दिल्ली शहर हे तीन भाग मिळून नवीन दिल्ली ऊर्फ शहाजाहानाबाद हें शहर होतें. ह्या शहरासभोंवतीं जो एक मोठा कोट आहे, त्याचा परिघ ५॥ मैल आहे, आणि त्यांतील किल्ल्याचा कोट १॥ मैल आहे. किल्ल्यास दोन दरवाजे आहेत. त्यांचीं नांवें अनुक्रमें ' लाहोर गेट ' व दिल्ली गेट ' अशीं आहेत. एकंदर शहरास दहा दरवाजे आहेत. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

१–' कलकत्ता गेट ' हा राजवाड्याजवळ असून येथून रेल्वे स्टेशनाकडे रस्ता जातो.

२–' काश्मीर गेट ' हा उत्तरेस असून चर्च व कचेऱ्या ह्यांच्या नजीक आहे.

३–' मोरी गेट ' हाही उत्तरेसच आहे.

---

† "The size, the solidity, and rich materials of the Jumma Musjeed impressed me more than anything of the sort which I have seen in India."—*Bishop Heber.*

* "There is a chaste richness, and elegance of proportion, and a grandeur of design in all its parts, which are painful contrast to the *mesquin* and paltry architecture of our Christian churches."—*Russell.*

४–' काबूल गेट ' हा पश्चिमेस असून ह्याच्या पुढें सदर बाजार लागतो.

५–' लाहोर गेट ' हा पश्चिमेस असून येथून चांदणी चौकाकडे रस्ता जातो.

६–' फरासखाना गेट ' हा नैर्ऋत्य दिशेस आहे.

७–' अजमीर गेट ' हाही नैर्ऋत्य दिशेस आहे.

८–' तुर्कमान गेट ' हा दक्षिणेस आहे.

९–' दिल्ली गेट ' हाही दक्षिणेस आहे.

१०–' राजघाट गेट ' हा पूर्वेस असून येथून यमुना नदीच्या घाटाकडे रस्ता जातो.

किल्ल्यांतून निघून दिल्ली शहरांत प्रवेश करावयाचा म्हटलें म्हणजे लाहोर दरवाज्यांतून यावें लागतें. येथून आंत शिरलें म्हणजे मोठा प्रशस्त रस्ता लागतो. तो रस्ता थेट चांदणी चौकाकडे येतो. दिल्ली शहरांतील नामांकित चौक हा एवढाच होय. येथें श्रीमंत व्यापाऱ्यांचीं व जवाहिरवाल्यांचीं दुकानें आहेत. येथील बादशाही अमदानींतलें वैभव आतां नष्ट झालें आहे, व तें पुनः तेथें येण्याचा संभव फारच कमी आहे. ह्या चौकांतील दुकानें बाहेरून पुष्कळ भपकेदार दिसतात. परंतु ह्या रस्त्यावर पूर्वीं मूल्यवान् पोषाख केलेले अमीरउमराव, त्यांचें भरजरी सामान व सोन्यारुप्याचे अलंकार घातलेले उमदे व शोभिवंत घोडे, त्यांचे शृंगारलेले हत्ती किंवा रंगीबेरंगी मेणे ह्यांची गर्दी या चौकांत आतां मुळींच दिसत नाहीं! त्यांच्याऐवजीं अर्वाचीन एक्के व गाड्या पुष्कळ आहेत. रस्त्यामधून गेलें म्हणजे जिकडे तिकडे नेचेदार हुक्क्यांची गर्दी दिसते. प्रत्येक दुकानांत हुक्का पडलेला असावयाचा. मुसलमान लोकांस ऐषआरामाची फार संवय असल्याचें तेव्हांच दिसून येतें. हे लोक नेहमीं व्यसनासक्त व विलासरंगामध्यें दंग झालेले असे असत. परंतु इंग्रजी अंमलामध्यें विद्येचा प्रसार पुष्कळ झाल्यामुळें मुसलमान लोकांचाही ऐषआराम व व्यसनें आतां पुष्कळ कमी होत चाललीं आहेत, व ते लोक वर डोकें काढूं लागले आहेत. येथील सुशिक्षित लोक सभ्य असून परकीयांविषयीं आदर बाळगणारे असे आहेत. तथापि मुसलमानी रीतीप्रमाणें औपचारिक वर्तन व फाजील आदरसत्कार ह्यांची येथें गर्दी आहे. त्याचप्रमाणें बढाई मारणारांचीही कमतरता

नाहीं. मराठी भाषेमध्यें ' दिल्लीचा लुच्चा ' अशी एक म्हण आहे ती केवळ असत्य आहे असें मानितां यावयाचें नाहीं.

दिल्लीस चांदणी चौकांत उभें राहिलें म्हणजे ' दिल्ली इन्स्टिट्यूट ' नामक एक मोठी प्रचंड इमारत दिसते. ही इमारत युरोपियन तऱ्हेची असून दिल्ली शहरास नवीन तऱ्हेची शोभा आणणारी आहे. येथें वाचन-गृह, पदार्थसंग्रहालय, म्युनिसिपालिटी वगैरे सार्वजनिक संस्था आहेत. ही इमारत ग्रामसंस्थेनें बांधिली असून तिला १,३५,४५७ रुपये खर्च लागला आहे.

' दिल्ली इन्स्टिट्यूट ' ह्या संस्थेच्या समोर चांदणी चौकाच्या बाजूस एक सुंदर व प्रेक्षणीय असा १२८ फूट उंचीचा मनोरा आहे. ह्या मनोऱ्याच्या शिरोभागीं चारी बाजूंस चार प्रचंड घड्याळें असून तीं प्रतिक्षणीं,

घटिका गेल्या, पळें गेलीं, तास वाजे झणाणा ।
आयुष्याचा नाश होतो ' रहिम ' कांहो म्हणाना ॥ १ ॥

ह्या प्रचलित उक्तीप्रमाणें लोकांस जागृत करीत आहेत. ह्या मनोऱ्यास ' क्लॉक टॉवर ' असें नांव असून, तो दिल्लीच्या म्युनिसिपालिटीनें २५,५०० रुपये खर्च करून बांधिला आहे. ह्या मनोऱ्याच्या योगानें चांदणी चौकास जरी बरीच शोभा आली आहे, तथापि पूर्वींच्या मुसलमानी राज्यांत झालेल्या मनोऱ्यांची बरोबरी त्याच्यानें करवत नाहीं.

चांदणी चौकामध्यें जुन्या ऐतिहासिक स्थळांपैकीं, एक रोषनउद्दौवल्याची मशीद आणि कोतवाली हीं दोन स्थळें पाहण्यासारखीं आहेत. रोषनउद्दौवल्याची मशीद ही इ. स. १७२१ मध्यें महमदशाहा बादशाहाच्या कारकीर्दीमध्यें रोषनउद्दौवला जाफर खान ह्यानें बांधिली. ही लहानच पण टुमदार मशीद असून, हिच्या घुमटावर सोन्याच्या मुलाम्याचें काम केलेलें आहे. म्हणून ह्या मशिदीस ' सोनाला ' मशीद असेंही ह्मणतात. नादिरशाहानें ज्या वेळीं दिल्लीवर स्वारी केली, व तेथील प्रजाजनांची कत्तल उडविली, त्या वेळीं त्यानें या मशिदीच्या गच्चीवर उभें राहून तेथून ही कत्तल अवलोकन केली. त्यांचे दीन स्वर ऐकून त्याच्या हृदयांत दयेचा यत्किंचितही पाझर फुटला नाहीं ! उलट त्यांच्या रुधिरप्रवाहाबरोबर त्याच्या आनंदलहरी उचंबळत असत ! ! अशा पुरुषास मानवसृष्टींतील राक्षसावांचून दुसरी कोणतीही उपमा साजणार नाहीं ! ह्या स्थळानजी-

कच कोतवाली म्हणजे शहरच्या पोलिसाचें मुख्य स्टेशन ही इमारत आहे. येथें हडसनसाहेबांनीं इ. स. १८५७ च्या बंडामध्यें बादशाहाचे पुत्र ठार मारून त्यांचीं प्रेतें लोकप्रदर्शनार्थ आणून ठेविलीं होतीं !! बंडाच्या वेळीं ही जागा रक्तबिंदूंनीं कलंकित झाली होती; तथापि आतां शांततादेवी तेथें मूर्तिमंत नांदत आहे.

दिल्ली येथील चांदणी चौक पहाणारास तेथील 'व्हिक्टोरिया बाग' पाहण्याची इच्छा होते. ही बाग इंग्रजी तऱ्हेवर लाविलेली असून नगरवासी जनांच्या विश्रांतीची उत्कृष्ट सोय येथें केलेली आहे. ह्या उद्यानामध्यें नेत्रांचें रंजन उत्तम प्रकारें होतें. त्याप्रमाणें कर्णांचें रंजन होण्याकरितां येथून जवळच एक ' ब्यांडस्यांड ' ची योजना केलेली आहे. तेथें आठवड्यांतील नियमित दिवशीं सुंदर वाद्यनाद ऐकूं येतो, व रंजनप्रिय जनांस संतोष होतो. ह्या बागेंतून अलीमर्दानचा कालवा वाहत असतो. तेणेंकरून येथें उदकसंचय विपुल होऊन विशेष शोभा आली आहे. सुंदर सरिता किंवा रम्य सरोवरें हीं उद्यानश्रीचीं आवडतीं क्रीडाभुवनें आहेत. त्यांवांचून तिचे विलास पूर्ण होत नाहींत ! असो.

ह्या बागेमध्यें एक दगडी हत्ती आहे. त्याच्या पायाजवळ असा लेख कोरिला आहे कीं, ही हत्तीची मूर्ति ग्वाल्हेरहून शहाजहान बादशाहानें इ. स. १६४५ मध्यें आणिली.

ह्याशिवाय चांदणी चौकामध्यें विशेष पाहण्यासारखें असें कांहीं नाहीं.

## काळी मशीद.

दिल्ली शहरांतील चांदणी चौक पाहिल्यानंतर शहराच्या दक्षिणेस काळी मशीद म्हणून एक इमारत आहे, ती पहाण्याकरितां प्रेक्षकजन धांव घेतात. ही मशीद काळी आहे, म्हणून तिला 'काळी मशीद' असें नांव प्राप्त झालें आहे. ही मशीद तुर्कमन गेटाजवळ आहे. 'तुर्कमन' असें ह्या दरवाजाचें नांव पडण्याचें कारण ' शहा तुर्कमन ' नांवाचा एक प्राचीन अवलिया येथें रहात असे. तो इ. स. १२४० मध्यें मृत्यु पावला. त्याची येथें कबर आहे व येथें रज्जब महिन्याच्या २४व्या तारखेस यात्रा भरत असते. ह्या पुरुषावरून ह्या दरवाजास ' तुर्कमन ' असें नांव पडलें आहे. असो. काळी मशीद ही इमारत फार जुनी असून हिचें बांधकाम इ. स. १३८६ सालचें—म्हणजे

फिरोजशाहा तघलखाच्या वेळचें आहे. बाहेरून ही इमारत दोन मजले उंचीची दिसते; परंतु तिचें जोतें मोठें असून प्रार्थनेची जागा त्यावर २८ फूट उंच आहे. एकंदर मशिदीची उंची ६६ फूट आहे. ह्या मशिदीचें काम चौदाव्या शतकांतील शिल्पकलेचें दर्शक आहे. स्टीफन नामक गृहस्थानें, " ह्या मशिदीच्या कमानी व अर्धगोलाकृति शिरोभाग ह्यांची रचना विलक्षण आहे व या इमारतीचे दगड कांहीं अद्भुत प्रकारच्या चुन्यामध्यें बसविले आहेत व त्यांमध्यें पाचर वगैरे कांहीं नाहीं. ह्यावरून चौदाव्या शतकांतील कलाकौशल्याचा मासला दिसून येतो." असें वर्णन केलें आहे. ह्या भिंतीवर तांबड्या रंगाच्या जाळ्या आहेत; परंतु अनास्थेमुळें त्यांचा पुष्कळ भाग नाहींसा होत चालला आहे. ही इमारत भपकेदार नसून अगदीं साधी दिसते. बिशप हीबर ह्यानें " ही मशीद आरबी भाषेंतील गोष्टींमध्यें वर्णिलेल्या मशिदींच्या नमुन्यावर आहे " असें म्हटलें आहे.

## जैन मंदिर.

जुम्मामशिदीपासून एक अरुंद रस्ता जातो त्या रस्त्यावर एक उंच कोट दिसूं लागतो. तेथें हें जैन मंदिर आहे. याचा सभामंडप संगमरवरी दगडाचा असून या देवळामध्यें बुद्धाची मूर्ति नक्षीदार हस्तीदंती मखरामध्यें बसविलेली आहे. हें देवालय हिंदुस्थानांतील इतर जैनमंदिरांप्रमाणेंच बांधिलेलें आहे. फर्ग्यूसनसारख्यांनीं ह्या देवालयांतील कित्येक भाग शिल्पशास्त्राच्या दृष्टीनें वर्णनीय आहेत, असें प्रांजलपणें कबूल केलें आहे. दिल्ली येथें मुसलमानांच्या अंमलाखालीं देखील ह्या देवळाचें संरक्षण झालें ही लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. ह्या प्राचीन जैनमंदिरावरून दिल्ली येथें एक वेळ बौद्ध धर्म चालत होता, ही गोष्ट सिद्ध होते. ह्या मंदिराचें दर्शन प्राचीन इतिहाससंशोधकांस महत्त्वाचें वाटतें. सामान्य जनांस तें विशेष आनंददायक वाटणार नाहीं.

# भाग ४ था.

## इंद्रप्रस्थ.

महाभारतांतील कौरवपांडवांच्या कथांनीं ज्या इंद्रप्रस्थाचें नांव अजरामर केलें आहे, व जें प्रत्येक हिंदूच्या कर्णपथावर अनेक वेळां आलेलें आहे, तें सुप्रसिद्ध नगर दिल्लीच्या दक्षिणेस दोन मैलांवर आहे. येथें पांडवांच्या वेळची धनसंपन्न नगरी आतां राहिली नाहीं. फक्त मुसलमानी किल्ल्याचा जीर्ण झालेला कांहीं भाग व त्यांत कांहीं जुन्या मशिदी आहेत. येथें उत्तुंग देवालयें, किंवा रमणीय उद्यानें वगैरे सांप्रत मुळींच नाहींत. येथील निर्जन व उध्वस्त झालेली परंतु इतिहासदृष्ट्या अत्यंत पवित्र व महत्त्वाची भूमि अवलोकन केली, म्हणजे प्रत्येक हिंदु मनुष्याचें अंतःकरण सद्गदित झाल्यावांचून रहात नाहीं. पांडवांच्या इंद्रप्रस्थावर आपण उभे आहोंत हें पाहून त्यास धन्यता वाटते; व त्या सुंदर नगरीची विपद्वस्था पाहून त्यास अत्यंत खेद उत्पन्न होतो. पांडवांची पुण्यभूमि अवलोकन करण्याच्या उत्सुकतेनें उत्पन्न झालेल्या आनंदलहरी क्षणार्धामध्यें विलय पावतात, आणि तेथें जातांच शोककल्लोळ हृदयांत उत्पन्न होतात. असो. अशी मनाची स्थिति होते, तथापि प्रेक्षकास हें स्थान पहाण्याची जिज्ञासा विशेष असते, व तो दिल्लीस गेल्यानंतर त्याचें अवलोकन केल्यावांचून राहत नाहीं.

इंद्रप्रस्थ नगराचें सविस्तर वर्णन महाभारतांत दिलेंच आहे. तथापि त्याचा अल्पवृत्तांत येथें अवश्य देणें आहे. ह्या शहराची कथा येणेंप्रमाणें आहेः–

" द्रौपदीचें स्वयंवर होऊन द्रौपदीला घेऊन पांडव परत हस्तिनापुराला यावयास निघाले, तेव्हां कौरवराज धृतराष्ट्र ह्यास अशी भीति पडली कीं, आतां हे हस्तिनापुराला आले म्हणजे राज्याच्या वांटणीकरितां आपल्या पुत्रांचें व ह्यांचें भांडण सुरू होईल. तें टाळावें एवढ्याकरितां त्यानें धर्मराजास विदुराकडून असा निरोप पाठविला कीं, तुम्ही हस्तिनापुरास न येतां तेथून थोड्याशा अंतरावर जें खांडववन अथवा इंद्रवन ह्मणून महारण्य

आहे, तें उध्वस्त करून तेथें नवें शहर वसवावें व त्या ठिकाणीं सबांधव राज्य करावें. धर्मराज ते धर्मराजच. त्यांनीं ती गोष्ट तत्काळ मान्य करून तें इंद्रवन जाळून व उध्वस्त करून मोठें थोरलें नगर त्या ठिकाणीं बसविलें. यासच इंद्रप्रस्थ किंवा व खांडवप्रस्थ असें नांव दिलें.महाभारतांतील आदिपर्वाच्या २०७ व्या अध्यायांत ह्या नगराचें वर्णन फारच सुंदर दिलें आहे. कविवर्य मुक्तेश्वर ह्यांनीं आपल्या रसाळ वाणीनें हें शहर कसें वसविलें, ह्या प्रसंगाचें फार चटकदार वर्णन केलें आहे. तें येणेंप्रमाणेः-

## ओंव्या.

कृष्णें स्मरतां अमरनाथ। पातला विश्वकर्म्यासहित ।
ह्मणे सेवा काय ते त्वरित । सांगितली पाहिजे ॥ १ ॥

अच्युत ह्मणे अमरपाळा । निर्जरनगरी भूमंडळा ।
पातली ऐसी रचना डोळा । रचुनी येथें दाखवीं ॥ २ ॥

आज्ञा वंदूनि विश्वकर्मा । निर्मिता झाला धर्मग्रामा ।
तेथील द्यावया उपमा । दुजें दृष्टी दिसेना ॥ ३ ॥

देवकीपुत्र कुंतीपुत्र । पातीं लाउनी उघडती नेत्र ।
इतुकियामाजी चित्रविचित्र । इंद्रप्रस्थ उभविलें ॥ ४ ॥

मनुष्यकरणी करोनि परती । आवडी विश्वकर्म्या हातीं ।
रचिली भूतळीं इंद्रावर्ती । इंद्रप्रस्थ या नांवें ॥ ५ ॥

परिघ पौळीं गृहगोपुरें । सौधें शतखणी दामोदरें ।
मध्यतळघरें उपरिकाकारें । पट्टशाळा देहलिका ॥ ६ ॥

गगनचुंबीत विशाहुडे । वर्तुळ पर्वताचेनि पाडें ।
द्वारीं कनक कपाट जोडे । गर्जता छळाति वैरिया ॥ ७ ॥

लाज सांडोनियां क्षिती । मेघा आड अमरावती ।
रिघाली आणि भोगावती । पातळगर्तीं लपाली ॥ ८ ॥

पश्चात्ताप धरूनि चित्तीं । कुबेराची अलकावती ।
कैलासवनामाजी वसती । करूनि वसे वैराग्यें ॥ ९ ॥

उपवनें अवलोकितां नयनीं । लज्जा दाटली नंदनवनीं ।
सेवूनि मंदाकिनीचें पाणी । तपश्चर्या आचरे ॥ १० ॥

वापीकूप तडाग सरोवरें । अमृतस्वादु सरितानीरें ।
अनेक रंगांचीं कल्हारें । विकासिलीं घमघमती ॥ ११ ॥

हंस कारंडक मयूरें । चातक चक्रवाक चकोरें ।
खंजरीट मधुर स्वरें । कोकिळांचे उमटती ॥ १२ ॥

नहुष ययाति राजेश्वरीं । राज्य केलें याचि नगरीं ।
रमणीयाचिये सरी । पट्टण आन असेना ॥ १३ ॥

ह्या मनोहर वर्णनावरून इंद्रप्रस्थ नगरी कशी होती. हें चांगलें ध्यानांत येईल. मूळ भारतांत तर याहूनही मजेचें वर्णन आहे. मुक्तेश्वराच्या वर्णनांत म्हटल्याप्रमाणें प्रत्यक्ष परमेश्वराच्या आज्ञेनें त्या इंद्रप्रस्थ नगरीची रचना विश्वकर्म्यानें केलेली असो, किंवा ज्याप्रमाणें नगरें वसवावयाचीं म्हटलें म्हणजे हळूहळू वसविलीं जातात, त्याप्रमाणें ती वसविली असो. एवढी गोष्ट उघड दिसते कीं, पांडवांनीं ही इंद्रप्रस्थ नगरी वसाविली व ती अत्यंत सुंदर होती, आणि ती इतकी विलक्षण होती म्हणूनच कौरवांकडे मागितलेल्या गांवांत तिला अगदीं आद्यस्थान मिळालें असावें. पांडवांनीं जो कौरवांस निरोप पाठविला तो असाः—

इंद्रप्रस्थं वृकप्रस्थं जयन्तं वारणावतम् ।
देहि मे चतुरो ग्रामान् पंचमं किंचिदेव तु ॥ १ ॥

" इंद्रप्रस्थ, वृकप्रस्थ, जयन्त, वारणावत हे चार गांव आम्हांला द्याच. मग पांचवें कोणतें पाहिजे तें द्या." ह्याप्रमाणें हीं गांवें कौरवांनीं पांडवांस दिलीं नाहींत, एवढेंच नव्हे, तर सुईच्या अग्रावर रहाण्याइतकी माती देणार नाहीं असें साफ सांगितलें. त्याचा परिणाम भारतीय युद्ध होय.

पांडवांनीं केलेला राजसूय यज्ञ याच शहरांत झाला; व मयासुरानें केलेली विचित्रसभा–जिची खालची जमीन पाण्याप्रमाणें वाटत होती व पाणी जमिनीप्रमाणें वाटत होतें ती याच नगरांत होती. या नगरीचें नांव भारतांत अनेक वेळां निघालें आहे. दुसरीं चार प्रस्थेंही नांवानें मात्र आज हयात आहेत. त्यांच्या जागा सांप्रत दाखविल्या जातात. ह्या प्रस्थांचीं किंवा पतांचीं नांवें पानिपत, सोनपत, तिलपत, बाघपत अशीं आहेत. हीं सर्व दिल्लीच्या टापूंत यमुनेच्या पश्चिम किनाऱ्यावर पसरलेलीं होतीं. "

इंद्रप्रस्थ येथें पांडवांच्या वेळच्या नगरीचा आतां अल्प अंशही राहिला नाहीं. तथापि ह्या स्थलाचें पावित्र्य अद्यापि कायम असून, भाविक हिंदु

जनांच्या दृष्टीनें अत्यंत पूज्य अशा क्षेत्रांमध्यें त्याची अद्यापि गणना आहे. पद्मपुराणामध्यें इंद्रप्रस्थमाहात्म्य वर्णिलेलें असून, त्यांतः-

> यमुना सर्वसुलभा त्रिषु स्थानेषु दुर्लभा ।
> इंद्रप्रस्थे प्रयागे च सागरस्य च संगमे ॥ १ ॥

म्हणजे "यमुना सर्वत्र सुलभ आहे, पण इंद्रप्रस्थ, प्रयाग व समुद्रसंगम या तीन ठिकाणीं दुर्लभ आहे," अशी महती वर्णन केलेली आहे. तेथें यमुनेच्या तीरीं 'निगमोद्बोध' नामक तीर्थ तर प्रसिद्ध असून येथें यात्रेकरू लोक जात असतात. ह्या तीर्थाशिवाय लहान लहान तीर्थें व देवता येथें अनेक आहेत.

दिल्ली शहरांतून इंद्रप्रस्थ पहाण्याकरितां गेलें म्हणजे प्रथम 'लाल दरवाजा' नामक एक जुनाट पण भरभक्कम असा दरवाजा लागतो. हा शीरशाहाच्या राजधानीचा एक प्रसिद्ध दरवाजा होता. ह्या दरवाज्याच्या सन्मुख बाजूस हुमायून पादशाहानें बांधलेला 'पुराणा किल्ला' दृष्टीस पडतो. हेंच प्राचीन इंद्रप्रस्थ होय. ह्या किल्ल्यास हुमायून बादशाहानें 'दिनपन्हा' असें नांव दिलें होतें. हुमायून ह्या किल्ल्यांतून पळून गेल्यानंतर त्याचा प्रतिपक्षी शीरशाहा ह्यानें त्या किल्ल्यास शीरगड अथवा शहागड असें नांव दिलें होतें. प्रथमतः १५३३ मध्यें हुमायूननें हा किल्ला बांधण्यास सुरुवात केली व पुढें सात वर्षांनीं शीरशाहानें त्यावर उत्तम तटबंदीचें काम करून त्यास शोभा आणिली. ह्या तटाचा घेर सुमारें एक मैल आहे. ह्या किल्ल्याच्या मध्यभागीं ह्मणजे इंद्रप्रस्थाचे भूमीवर आज राजमंदिरांचे सुवर्ण कळस चमकत नसून त्या जागीं सांप्रत अकिंचन जनांच्या पर्णकुटिका मात्र दिसून येतात !

ह्या किल्ल्यामध्यें 'किल्ला कोना मशीद' व शेरमंदल अशा दोन जुन्या प्रेक्षणीय इमारती आहेत. ह्यांपैकीं पहिली इमारत तांबूस व संगमरवरी दगडांची असून तिचें बांधकाम मोठ्या कुशलतेचें आहे. ही पठाण बादशाहाच्या कारकीर्दींत इ. स. १५४० मध्यें तयार झाली. शिल्पकलाप्रवीणांच्या दृष्टीनें हिच्या कामाची योग्यता फार असून, हिंदुस्थानांतील शिल्पकलेच्या इतिहासाचे कर्ते मि. फर्ग्यूसन यांनीं ह्या इमारतीची फार तारीफ केली आहे. त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, इटली देशांतील लोक,

ज्याप्रमाणें व्हेनिस येथील 'कॅपनॉइल' नामक अत्युच्च राजवाडा हा आपल्या राज्यसत्तेचें व विजयवैभवाचें दर्शक समजत असत, त्याप्रमाणें पठाण लोक ह्या मशिदीचा अत्युच्च मनोरा हा प्रार्थनामंदिराचा नुसता एक भाग न मानितां, आपल्या अभ्युदयाचा व राजसत्तेचा एक कीर्तिस्तंभ आहे असें मानीत असत; व त्यांचा धर्मोपदेशक ह्या मनोऱ्यावरून सर्वांस प्रार्थनेस येण्याबद्दल मोठ्या तालसुरानें पाचारण करीत असे. त्यामुळें बादशाहांस देखील आपल्या राजवाड्यांतून मोठ्या त्वरेनें येथें यावें लागत असे. हुमायून बादशाहा ह्या मशिदीजवळच्या शेरमंदल राजवाड्यामध्यें राहत असे. त्यास ह्या मशिदीच्या मनोऱ्यावरून प्रार्थनेस येण्याबद्दल काजीसाहेबांचें आव्हान झालें. त्यासरशीं तो गडबडीनें उठून राजवाड्यांतून धांवत धांवत येत असतां जिन्यांतून खालीं पडला, व त्या योगानें इजा होऊन ता० २६ जानेवारी इ. स. १५५६ मध्यें मृत्यु पावला.

इंद्रप्रस्थ येथें दृश्यमान असणारीं वर सांगितल्याप्रमाणें मुसलमानी अमदानींतील ऐतिहासिक स्थळें अवलोकन केलीं, म्हणजे प्रेक्षकांस एक प्रकारचा उद्वेगजनक देखावा दृष्टीस पडतो. अर्जुनानें जेथें उभें राहून आपल्या गांडीव धनुष्यानें इंद्रप्रस्थ नगरीच्या कोटाचें संरक्षण केलें, तेथें आतां 'किल्ला कोना मशीद्' दृष्टीस पडते. ज्या महालामध्यें भगवान् श्रीकृष्ण आणि पांडव ह्यांचे हितमंत्र चालत असत, त्या महालाचे ठिकाणीं शेरमंदल अथवा शीरशाहाचा राजवाडा उभा आहे. ह्या राजावाड्यापुढें सांप्रत जी पडकी जागा दिसत आहे त्या स्थलीं राजसूय यज्ञाचा समारंभ झाला होता. अशी तेथील लोक माहिती सांगतात. ती ऐकून फार विलक्षण विरोध दृष्टीस पडतो. कालचक्राचा महिमा किती अतर्क्य आहे हें ह्या इंद्रप्रस्थ नगरीच्या विपर्यासावरून आज दिसून येतें. जेथें बहुविध राजकारस्थानें झालीं, जेथें अनेक राजक्रांत्या झाल्या, जेथें लक्ष्मी मूर्तिमंत वास करीत होती, जेथें,

रम्याश्च विविधास्तत्र । पुष्करिण्यावनावृताः ।
तडागानि च रम्याणि । बृहन्ति सुबहूनिच ॥ १ ॥

अशी स्थिति होती, जेथें रत्नांचें तेज चमकत असे, आणि शस्त्रांचा दिव्य प्रकाश लकलकत असे, तेथें आतां दोन यवनमंदिरें आपल्या गतवैभवाचा

शोक करीत उभीं आहेत ! दिल्लीचा 'पुराणा किल्ला' नांवाप्रमाणें जुनापुराणा होऊन शनैः शनैः विनाशपंथास लागला आहे व तेथील सर्व भूप्रदेश निर्जन होऊन भयानक दिसत आहे, हें पाहून कोणाचें हृदय दुःखपूरित होणार नाहीं ? व कोणाच्या मुखांतून आंग्ल कवीनें वर्णिल्याप्रमाणें दुःखोद्गार निघणार नाहींत !

"The Niobe of nations ! there she stands,
Childless and crownless, in her voiceless woe,
An empty urn within her wither'd hands,
Whose holy dust was scatter'd long ago ;
The *Pandawa's* tomb contains no ashes now ;
The very sepulchres lie tenantless
Of their heroic dwellers : dost thou flow,
Old *Jumna* ! through a marble wilderness ?
Rise, with thy *azure* waves, and mantle her distress."

# भाग ५ वा.

## दिल्लीच्या सभोंवतालचीं स्थळें.

### हुमायून बादशाहाची कबर.

इंद्रप्रस्थ नगरी अथवा पुराणा किल्ला अवलोकन करून प्रवासी जन बहुधा हुमायून बादशाहाची कबर पहाण्याकरितां येतात. त्या स्थलापासून ती एक मैल अंतरावर आहे. तेथून इकडे येतांना मध्यंतरीं 'लाल बंगला' म्हणून इमारत लागते. येथें हुमायून व शहाअलम ह्या दोन बादशाहांच्या राण्यांच्या कबरी आहेत. येथून 'आरबकी सराई' नामक एक लहानसें गांव आहे. ह्याचे दोन दरवाजे प्रेक्षणीय आहेत. हें गांव हुमायून बादशाहाच्या पत्नीनें वसविलें. येथें आरब लोक रहात असत, ह्मणून या ठिकाणास 'आरबकी सराई' असें नांव पडलें आहे. येथून हुमायून बादशाहाची कबर अगदीं नजीक आहे.

ह्या कबरींत शिरतांना दुसऱ्या द्वाराजवळ एक लेख दृष्टीस पडतो. त्यावरून ही इमारत हामिदा बानू बेगम ऊर्फ हाजी बेगम नामक हुमायून बादशाहाच्या राणीनें आपल्या पतीच्या स्मारकार्थीत्यर्थ बांधिली. ह्या इमारतीचें काम १६ वर्षे चालू असून त्यास १५ लक्ष रुपये खर्च झाला. हामिदा बानू बेगम व राजघराण्यांतील कित्येक पुरुष ह्यांच्याही कबरा येथेंच आहेत. ही इमारत मोंगल बादशाहींतील शिल्पशास्त्राचा अगदीं प्रारंभींचा नमुना होय. ही इमारत चौकोनी असून हिच्या चारी बाजूंस अष्टकोनाकृती कोपरे आहेत. हिचा गाभारा अथवा मध्यभाग अष्टकोनी असून, त्यावर एक अर्धगोलाकृति शिखर किंवा घुमट आहे. त्याच्या चारी बाजूंस चार अष्टकोनी मनोरे आहेत. ह्या इमारतीची आंखणी फार उत्तम असून तिच्याच नमुन्यावर ताजमहाल बांधिला आहे. ह्या इमारतीमध्यें व ताजमहालामध्यें एखादी ग्राम्य स्त्री व राजकुलांतील ऐश्वर्यसंपन्न भुवनसुंदरी ह्यांच्याइतका फरक आहे. ताजमहालामध्यें जी कल्पकता व जें कवित्व

आहे, तें हिच्यामध्यें मुळींच नाहीं. तथापि ही कबर भव्य असून आपल्या साधेपणानें देखील प्रेक्षकांचें चित्त आकर्षित केल्यावांचून रहात नाहीं.

हुमायून बादशाहाच्या थडग्याच्या साधेपणामध्यें देखील एक प्रकारची मौज आहे. हा साधेपणा फार मनोरम असून प्रेक्षणीय आहे. अकबराची शिकंदरा येथील कबर किंवा जहांगिराची शहादरा येथील कबर ह्या इमारती देखील साध्या आहेत. परंतु त्यांच्या साधेपणापेक्षां ह्या इमारतीचा साधेपणा अधिक मोहक आहे. ह्या इमारतीमध्यें जागोजाग जें संगमरवरी दगडाचें काम केलेलें आहे, तें फार रसिकपणाचें असून त्यानें ह्या इमारतीची शोभा अधिक वाढली आहे. पठाण राजांनीं ज्या इमारती बांधिल्या, त्यांतील कुतुबमिनार शिवायकरून, बाकी सर्व ह्या मोंगल शिल्पकलेच्या पहिल्या कामापुढें रद्द पडतात. कनिंगह्यामसाहेबांनीं ह्या इमारतीच्या शिल्पकामामध्यें प्राचीन शिल्पकामापेक्षां कांहीं नवीन सुधारणा झाल्याबद्दल उल्लेख केला आहे. त्या सुधारणा ह्या कीं, मुख्य इमारतीच्या चारी कोंपऱ्यांवर चार मेघडंबरी मनोरे इमारतीमध्यें कल्पिले आहेत, आणि मुख्य इमारतीचे घुमट किंवा डेरा ह्याची बैठक अरुंद केली आहे. ही इमारत प्रशस्त व भरभक्कम असल्यामुळें दुरून फार सुंदर दिसते; परंतु ताजमहालामध्यें जो खुलेपणा व हवाशीरपणा आहे, तो येथें नाहीं.

हुमायून बादशाहाची प्रियपत्नी किंवा महाप्रतापी अकबराची माता हमिदा बानू बेगम हिनें ही कबर बांधली म्हणून वर सांगितलेंच आहे. तिची कबरही ह्याच इमारतीमध्यें आहे. ह्या बेगमेचें आपल्या पतीवर एकनिष्ठ प्रेम होतें, म्हणून ती त्याच्या सन्निध चिरवास करीत आहे, असें प्रेक्षकांस दिसून येतें.

ह्याच इमारतीमध्यें दारा, फिरोकशीर, रफिउद्दरजात आणि रफिउद्दवला, दुसरा अलमगीर इत्यादि बादशाहांच्या कबरी आहेत. ह्या सर्वांमध्यें हुमायून बादशहाची कबर तेवढी हृदयाकर्षक दिसते. बाकीच्या त्या बादशाहांच्या योग्यतेप्रमाणें अगदीं सामान्य आहेत. ज्यांनीं कांहीं सत्कृत्यें केलीं नाहींत, ज्यांच्या हातून प्रजेचें कल्याण झालें नाहीं, किंवा ज्यांच्या हातुन दुसऱ्यावर उपकार घडले नाहींत, त्यांची कीर्ति क्षणभंगुर असावी ह्यांत आश्चर्य तें काय ?

# शेख निजामुद्दीन अवलिया ह्याचा दरगा.

शेख निजामुद्दीन अवलिया ह्याचा दरगा हा दिल्ली येथें फार प्रसिद्ध आहे. शेख निजामुद्दीन अवलिया हा एक प्रख्यात साधु महमद तघलखाचे कारकीर्दींत इ. स. १३२१ चे सुमारास होऊन गेला. हा पुरुष मोठा साधु होता म्हणून त्याची कीर्ति आहे. हा फरिदुद्दीन गुंजशक्कर म्हणून एक सुप्रसिद्ध अवलिया होता त्याचा चेला होता. हा गुंजशक्कर अवलिया लोकोत्तर पुरुष असून तो मंत्रसामर्थ्येंकरून मातीच्या गोळ्याची साखर करीत असे, अशी दंतकथा सांगतात. ह्याची गुरुपरंपरा अजमीर येथील मोइनुद्दीन सत्पुरुषापर्यंत पोहोंचते. मोइनुद्दीन चिस्ती हा अजमीर येथें मुसलमान लोकांचा अत्यंत वंद्य व परमपूज्य साधु होता. हा सत्पुरुष त्याचा परंपरेनें शिष्य होता. म्हणून ह्याजविषयीं लोकांची फार भक्ति असे. हा फार दानशूर असून ह्याचा खर्च एखाद्या राजापेक्षांही जास्त होता. ह्याचें लोकांवर वजन जास्त होतें म्हणून म्हणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं म्हणा, तघलख बादशाहास ह्याचा फार मत्सर वाटे. तेव्हां त्यानें दिल्लीस जाऊन ह्या अवलियाचें प्रस्थ नाहींसें करण्याचा निश्चय केला. बादशाहा स्वसैन्यानिशीं ह्या अवलियावर चालून येत आहे असें जेव्हां त्याच्या शिष्यमंडळीस समजलें, तेव्हां त्यांनीं ह्या साधुमहाराजांस सांगितलें कीं, बादशाहाची तुमच्यावर फार गैरमर्जी झाली आहे; तुम्हीं दिल्लींतून निघून जावें. त्या वेळीं ह्या अवलियानें शांत व धिमेपणानें असें उत्तर दिलें कीं, "दिल्ली दूर अस्त" म्हणजे दिल्ली अद्यापि फार लांब आहे. बादशाहा दिल्लीस येईल तेव्हां पहातां येईल. आणखी चमत्कार असा झाला कीं, बादशाहा अखेर दिल्लीस आलाच नाहीं. त्याचा दिल्लीस येण्यापूर्वींच त्याच्या मुलानें खून केला ! ! भाविक व श्रद्धाळू लोक असें समजतात कीं, ह्या साधुपुरुषाचा छळ करण्याच्या बुद्धीनें तो येत होता म्हणून त्यास असें प्रायश्चित्त मिळालें. स्लीमनसाहेबांचें असें मत आहे कीं, हा साधु ठक लोकांचा पुढारी होता व त्याच्या संमतीनें बादशाहाचा वध झाला. खरी गोष्ट कांहीं असो, परंतु ह्या साधूविषयीं आजमितीपर्यंत लोकांची पराकाष्ठेची भक्ति असून तो त्यांच्या दृष्टीनें फार पूज्य आहे. ह्या साधूनें "दिल्ली दूर अस्त" म्हणून जे शब्द उच्चारिले होते, ती एक सांप्रत म्हण होऊन राहिली आहे व तिचा अर्थ इंग्रजी भाषेंतील

" There is many a slip between the cup and the lip."

ह्या म्हणीप्रमाणें आहे. असो. हा साधु इ. स. १३२४ मध्यें सुमारें ब्याण्णव वर्षांचा होऊन मृत्यु पावला. ह्या साधूच्या कबरस्थानावर हा दरगा बांधण्यांत आला आहे. म्हणून ह्यास निजामुद्दीन अवलियाचा दरगा असें नांव पडलें आहे. हा दरगा सांप्रत दिल्लींतील एक प्रेक्षणीय स्थान होऊन राहिला आहे.

निजामुद्दीन अवलियाचा जेथें दरगा आहे, तेथें सांप्रत एक खेडेगांव वसलें आहे व तेथें प्रतिवर्षी मोठी यात्रा जमत असते. मुख्य दरग्याचें जें प्रवेशद्वार आहे, त्यावर इ. स. १३७८ हा सन आहे. तो फिरोजशाहा तघलख ह्या बादशाहानें बांधिला. ह्याजवळ एक लहानसा तलाव आहे. तो पूर्वींचा जुना असून त्याचें पाणी अवलियाच्या शापानें खारट झालें असें सांगतात.

मुख्य दरवाज्यानें आंत गेलें म्हणजे कांहीं लहान थडगीं व मशिदी लागतात. तेथेंच शहाजहान बादशाहाची पट्टराणी बाई कोकळदेवी हिची कबर आहे. ही कबर फार सुंदर आहे. येथें जवळच एक बावडी अथवा विहीर आहे. हिचें नांव ' चष्मदिलखुष ' असें आहे.

ह्या बावडीवर हिजरी सन ७१३ म्हणजे इ. स. १३१२ हा सन आहे. येथें पाण्यामध्यें एक कमान आहे. तिजवरून तळघरांत पाणी नेलें आहे असें सांगतात. तेथून पुनः दोन दरवाजे लागतात. ते ओलांडून आंत गेलें म्हणजे मुख्य दरवाजा लागतो. ही इमारत दुरून फार प्रेक्षणीय दिसते. हिच्या कमानी, त्यांवरील नक्षीकाम व मुख्य घुमट हीं फार चांगलीं आहेत. ही इमारत हुबेहूब मुसलमानांच्या ताबुतांप्रमाणें आहे. हिच्या मध्यभागीं निजामुद्दीन अवलियाची मुख्य कबर आहे. ही कबर फार जुनी असून तिच्या वरील इमारत कांहीं अकबर बादशाहाचे कारकीर्दींत व कांहीं शहाजहान बादशाहाच्या कारकीर्दींत बांधण्यांत आली. येथील मुख्य कबरीवर भरजरीचीं वस्त्रें व पुष्पमाळा घालितात व पुष्कळ मुसलमान लोक भक्तिभावानें तेथें कांहीं फकीरफुकरा वांटितात. येथें औरंगजेब बादशाहानें मजलिसखाना म्हणून एक महाल बांधिला आहे. ह्या इमारतीवर कोठेंच लेख वगैरे कांहीं नाहींत. परंतु दोन ठिकाणीं "किब्लाहगाह-इ-खास-ओ-आम " म्हणजे " लहान थोरांच्या प्रार्थनेची जागा "

व " कबर-इ-शेख " म्हणजे " साधूची कबर " एवढी अक्षरें आहेत. येथें जो वार्षिक उत्सव होतो तो पहाण्यासारखा असतो.

निजामुद्दीन अवलियाच्या दर्ग्याजवळच दुसरी एक, जमातखाना म-शीद् म्हणून इमारत आहे. हीही फार सुंदर व प्रेक्षणीय आहे. ही खिजरखानानें बांधली असें म्हणतात. येथील सर्वच काम सुरेख आहे. ह्या इमारतीच्या दरवाज्यावर हिंदु देवांच्या मूर्ति आहेत. व ह्या इमारतीच्या मध्यभागीं एक सोन्याचा प्याला टांगलेला आहे. हा अगदीं प्राचीन आहे असें सांगतात.

## जहानरा बेगम हिची कबर.

शेख निजामुद्दीन अवलिया ह्याच्या दर्ग्याच्या दक्षिणबाजूस पुष्कळ मोठमोठ्या लोकांच्या व राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांच्या कबरी आहेत. ह्या कबरींमध्यें शहाजहान बादशाहाची आवडती मुलगी जहानरा बेगम हिची कबर आहे. ही फार पितृभक्त असून बादशाहाच्या बंदिवासामध्यें त्याच्या सन्निध असे. हिची कबर अगदीं साधी असून तिच्यावर आच्छा-दन मुळींच नाहीं. उलट तिच्या मध्यभागीं गवत लावण्याकरितां मोकळी जागा ठेविली आहे. ह्या कबरीचा जो मुख्य दगड आहे तो सहा फूट लांबीचा असून त्याच्या शिरोभागीं आरबी भाषेमध्यें 'परमेश्वरच जीवित आणि परमेश्वरच पुनर्जन्म ' असें लिहिलें आहे. ह्याखालीं 'मिम् ' हें कुराणां-तील सांकेतिक अक्षर आहे. व त्याखालीं फारसी भाषेमध्यें खालील अर्थाचा मजकूर आहे:--

"Save the green herb, place naught above my head
Such pall alone befits the lowly dead;
The fleeting poor Jehanarah lies here
Her sire was Shah Jahan and Chist her Pir
May God the Ghazi monarch's proof make clear."

ह्या लेखाचा मुख्य आशय एवढाच आहे कीं, माझ्यासारख्या क्षुद्रजना-च्या कबरीवर श्रीमंती आच्छादन दुसरें कांहींच नको. फक्त सृष्टिसुंद-रीचा तृणावृत हिरवा शेला पुष्कळ झाला. ह्या राजकन्येची ही लीनता व रसिकता पाहून 'विनयो हि सतिव्रतम् ' ह्या उक्तीचें स्मरण होऊन प्रेक्ष-

कास कौतुक वाटल्या वांचून रहात नाहीं. ह्या थडग्यावर जो सन आहे त्यावरून तें इ. स. १६८१ मध्यें बांधलें असें दिसून येतें.

जहानराच्या कबरीच्या डाव्या बाजूस शहाआलम बादशाहाचा मुलगा मिर्झा अलीगोर ह्याची कबर व उजव्या बाजूस जमिलू-उ-निस्सा नामक अकबरशाहाच्या दुसऱ्या मुलीची कबर आहे. ह्या कबरीच्या नजीक, पूर्वेच्या बाजूस महमदशाहा बादशाहा ह्याची कबर आहे. हा अभागी बादशाहा इ. स. १७४८मध्यें मृत्यु पावला. मयूरसिंहासनावर बसणारा शेवटचा बादशाहा हाच होय. त्याच्या कबरीजवळ ह्याची जी मुलगी नादिरशाहाच्या मुलास दिली होती तिची कबर आहे. ह्या कबरीचें प्रवेशद्वार संगमरवरी दगडांचें असून त्यावर वेलबुट्टीचें काम फारच नामी केलें आहे. ह्यानजीक तिसरी कबर आहे. ती दुसऱ्या अकबरशाहाचा मलगा शहाजादा जहांगीर ह्याची आहे. हा मुलगा विक्षिप्त असून ह्यानें दिल्लीचे रेसिडेंट मि. मेटन ह्यांच्यावर गोळी झाडली होती, म्हणून त्यास अलाहाबादेस नेऊन ठेविलें होतें.

## कवि खुशरू ह्याची कबर.

हीं स्थळें अवलोकन करून मुख्य पटांगणांत शिरलें म्हणजे तेथें ‘चबुत्रायारानी ’ आणि कवि खुशरू ह्याची कबर हीं दोन रम्य स्थळें दृष्टीस पडतात. ह्याशिवाय तेथें आणखी साधुसंतांच्या वगैरे बऱ्याच कबरी आहेत. चबुत्रायारानी ह्या ठिकाणीं निजामुद्दीन अवलिया व त्याचे मित्र बसत असत. त्यावरून त्यांस “मित्रांचा चबुत्रा” असें अभिधान प्राप्त झालें. अमीर खुशरू हा हिंदुस्थानांतील एक प्रख्यात कवि होता. ह्याच्या मधुर कवितेवरून त्यास ‘तुति-इ-शक्कर-मकाल’ म्हणजे ‘मधुरभाषी पोपट ’ असें नांव मिळालें होतें. त्याच्या थडग्यावर ‘ अदिम्-उल-मिसल ’ म्हणजे ‘ अद्वितीय पुरुष ’ असेही शब्द लिहिले आहेत. ह्या नांवावरून फारसी भाषेमध्यें हिजरी शक ७२५ हा सिद्ध होतो. तो त्याचा मृत्यूचा सन ( इ. स. १३२४ ) होय. अमीर खुशरू हा शेख निजामुद्दीन ह्याचा प्रिय मित्र होता. ह्यानें महमद तघलख बादशाहाच्या राजवाड्यांत इतस्ततः भ्रमण करून अनेक प्रासादिक पद्यें तयार केलीं आहेत. कवितादेवी त्यावर पूर्ण प्रसन्न असे. तघलख बादशाहाच्या राजवाड्यामध्यें देवलदेवी नामक गुजरा-

थच्या राजाची एक लावण्यवती राजकन्या होती. ही ह्या कवीच्या कवित्व-स्फूर्तीचें मुख्य कारण होय असें म्हणतात.

ह्या सौंदर्यलतिकेवर त्यानें फार सुंदर कविता केल्या आहेत असें सांगतात. ह्याच्या कविता फार प्रेमळ व मधुर आहेत; व त्या अद्यापि लोकांच्या तोंडून ऐकूं येतात. हिंदुस्थानामध्यें इतके कवि झाले व त्यांच्या काव्यांनीं त्यांची कीर्ति अमर करून ठेविली आहे, तथापि त्यांच्या कबरी किंवा समाधि किंवा वृंदावनें फार क्वचित् दृष्टीस पडतात. गीतगोविंदाचा कर्ता जयदेव कवि ह्याची समाधि पूर्व प्रांतामध्यें असल्याची माहिती मिळते, व कवि खुशरू ह्याची कबर दिल्ली येथें प्रत्यक्ष पहाण्यांत येते. ह्याशिवाय हिंदुस्थानच्या सुप्रसिद्ध कवींचीं स्मारकमंदिरें कोठें दिसत नाहींत. सुभाषितामध्यें एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहेः—

जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ।
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥ १ ॥

म्हणून आमच्या कवींच्या स्मारकमंदिरांची जरूर नाहीं असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. संस्कृत कवि कालिदास, भवभूति, दंडी, बाण व मराठी कवि वामनपंडित, मोरोपंत, मुक्तेश्वर ह्यांचीं स्मारकमंदिरें असतीं तर त्यांच्या दर्शनानें प्रेक्षकजनांस किती आनंद झाला असता ! आजमितीस दिल्ली येथें कवि खुशरू ह्याची मनोरम कबर पाहिली ह्मणजे जणूं तिचें सौंदर्य प्रेक्षकजनांस ह्या कवीच्या काव्यमाधुर्याचें स्मरण देण्याकरितां पाचारण करीत आहे असें वाटतें. परंतु खुद्द कबरीचा गाभारा पाहिला म्हणजे त्यांतून निघणारा मंजुळ प्रतिध्वनि संस्कृत कवीच्या वाणीनें—

वाणी ममैव सरसा यदि रंजयित्री
न प्रार्थये रसविदामवधानदानम् ।
सायंतनीषु मकरन्दवतीषु भृंगाः
किं मल्लिकासु परमंत्रणमारभन्ते ॥ १ ॥

म्हणून सांगत आहे कीं काय, असा भास होतो. असो.

कवि खुशरूच्या कबरीचें दर्शन घेऊन बाहेर आल्यानंतर थोड्याच अंतरावर दौरानखान व अजमखान ह्या प्रसिद्ध पुरुषांच्या कबरी लागतात. नंतर तेथून दोन फुटांच्या अंतरावर गेलें ह्मणजे 'चौसट खंबा' नामक एक दरगा

लागतो. ह्या इमारतीमध्यें चौसष्ट खांब आहेत. म्हणून हिला 'चासष्ट खंबा' असें नांव प्राप्त झालें आहे. हिचें बांधकाम व रचना शहाजहान बादशाहाच्या वेळच्या इमारतींप्रमाणें सुंदर व मनोहर असून, जणूं काय 'दिवाणी खास' ह्या सौंदर्यमंदिराचा हा अगोदर केलेला नमुनाच आहे कीं काय, असा भास होतो. ह्या इमारतीमध्यें सर्वत्र शुभ्र संगमरवरी दगडांचें काम असून हिचा आकार चौकोनी आहे. ह्या इमारतीमध्यें अकबर बादशाहाच्या सेनापतीचा मुलगा अझीमखान याचें थडगें आहे. हा अझीमखान गुजराथचा गव्हर्नर होता. हा जुन्या धर्माचा अभिमानी असल्यामुळें त्यास अकबर बादशाहाची नवीन धर्मसुधारणा पसंत नसे. परंतु अकबरानें त्यास कोणत्याही प्रकारचा आग्रह न करितां त्याच्या मताप्रमाणेंच त्यास वागूं दिलें. हा मनुष्य फार धार्मिक असून गरीब लोकांस अन्नदान करीत असे व मोहरा वांटीत असे. म्हणून याच्यासंबंधानें दिल्लींतील गरीब लोकांच्या तोंडीं

" कोकलतश अझीमखानिखाना
जिस्का खानामे बताना "

म्हणजे "परोपकारी अझीमखान हा गरीबांना नुसता खाना देत नाहीं, तर त्यांत पैसे घालून देतो" अशा अर्थाची म्हण पडली आहे. जे राजे लोक अथवा श्रीमान् लोक आपापल्या द्रव्याचा विनियोग परोपकाराकडे करितात, त्यांची कीर्ति लोकांच्या मुखामध्यें सतत रहावी ह्यांत आश्चर्य नाहीं.

## सफदरजंगाची कबर.

हुमायून बादशाहाच्या कबरीपासून जो शेवटपर्यंत रस्ता जातो त्याचे टोंकास नबाब मनसूरखान ऊर्फ सफदरजंग ह्याची कबर आहे. नबाब सफदरजंग हा दिल्लीच्या राजकारणांतील एक प्रख्यात सूत्रधार असून अयोध्येचा पहिला नबाब सादतखान ह्याच्यामागून त्याच्या गादीचा मालक झाला. दिल्लीचा बादशाहा अहमदशाहा ह्याचा हा मुख्य वजीर व सल्लागार असल्यामुळें दिल्ली येथील राजकारणांत ह्याचें फार प्राधान्य असे. हा दिल्ली येथें इ. स. १७५३ सालीं मृत्यु पावला. त्याची ही कबर त्याचा पुत्र व अयोध्येचा तिसरा नबाब सुजाउद्दौला ह्यानें तीन लाख रुपये खर्च करून बांधिली आहे. ह्या इमारतीचें काम कोणी बल्लाल महमदखान नामक इसमाकडे होतें.

ह्या इमारतींत सफदरजंगाची बायको खुजिसा बानू बेगम हिचीही कबर आहे. ह्या कबरीची रचना ताजमहालाच्या नमुन्यावर आहे व हिचे मध्यभागांतील संगमरवरी काम व त्यांत तांबूस रंगाची मिसळ फार शोभायमान दिसते. ह्या इमारतीचे चारी कोंपरे जितके सुंदर दिसावेत तितके ते सुंदर दिसत नाहींत; तथापि एकंदर मशीद प्रेक्षणीय आहे ह्यांत शंकाच नाहीं. ह्या इमारतीच्यावर गेलें म्हणजे सभोंवतालचा देखावा फारच मनोहर दिसतो. ह्या इमारतीची उंची ९९ फूट आहे.

सफदरजंगाच्या कबरीपासून कांहीं अंतरावर एक रस्ता फुटतो. तेथें हौज-इ-खास नांवाचें एक ठिकाण आहे. तेथें पूर्वी सुलतान अल्लाउद्दीन खिलजीच्या वेळचा एक प्राचीन तलाव होता. तेथें फिरोजशाहा तघलख ह्यानें इ. स. १३५४ मध्यें एक वियामंदिर बांधिलें होतें; त्यावर युसफ बिन फजल हुसेनी नामक एका विद्वान् गृहस्थास अध्यापक नेमिलें होतें. त्याची कबर अद्यापि तेथें आहे. त्यापासून जवळच फिरोजशाहाची कबर आहे. हा बादशाहा इ. स. १३८८ सालीं मृत्यु पावला. त्यावरून ही कबर त्यानंतर बांधलेली आहे हें उघड आहे.

## जयसिंगराजाची वेधशाळा.

सफदरजंगाच्या कबरीपासून पांच मैलांवर कुतुबमिनार ही इमारत आहे. येथून दिल्लीच्या अजमीरगेटाकडे दुसरा रस्ता जातो. त्याच्या दरम्यान जयपूरचा राजा जयसिंग ह्याची वेधशाळा आहे. ही प्रेक्षणीय असून त्या विद्वान् व ज्योतिषशास्त्रज्ञ राजाचें तें एक उत्तम स्मारकच आहे. सवाई जयसिंग राजा हा हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक अद्वितीय रत्न होतें. हा राजा राजकारणामध्यें रणांगणांत आणि पंडितसभेमध्यें सारखाच चमकत असे. सांप्रतचें जयपूर शहरही ह्याच राजानें बांधिलें व तेथें आपली राजधानी केली. दिल्लीच्या दरबारांत ह्या राजाचें चांगलें वर्चस्व असून मराठ्यांस चौथ सरदेशमुखीच्या सनदा देण्यास व त्यांचें कल्याण करण्यास हाच राजा कारणीभूत झाला. थोरले बाजीराव पेशव्यांस माळव्याची सुभेदारी ह्याच पुरुषानें मिळवून दिली. ह्यानें ज्योतिषशास्त्राचें चांगलेंच अध्ययन केलें असून तत्प्रीत्यर्थ त्यानें दिल्ली, उज्जनी, काशी वगैरे ठिकाणीं वेधशाळा बांधिल्या आहेत. ह्याचे ' कल्पद्रुम ' वगैरे कांहीं ग्रंथही प्रसिद्ध आहेत.

अशा ह्या बहुगुणसंपन्न राजाची ही वेधशाळा पाहून प्रत्येक प्रेक्षकास आनंद वाटल्यावांचून राहत नाहीं.

दिल्लीची वेधशाळा अद्यापि कायम असून तिचें खरें नांव ' सम्राट्यंत्र ' असें आहे. परंतु इतकें अवघड नांव उच्चारण्यास कठीण पडतें, म्हणून सांप्रत प्रचारामध्यें तिचें नांव ' जंतर मंतर ' असें पडलें आहे. ही वेधशाळा इ. सन १७२४ मध्यें बांधण्यांत आली. यहांचे वेध घेण्याकरितां जें शंकुयंत्र तयार केलें आहे, तें जिन्याप्रमाणें असून त्याचा कर्ण ११८ फूट ५ इंच आहे. त्याचा पाया १०४ फूट आहे आणि लंब ५६ फूट ७ इंच आहे. परंतु ही इमारत आतां पुष्कळ नाश पावली आहे. ह्या इमारतीशेजारीं एक छायायंत्र केलें आहे. ही इमारत रोमन लोकांच्या नाटकगृहाप्रमाणें वर्तुलाकार असून तिच्या मध्यभागीं एक जिना आहे, तो अगदीं गच्चीपर्यंत गेला आहे. सभोंवतीं क्षितिजापासून एक विंदूंत येणाऱ्या अर्धवर्तुलाकार कमानी केल्या असून, त्या वेधशाळेच्या याम्योत्तररेषेमध्यें विवक्षित अंतरावर असून बाजूच्या याम्योत्तर रेषा दाखवितात. ह्या इमारतीमध्यें ज्योतिषशास्त्रज्ञास वेध घेण्यास जेवढीं कांहीं शास्त्रीय साधनें जरूर आहेत, तेवढ्यांची उत्तम प्रकारची योजना केलेली असून तेथें त्रिकोण व त्याचे अंश उत्तम प्रकारें मांडिले आहेत. त्यांवरून दिवसाचें कालमापन बरोबर होऊन, त्याच्यायोगानें घटिका व पळें ह्यांचाही बोध होईल अशी योजना केलेली आहे. अशा प्रकारचीं छायायंत्रें जवळ जवळ दोन असून एकामध्यें केलेलें मापन दुसऱ्यामध्यें पडताळून पाहण्याचा विचार असावा असें दिसतें. ह्या वेधशाळेवरून तिच्या कल्पकाची विशालबुद्धि व ज्योतिषशास्त्रपारंगतता व्यक्त होते. ह्या वेधशाळेचा उपयोग करणारा जयसिंगराजासारखा दुसरा मनुष्य पुढें कोणी न निघाल्यामुळें तिची फार अनास्था झाली आहे. तथापि जे जे विद्वान् प्रेक्षक दिल्लीस जातात व ह्या छायायंत्राचें व वेधशाळेचें दर्शन घेतात, ते राजा सवाई जयसिंग ह्याची तारीफ केल्यावांचून राहत नाहींत. सांप्रत ही इमारत व ह्याशेजारचें माधवगंज नामक गांव हीं सवाई जयसिंगाचे वंशज व सांप्रतचे जयपूर संस्थानचे अधिपति महाराजाधिराज सर सवाई माधवसिंग ह्यांच्याच अंमलांत आहेत. ते आपल्या पूर्वजाचें अत्युत्तम स्मारक म्हणून ह्या स्थलाची चांगली निगा ठेवतील अशी उमेद आहे. असल्या पूर्वजांच्या कृतींचें नुसतें संरक्षण करणें हें देखील एक प्रकारचें महापुण्य आहे.

---

# भाग ६ वा.

## हिंदु राजांचीं प्राचीन स्मारकें.

---

### लोहस्तंभ.

कुतुबमिनार पाहण्याकरितां गेलें म्हणजे तेथील विस्तीर्ण भूप्रदेशावर अनेक जुने व जीर्ण झालेले किल्ले, कोट व इमारती दिसूं लागतात. ह्या सर्व प्राचीन असून दिल्ली येथें हिंदुराजांची स्वतंत्र राज्यसत्ता व राज्यवैभव वास करीत होतीं, त्या कालाचीं स्मारकचिन्हें आहेत. येथें विक्रम राजानें इ. स. ७८ व्या वर्षी जिंकून घेतलेल्या शक राजांची प्रचंड राजधानी होती, ह्यांत शंकाच नाहीं. येथील लोहस्तंभावरून इ. स. ३१९ सालीं गुप्त राजांची ही राजधानी असावी असें दिसून येतें. परंतु त्यानंतर आठव्या शतकाच्या मध्यापर्यंत म्हणजे तुंवरवंशीय अनंगपाळ राजापर्यंत दिल्ली येथें राजधानी होती किंवा नाहीं, हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कनिंगह्यामसाहेबांच्या लेखावरून असें दिसून येतें कीं, अनंगपाळ राजा अवतीर्ण होईपर्यंत ही राजधानी उध्वस्त होऊन नामशेष झाली होती. ती अनंगपाळराजानें पुनः वसविली असें दिसतें. जुन्या ऐतिहासिक माहितीवरून इतकें सिद्ध होतें कीं, तुंवर राजांचें राज्य दिल्ली येथें बरींच वर्षे असून त्यांची सत्ता हिमालयापासून विंध्य पर्वतापर्यंत गाजत होती. सांप्रत कुतुबमिनार व त्या सभोंवतींचा जो प्रदेश आहे तेथेंच ह्या राजांची नगरी होती. ह्यांनीं जी नगरी वसविली व नंतर चव्हाण वंशांतील राजांनीं तींत ज्या सुधारणा केल्या त्यांचें संपूर्ण स्वरूप आजमितीस दृष्टीस पडत नाहीं. परंतु त्यांच्या कारकीर्दीतील कांहीं स्मारकें अद्यापि दृष्टीस पडतात. त्यांचें संक्षिप्त वर्णन येथें देतों.

हा लोहस्तंभ हिंदुस्थानांतील एक अश्रुतपूर्व व लोकोत्तर गोष्टींपैकीं एक आहे. आजपर्यंत हिंदुस्थानामध्यें पितळेच्या प्रचंड मूर्ति व पंचरसी पुतळे लहान मोठे पुष्कळ झाले होते. परंतु नुसत्या लोहरसाचा एवढा प्रचंड स्तंभ

कोणीं तयार केला नव्हता. सांप्रतच्या शास्त्रीय सुधारणेच्या अगदीं शिख-रास पोहोंचलेल्या युगामध्यें अशीं अद्भुत कृत्यें सहज होतील. परंतु इतक्या प्राचीनकाळीं देखील हिंदुस्थानामध्यें अशीं लोकोत्तर कृत्यें झालीं आहेत हेंच आश्चर्य आहे. हा स्तंभ अखंड असून सर्व लोहरसाचा आहे. ह्याची एकंदर उंची २५ फूट असून तो जमिनीपासून २२ फूट उंच आहे. पूर्वी हा जमिनीमध्यें पुष्कळ खोल पुरलेला आहे असा समज होता. परंतु इ. स. १८७२ सालीं पुराणवस्तुसंशोधकांनीं त्याच्या खोलीचें बारीक दृष्टीनें निरीक्षण करून ती अवघी तीन फूट आहे असें ठरविलें आहे. त्यांचें मत असें आहे कीं, जमिनीमध्यें वृक्षांचीं मुळें ज्याप्रमाणें खोल जाऊन त्या वृक्षाच्या बुंध्यास बळकटी आणितात, त्याप्रमाणें ह्या स्तंभाच्या खालील बाजूस लोखंडी कांबीच्या कैच्या देऊन तो पक्का केला आहे. ह्या स्तंभाचा व्यास १६ इंच आहे. ह्या स्तंभाचें वजन १७॥ टन म्हणजे सुमारें ७० खंडींच्या वर असावें, असा अजमास कांहीं शोधकांनीं बसविला आहे. हा स्तंभ शुद्ध लोहाचा असून त्याचें विशिष्टगुरुत्व ७.६६ हें आहे.

ह्या स्तंभाचा मध्यभाग गुळगुळीत असून त्यावर संस्कृत भाषेमध्यें पुढील लेख कोरलेला आहेः—

यस्योद्वर्तयतः प्रतीपमुरसा शत्रून्समेत्यागतान्
वंगेष्वाहववर्तिनोऽभिलिखिता खड्गेन कीर्तिर्भुजे ।
तीर्त्वा सप्तमुखानि येन समरे सिंधोर्जिता वाल्हिका
यस्याद्याप्यधिवास्यते जलनिधिर्वीर्यानिलैर्दक्षिणः ॥ १ ॥
खिन्नस्येव विसृज्य गां नरपतेर्गामाश्रितस्येतराम्
मूर्त्या कर्मजितावनिं गतवतः कीर्त्या स्थितस्य क्षितौ ।
शान्तस्येव महावने हुतभुजो यस्य प्रतापो महान्
अद्याप्युत्सृजति प्रणाशितरिपोर्यत्नस्य शेषः क्षितिम् ॥ २ ॥
प्राप्तेन स्वभुजार्जितं च सुचिरं चैकाधिराज्यं क्षितौ
चंद्राह्वेन समग्रचंद्रसदृशीं वक्त्रश्रियं बिभ्रता ।
तेनायं प्रणिधाय भूमिपतिना भावेन विष्णौ मतिं
प्रांशुर्विष्णुपदे गिरौ भगवतो विष्णोर्ध्वजः स्थापितः ॥ ३ ॥

हे तीन श्लोक, दर ओळींत दोन चरणांप्रमाणें, सहा ओळींत खोदलेले आहेत. या वर दिलेल्या श्लोकांचा तात्पर्यार्थ असा आहे कीं, “ हा स्तंभ

म्हणजे वंग देशांत जूट करून अंगावर आलेल्या शत्रूंची सेना उडवून, ज्यानें खड्गानें कीर्ति लिहून ठेविली, अशा चंद्र नांवाच्या राजाचा भुजच आहे. त्या राजानें सिंधुनदीचीं सप्तमुखें उतरून बाल्हिक लोकांस जिंकिलें; दक्षिणसागर तर त्याच्या प्रतापवायूनें अद्यापिही सुवासित केलेला असा आहे. एखाद्या महारण्यांत भडकलेला प्रचंड वणवा बहुतेक अरण्य खाक करून शांत झाला, तरी त्याचा अवशेष जसा राहतोच राहतो, त्याप्रमाणें रिपूंच्या खटपटींचा नायनाट करून हा राजा खिन्नतेनें ही पृथ्वी सोडून मूर्तीनें मात्र स्वपुण्यार्जित अशा लोकास गेला, तरी कीर्तीनें तो आज येथें आहेच; आपल्या भुजांच्या पराक्रमानें मिळविलेलें चक्रवर्तित्व ज्यानें चिरकाल उपभोगिलें; ज्याच्या मुखाची कांति पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें आहे, त्या चंद्रराजानें भगवान् विष्णूच्या ठिकाणीं भावपुरस्सर चित्त ठेवून विष्णुपद नांवाच्या गिरीवर हा भगवान् विष्णूचा उच्च ध्वज स्थापित केला आहे. "

हा चंद्रराजा कोण व केव्हां झाला, याबद्दल अद्यापि निर्णय झालेला नाहीं. ह्या श्लोकांपैकीं शेवटच्या श्लोकांतील तिसऱ्या चरणामध्यें ' धावेन ' असा शब्द आहे, त्याच्या अर्थासंबंधानें मतभेद आहे. ' धावेन ' म्हणजे 'धाव' नामक राजानें असा अर्थ कित्येकांनीं केला आहे; व कित्येकांच्या मतें ' धावेन ' ह्या शब्दाऐवजीं ' भावेन ' असा पाठभेद केला, तर भक्तीनें असा अर्थ होतो. तेव्हां राजाच्या नांवाचा निर्णय अद्यापि संशयितच आहे असें म्हणणें भाग पडतें.

ह्या लोहस्तंभासंबंधाची एक दंतकथा पहिल्या भागामध्यें दिलीच आहे. त्याप्रमाणें आणखी एक दंतकथा आहे. ही दंतकथा शहाजहान बादशाहाच्या पदरच्या कोणी खड्गराय नामक कवीनें लिहिली आहे. तिचा सारांश असा आहे कीं, तोमर राजाला व्यास नामक ऋषीनें किंवा ब्राह्मणानें २५ बोटें लांबीची एक सोन्याची सळई दिली; व ती सुमुहूर्तावर जमिनीमध्यें ठोकण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें संवत् ७९२ (इ. स. ७३६ ) सालीं वैशाख वद्य १३ ला चंद्र अभिजित् नक्षत्रावर असतांना, ती सळई जमिनींत पुरली. तेव्हां व्यासांनीं त्यास आशीर्वाद दिला कीं,

तुमसे राज कभी जायगा नहीं ।
यह खुंटी वासुकीके माथे गाडी है ॥ १ ॥

परंतु राजानें ह्या व्यासवचनाचा अनुभव पाहण्याकरितां ती सळई हल-वून पाहिली, तों त्या सळईतून रक्ताची धार निघाली !

बील्हण देवने खुंटी उखाड देखो ।
तब लोहके चुचाटी निकली ॥ १ ॥

असा प्रकार घडतांच, राजा भयभीत होऊन त्यानें पुन्हां ब्राह्मणास निमंत्रण केलें व झालेली सर्व हकीकत श्रुत केली. तेव्हां त्यानें पुन्हां ती सळई जमिनींत ठोकण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ती पुरण्याचा राजानें यत्न केला. परंतु ती १९ बोटांपेक्षां अधिक आंत जाईना. तेव्हां त्या ब्राह्मणानें सांगितलें, " राजा, आतां तुझें राज्य फार दिवस टिकणार नाहीं. तें आतां ह्या सळईप्रमाणें ढिलें झालें. तें अवघें १९ वर्षे टिकेल. नंतर चव्हाण राजे येतील व नंतर तुर्क लोक राज्य करतील. " हें ब्राह्मणाचें भाषण ऐकून राजास संताप आला, व त्यानें त्या ब्राह्मणास निरोप दिला. ह्या खड्गराय-कृत पद्याच्या शेवटीं

कहे व्यास जगजोती । आगमु आगमु हो जाने ॥
तुमार, तै चौव्हान होय । पुनी पुनी तुर्कन ॥ १ ॥

असा मजकूर आहे, त्यावरून हा व्यास नामक कोणी ब्राह्मण असावा असें दिसून येतें. असो. अशा प्रकारच्या दंतकथा ऐकून लोहस्तंभ पाह-णारास क्षणभर फार मौज वाटते.

## लालकोट व रायपिठोरा.

अनंगपाळ राजाच्या नांवानें प्रसिद्ध असलेला लोहस्तंभ पाहून प्रेक्षक-जन आश्चर्यचकित होतात, तोंच त्यांस चव्हाण राजाच्या वेळचे ' लाल-कोट ' व ' रायपिठोरा ' हे मोडकळीस आलेले, परंतु चव्हाण राज्यसत्तेचें स्मरण राखणारे प्राचीन किल्ले दिसूं लागतात. ते पाहून कालाच्या अतर्क्य लीलेची वाचकांस चांगली कल्पना होते. ह्या किल्ल्यांमध्यें आतां लोक-वस्ती नसल्यामुळें ते अगदीं निर्जर व उदास असे दिसतात. ह्यांपैकीं लाल-कोट हा किल्ला पृथ्वीराज ह्यानें बांधिला आहे. ह्या कोटाच्या एका कोंप-ऱ्यावरून रायपिठोरा ह्या किल्ल्याच्या भिंती स्पष्ट दिसतात. लालकोट हा पृथ्वीराजाच्या राजधानीचा कोट असून त्याच्या बळकटीकरितां पुनः हा

दुसरा किल्ला बांधिला होता. लालकोट व रायपिठोरा ह्या दोहोंचा विस्तार शहाजहानाबाद ( नवीन दिल्ली ) शहराच्या जवळ जवळ निम्मे अधिक होता. लालकोटाचा परिघ २॥ मैल आहे व त्याच्या भिंती उंच व भरभक्कम आहेत. त्याचा तट ३० फूट उंच असून भिंतीची उंची कमींत कमी ६० फूट होती. ह्या किल्ल्याचा निम्मा भाग अद्यापि शाबूत असून तेथील खंदक व माऱ्याच्या जागा चांगल्या दृष्टीस पडतात. त्याचे बुरूज वगैरे बहुतेक नाहींसे झाले आहेत; तथापि कांहींच्या खाणाखुणा चांगल्या स्पष्ट दिसतात. पश्चिमेच्या बाजूचे तीन दरवाजे तर स्पष्ट ओळखतां येऊन त्यांची रुंदी १७ फूट असावी असें अनुमान करितां येतें.

रायपिठोरा हा किल्ला मुसलमानांच्या पहिल्या स्वारीनंतर पृथ्वीराजानें बांधिला असें ह्मणतात. ह्या किल्ल्याचा परिघ ४॥ मैल होता. परंतु हें काम जरा घाईनें झालें असल्यामुळें तें जितकें मजबूत व्हावयास पाहिजे तितकें झालें नाहीं. तथापि हा किल्ला प्रचंड असून त्यास दहा दरवाजे होते असें म्हणतात. ह्यांपैकीं आठ दरवाज्यांचा सध्यां मागमूस लागतो. ह्या किल्ल्यांमध्यें हिंदूंचीं व बुद्धांचीं मिळून सत्तावीस देवालयें होतीं. त्यांचे सहस्रशः खांब व कळस हिंदुधर्माचा द्वेष करणाऱ्या यवन बादशाहांनीं छिन्नविच्छिन्न करून त्यांचें दीन स्वरूप मात्र आतां कायम ठेविलें आहे.

दिल्लीच्या लालकोटासंबंधानें एके ठिकाणीं ' संवत् १११७ दिल्हीका कोट कहाया. लालकोट कहाया ' असा लेख आहे, त्यावरून हा कोट इ. स. १०६० सालीं बांधिला असें सिद्ध होतें. त्यानंतर रायपिठोरा हा किल्ला बांधण्यांत आला. राजा पृथ्वीराज प्राचीन हिंदु राजमालिकेंत अग्रणी असून त्याचें पराक्रमवर्णन भाट लोकांनीं सविस्तर गाइलें आहे. त्यांमध्यें चांद नामक रजपूत भाटाचा ' पृथ्वीराज रासा ' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

# भाग ७ वा.

## कुतुबमिनार.

हिंदुस्थानामध्यें ज्या लोकोत्तर व चमत्कृतिप्रचुर अशा इमारती आहेत, त्यांमध्यें कुतुबमिनार ही एक आहे. ही गगनचुंबित अत्युन्नत इमारत दिल्लीपासून ११ मैलांवर आहे. ह्या इमारतीस भूकंप व विद्युदाघात ह्यांच्या योगानें थोडासा धक्का पोहोंचला आहे, तथापि ती त्या आघातांतूनही सुरक्षित राहून आजमितीस आपल्या अपूर्वत्वानें सर्व जगास थक्क करीत आहे. पारिस येथें 'एफेल टॉवर' नामक जो प्रचंड लोखंडी मनोरा पारिस-प्रदर्शनाचे वेळीं नुकताच तयार करण्यांत आला आहे, तो सोडून दिला तर सर्व जगामध्यें इतका उंच मनोरा दुसरा कोणताही नाहीं. ही इमारत जमिनीपासून २३८ फूट व १ इंच उंच आहे. तिच्या पायाचा व्यास ४७ फूट २ इंच आहे आणि अगदीं शिरोभागाचा व्यास ९ फूट आहे. ह्या मनोऱ्याचा अगदीं तळमजला दोन फूट उंचीच्या जोत्यावर असून, मधली इमारत २३४ फूट १ इंच आणि शेवटचा घुमटाचा पाया २ फूट उंच, मिळून एकंदर वर लिहिलेली उंची येते. हा मनोरा पूर्वीं ३०० फूट उंच असून त्यावर एकंदर सात मजले होते असें म्हणतात. परंतु सांप्रत त्याच्या अगदीं शेवटच्या मजल्यासह एकंदर फक्त पांच मजले आहेत.

'कुतुबमिनार' ही इमारत मुसलमान बादशाहांनीं बांधली, परंतु तिचें अवाढव्य काम मुसलमान कारागिरांनीं केलें किंवा हिंदु कारागिरांनीं केलें, हा मोठा प्रश्न आहे. गिझनीच्या महंमदानें जसें मथुरेच्या राजवाड्यांचें सामान किंवा सोमनाथाच्या देवालयाचे दरवाजे नेऊन गिझनी येथील आपला राजवाडा सुशोभित केला, त्याप्रमाणें ह्या मिनारचें पुष्कळ नक्षी-काम हिंदूंच्या देवालयांचें असण्याचाही फार संभव आहे. ही गोष्ट खरी असेल तर ह्या इमारतीच्या शिल्पपाटवाचें बरेंच श्रेय हिंदु कारागिरांसही द्यावें लागेल. कलकत्त्याचे प्रसिद्ध प्राक्कालीन वस्तुसंशोधक पंडित डॉ० राजेंद्रलाल मित्र ह्यांनीं ह्याबद्दल मागें वाद उपस्थित केला होता; व त्यांनीं ही लोकोत्तर इमारत हिंदु लोकांचे कलाकौशल्याचें स्मारक आहे असें

सिद्ध केलें होतें. ह्या मनोऱ्यावर कांहीं नागरी भाषेंत अक्षरें कोरलेलीं आहेत त्यांवरून ह्या इमारतीच्या रचनेंत हिंदु शिल्पकारांचा हात होता असें म्हणण्यास पुष्टि येते. ह्याबद्दलचा वादविवाद कांहीं असो, परंतु ही इमारत हिंदुस्थानास ललामभूत आहे ह्यांत शंका नाहीं.

कुतुबमिनार इ. स. १३२५ मध्यें पूर्ण झाली. ह्यावरून आज पावणे-सहाशें वर्षेपर्यंत ही इमारत दिल्लीच्या राजक्रांत्या व घडामोडी अवलोकन करीत आहे असें दिसून येतें. अशी ही इतिहासप्रसिद्ध कुतुबमिनार अवलोकन करून तिच्याविषयीं कोणास अभिमान व पूज्यबुद्धि वाटणार नाहीं बरें ?

कुतुबमिनार ह्या अत्युच्च मनोऱ्यावर उभें राहून त्याच्या समंतात्भागीं दृष्टि फेंकली म्हणजे दहा कोस विस्ताराचें जें प्राचीन दिल्ली शहर होतें त्यांतील विध्वंस पावलेल्या सहस्रावधि इमारती दृष्टीस पडतात. त्या पाहिल्या म्हणजे असें वाटतें कीं, ही कुतुबमिनार त्या सर्वांमध्यें आपण श्रेष्ठ आहों हें दाखविण्याकरितां मोठ्या ऐटीनें उभी राहिली आहे. तिची विशाळ रचना, तिचें सुंदर नक्षीकाम, तिचें भव्य स्वरूप आणि तिची प्रमाणशुद्ध उंची पाहून प्रेक्षकास आनंद व आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. सर्व जगांतील कबरींमध्यें ज्याप्रमाणें ताजमहाल सर्वश्रेष्ठ, त्याप्रमाणें सर्व मनोऱ्यांमध्यें कुतुबमिनार ही सर्वश्रेष्ठ होय. ज्याप्रमाणें ताजमहालाचें अप्रतिम सौंदर्य पाहून रसिक प्रेक्षकाचें अंतःकरण हर्षभरित होतें व तो आश्चर्यानें गोंधळून जाऊन त्यास ' ताजमहाल हृदयांत ठेवावा, किंवा हृदयच ताजमहालांत ठेवावें ' हें जसें समजेनासें होतें, त्याप्रमाणें येथेंही प्रेक्षकांची स्थिति होते. कुतुबमिनार ही इमारत एकदां पाहिली म्हणजे तिचें विस्मरण कालत्रयींही होणार नाहीं. अर्थात् अशी ही इमारत सर्व जगामध्यें अपूर्वच होय. पारिस येथील ' एफेल टॉवर ' हा मनोरा लोखंडी असल्यामुळें तो सोडून दिला, तर आलेक्झांड्रिया येथील पांपीचा जयस्तंभ, केरो येथील हुमनच्या मशिदीचा मनोरा, किंवा सेंटपिटर्सबर्ग येथील ' आलेक्झांड्राइन कालम ' ह्या सर्व अत्युच्च इमारतींना कुतुबमिनारपुढें आपलें मस्तक नम्र करणें भाग आहे.

हा मनोरा इतका जरी उंच आहे तरी त्याच्या आंतील जिना फार चांगला आहे. पांच मजल्यांपर्यंत मिळून त्यास एकंदर ३७६ पायऱ्या

आहेत. आंतील बाजूस हवा व उजेड ह्यांची सोय चांगली असल्यामुळें व प्रत्येक मजल्यावर वेगवेगळी ग्यालरी असल्यामुळें प्रेक्षकांस जागोजाग विश्रांति घेण्याची सोय आहे. प्रत्येक मजल्यावरील ग्यालरीच्या योगानें ह्या इमारतीच्या सभोंवतीं जागोजाग कंबरबंद बांधले आहेत असें वाटतें. त्यामुळें इमारतीस अप्रतिम शोभा आली आहे. ह्याशिवाय ह्या इमारतीवर अनेक शिलालेख असून त्यांमध्यें कुराणांतील वाक्यें व परमेश्वराची नाममालिका लिहिलेली आहे. ह्यायोगानें ह्या इमारत बांधणारांचें ईश्वरावलंबन चांगलें व्यक्त होत.

## कुतुबुद्दीन ह्याची मशीद.

कुतुबमिनारजवळ कुतुबुद्दीन बादशाहानें बांधलेली एक प्राचीन मशीद आहे. ही मशीद मुसलमानी धर्माचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्याचें अगदीं पहिलें स्मारक आहे. ही मशीद व त्या सभोंवतालच्या इमारती कुतुबुद्दीन, शमसुद्दीन, अल्तमश, अल्लाउद्दीन खिलजी ह्या तीन पुरुषांच्या कारकीर्दींत बांधल्या गेल्या आहेत. कुतुबुद्दीनाच्या मशिदीचें नांव 'कुवत-उल्-इस्लाम' म्हणजे मुसलमानी धर्माची शक्ति असें आहे. ह्या मशिदीची लांबी १५० फूट असून रुंदी ७५ फूट आहे. हिचे पूर्व आणि उत्तर बाजूचे दरवाजे अद्यापि कायम असून त्यांतील शिलालेख स्पष्ट दिसतात. ही इमारत हिंदूंचीं देवालयें व जैन लोकांचीं मंदिरें मोडून त्यांच्याच साहित्यानें बांधली आहे. त्यामुळें तिच्या प्रत्येक खांबावर जें नक्षीकाम आहे तें हिंदूंचें आहे हें स्पष्ट दिसतें. ह्या खांबांवरील वेलपत्ती, पुष्पमाला आणि नानाप्रकारच्या सुंदर आकृती पाहण्यासारख्या आहेत. विशेषेंकरून ह्या मशिदीच्या उत्तर-बाजूच्या दालनामध्यें फारच नामी नक्षी केलेली आहे. ह्या सर्व हिंदु-शिल्पकामाचें सांप्रतचें स्वरूप पाहून मनांत खेद उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. ह्या सर्व इमारतीकडे पाहिलें म्हणजे हिच्यांतील सर्व खांब व इतर कोरलेले दगड, जे पूर्वीं हिंदु देवालयांत रामकृष्णाचें भजनपूजन पाहण्यांत आनंदानें वास करीत होते. त्यांस येथें जुलमानें आणून यवनी-धर्माची दीक्षा दिल्यामुळें ते शोक करीत आहेत असा भास होतो. हिंदूंच्या व जैनांच्या मूर्ति ह्या इमारतीमध्यें दिसूं नयेत ह्मणून त्यांवर चुन्याचा बेमालूम मुलामा करून त्यांचें स्वरूप अजीबात बदलून टाकिलें होतें.

परंतु कालगतीनें तें पटल जीर्ण होऊन त्या अदृश्य मूर्ति आतां हळू हळू दिसावयास लागल्या आहेत. हिंदूंच्या मूर्तीवर आलेलीं हीं पटलें कालांतरानें आपोआप नष्ट होऊन त्यांचें पूर्वींचें सुंदर स्वरूप व्यक्त झालें, ही लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. कारण, आमच्या हिंदु धर्माच्या अंगींच असा विलक्षण गुण आहे कीं, त्यावर कितीही संकटें आलीं किंवा परधर्माचीं पटलें बसलीं, तरी त्याचें मूळचें सोज्वल स्वरूप कधींही नष्ट व्हावयाचें नाहीं. असा अद्वितीय गुण आमच्या धर्माच्या अंगीं होता, म्हणूनच तो मुसलमानांच्या धर्मवेडासही पुरून उरला, ह्यांत कांहीं शंका नाहीं. असो. ह्या मशिदीमध्यें एके ठिकाणीं कृष्णजन्माचें चित्र आहे व एक सवत्स धेनूचें चित्र आहे, तें प्रेक्षकांनीं अवश्य पहाण्यासारखें आहे.

ह्या मशिदीविषयीं मुसलमानांची पूर्वीपासून पूज्यबुद्धि असून पुष्कळ मुसलमान इतिहासकारांनीं व प्रवाशांनीं हिचें वर्णन केलेलें आहे; व त्यांत त्यांनीं येथें पूर्वीं हिंदु देवालय होतें असें स्पष्टपणें कबूल केलें आहे. इब्नबतुटा ह्या प्रवाशानें हिच्याबद्दल असें लिहिलें आहे कीं, "ही मशीद अतिशय मोठी असून तिचें सौंदर्य आणि विस्तार ह्यांत तिची बरोबरी करणारी एकही इमारत नाहीं. दिल्ली घेण्यापूर्वीं येथें हिंदूंचें देवालय होतें !" * खुशरू कवीनें ह्या मशिदीविषयीं असें वर्णन केलें आहे कीं,

"The mosque of it is the despository of the grace of god
The music of the prayer of it reaches to the sky."

असो. ह्या स्थळानजीक सुलतान शमसुद्दीन अल्तमश ह्याची कबर आहे. ती फार सुंदर असून तेथील प्राचीन हिंदु शिल्पकलेचें काम फारच प्रेक्षणीय आहे. ह्यासंबंधानें मि. फर्ग्युसन ह्यांनीं असें लिहिलें आहे कीं, "ही इमारत लहान आहे, तथापि हिंदु कारागिरांच्या कौशल्याचा हा अप्रतिम मासला असून जुन्या दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळांतही अग्रगण्य आहे." ह्या कबरीशिवाय येथें 'अलाई दरवाजा' नामक सुंदर दरवाजा आहे. ह्याचें नक्षीकाम प्रशंसनीय आहे. कुतुबमिनार, कुतुबुद्दीन मशीद, अल्तमशाची

---

* "Its mosque is very large, and in beauty and extent has no equal. Before the taking of Delhi it had been a Hindu temple."

कबर आणि अलाई दरवाजा हीं सर्व कामें पठाण राजांचीं असून त्यांच्या कौशल्याची तारीफ करण्यायोग्य आहेत. बिशप हीबर ह्या रसिक प्रवाशानें ह्या पठाण लोकांच्या इमारती पाहून असे उद्गार काढिले आहेत कीं, " ह्या पठाण राजांनीं राक्षसाप्रमाणें इमारती बांधल्या आहेत, आणि त्यांचें नक्षीकाम रत्नकाराप्रमाणें सुंदर केलें आहे " हें अक्षरशः येथें अनुभवास येतें.

वर वर्णन केलेल्या इमारतींशिवाय दिल्ली येथें फेरोजाबाद, तघलखाबाद, सिरी, बेगमपूर वगैरे अनेक प्राचीन व इतिहासप्रसिद्ध स्थानें आहेत. तेथेंही मशिदी व कबरी पुष्कळ आहेत. त्याचप्रमाणें इ. स. १८५७ च्या बंडामध्यें रणशौर्य गाजवून धारातीर्थीं पतन पावलेल्या आंग्लयोद्ध्यांचीं थडगीं व त्यांचे स्मारकस्तंभ वगैरे अर्वाचीन गोष्टीही पाहण्यायोग्य आहेत. त्या सर्वांचें वर्णन ह्या लहानशा पुस्तकांत देणें शक्य नाहीं. तथापि हीं सर्व स्थळें दिल्लीस जाणाऱ्या प्रेक्षकांच्या दर्शनास योग्य आहेत.

असो. दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ हें पुराणप्रसिद्ध आणि इतिहासप्रसिद्ध स्थल अवलोकन केलें म्हणजे कालचक्राची गति किती विचित्र आहे हें चांगलें दिसून येतें. जेथें हिंदु राजांचें स्वातंत्र्य व राज्यसत्ता नांदत होती, तेथें कालचक्राच्या गतीनें मुसलमानी राज्य झालें. मुसलमानांच्या राज्यसत्तेचा कळस होऊन त्यांचें वैभव अत्युच्च शिखरास पोहोंचल्यानंतर त्यास उतरती कळा लागली व तेथें मराठ्यांचा अंमल बसला. मराठ्यांच्या राष्ट्राचा व राज्यसत्तेचा अभ्युदय होऊन ती कळसास गेल्यानंतर तिलाही अवनति प्राप्त झाली, व तिचाही लवकरच नाश होऊन ब्रिटिश राज्यसत्ता संस्थापित झाली. ह्यावरून राष्ट्राच्या उदयास्ताचें चक्र रहाटगाडग्याप्रमाणें चाललें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ ह्या नगराचें ऐतिहासिकदृष्ट्या निरीक्षण केलें म्हणजे कविकुलगुरु कालिदास ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें:—

' नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण । '

किंवा एका प्राचीन आंग्ल कवीनें म्हटल्याप्रमाणें:—

" Empires and nations flourish and decay
By turns command and in their turns obey. "

ह्या सर्वमान्य सिद्धांताचा अनुभव आल्यावांचून राहत नाहीं. असो; ह्या कालचक्राच्या फेऱ्यामध्यें आमचें राष्ट्र सांपडलें असतां, सुदैवानें त्यावर स्वातंत्र्यप्रिय व सुधारणेच्या शिखरास पोंहोचलेल्या राष्ट्राचा व आमचा संसर्ग झाला व त्याचें रूपाछत्र दिल्लीसारख्या शहरावर उभारलें गेलें, हें आमचें महाभाग्य होय.

असो. दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ हें इतिहासप्रसिद्ध शहर इ. स. १८५७ पासून इंग्रजसरकारच्या ताब्यांत आलें आहे; व त्यांनीं ह्या शहराचें पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व ध्यानांत घेऊन त्याजविषयीं आपली पूज्यबुद्धि वारंवार प्रदर्शित केली आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत दिल्ली हें सार्वभौम सत्ता उपभोगिलेलें शहर असल्यामुळें इंग्रज सरकारांनींही त्याचा मान पूर्ववत् चालविला आहे. माजी महाराणी व्हिक्टोरिया ह्यांनीं 'केसर-इ-हिंद' म्हणजे 'हिंदुस्थानची बादशाहीण' असा किताब धारण केला त्या वेळीं लॉर्ड लिटन ह्यांनीं ह्याच पवित्र ठिकाणीं दरबारसमारंभ केला होता. त्याचप्रमाणें हिंदुस्थानचे नवीन बादशाहा राजाधिराज सातवे एडवर्ड बादशाहा ह्यांच्या राज्यारोहणानिमित्त झालेला अपूर्व महोत्सव लॉर्ड कर्झन ह्यांच्या हस्तें ह्याच इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं झाला होता. असे समारंभ निर्विघ्नपणें सिद्धीस जाऊन, दिल्ली येथें राज्यारूढ होणारे बादशाहा दीर्घायु होऊन हिंदुस्थानाविषयीं अहर्निश प्रेम ठेवोत, आणि अकबरासारख्या दिल्लीपतींनीं जशी प्रजाकल्याणतत्पर म्हणून कीर्ति मिळविली, तशी ते सत्कीर्ति मिळवोत, एवढी परमेश्वराजवळ अनन्यभावें प्रार्थना करून हें संक्षिप्त स्थलवर्णन येथें समाप्त करितों.

समाप्त.



# आर्यभूषण पुस्तकालय.

किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें.

आर्यभूषण प्राकृत धर्मग्रंथमाला.

## बारा धार्मिक ग्रंथ.

टाईप सुवाच्य, कागद जाड, व प्रवासांत वापरणेस सोईस्कर.

| | किं० रु० |
|---|---|
| श्रीएकनाथी भागवत रेशमी | २ |
| ,, ,, सुटी | १॥ |
| श्रीगुरुचरित्र मोठें ... | १ |
| श्रीरामविजय ... ... | ·॥|· |
| श्रीसंतलीलामृत ... | ·॥· |
| श्रीहरिविजय मोठा ... | १ |
| श्रीमद्भगवद्गीता मूळ कागदी | ८– |
| ,, रेशमी | ८= |
| श्रीगुरुचरित्र सुटें ... | ·|= |
| ,, रेशमी ... | ·॥· |
| श्रीभक्तिविजय ... ... | ·॥|· |
| श्रीरुक्मिणी स्वयंवर रेशमी | ·॥· |
| ,, ,, सुटी | ८≡ |
| श्रीदासबोध ... ... | ·॥· |
| श्रीदासबोध कापडी ... | ·॥= |
| ,, रेशमी ... | ·॥|· |
| श्रीहरिविजय ... ... | ·॥= |
| श्रीशिवलीलामृत रेशमी ... | ·|· |
| ,, सुटी ... | ८= |
| श्रीजेमिनीअश्वमेध ... | १ |
| श्रीपांडवप्रताप ... .... | १ |

## वधूवर-पत्रिका-संमेलन

व

कोंकणस्थ आणि कऱ्हाडे यांची

## गोत्रावळी.

किं. ८४. टं. ख. ८॥.

## आर्यभूषण पुस्तकालय–किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें.

### शास्त्रीय ग्रंथ.

| | किंमत रु. आ. पै. |
|---|---|
| सार्थ वाग्भट संस्कृत मूळ व मराठी भाषांतर डॉ. गणेश कृष्ण गर्देकृत ... ... ... ... ... ... ... | १०–०–० |
| भारतीय ज्योतिःशास्त्र अथवा भारतीय ज्योतिषाचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास. प्रसिद्ध ज्योतिषशास्त्री व प्राचीन विद्याविशारद कै० शंकर बाळकृष्ण दीक्षितकृत ... ... ... ... | ३–४–० |
| स्वातंत्र्य—प्रसिद्ध तत्त्ववेत्ते ' जॉन स्टुअर्ट मिल ' यांच्या 'लिबर्टी' नामक ग्रंथाचें भाषांतर. रा. रा. नारायण लक्ष्मण फडके, बी. ए., यांनीं केलेलें ... ... ... ... ... ... ... | १–८–० |
| सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पराक्रम अथवा पेशवाईतील धामधुमीचा देखावा ... ... ... ... ... | ०–१२–० |
| गीतापद्यमुक्ताहार ( श्रीमद्भगवद्गीतेचें पद्यात्मक प्राकृत भाषांतर ) | २—०–० |

### प्रवास व स्थलवर्णनें.

| | |
|---|---|
| दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ ... ... ... ... — ... | ०—६–० |
| विलायतचा प्रवास भाग १ ला ... ... ... ... | ०–१२–० |
| ,, ,, भाग २ रा ... ... ... ... | १—०–० |
| भिऊपुरी वैजनाथ ( वर्णनात्मक ) ... ... ... ... | ०—२–६ |

### नाटकें, प्रहसनें व कादंबऱ्या.

| | |
|---|---|
| गद्यपद्यात्मक शाकुंतल नाटक ... ... ... ... ... | ०–१०–० |
| संगीत शाकुंतल नाटक ... ... ... ... ... | ०–१२–० |
| संगीत सौभद्र नाटक ... ... ... ... ... | ०–१२–० |
| विक्षिप्तराव नाटक ... ... ... ... ... | ०—४–० |
| अविचाराचा परिणाम अथवा मुंजराजाचा शोचनीय मृत्यु ... | १—०–० |
| दुर्गानाटक अथवा एक दिवसाची चुकमूक ... ... ... | ०—५–० |

### शालोपयोगी पुस्तकें.

| | |
|---|---|
| तंत्रद्वय ( चार व पांच तंत्रें एकत्र ) ... ... ... ... | ०—३–० |
| पंचतंत्र मूळ ( पांचही तंत्रें एकत्र ) ... ... ... ... | ०—९–० |
| हितोपदेश मूळ ... ... ... ... | ०––४–० |

म्यानेजर, आर्यभूषण प्रेस—किबेवाडा, बुधवार पेठ, पुणें.

# आर्यभूषण प्राकृत धर्मग्रंथमाला.

| | किंमत रु. | आ. |
|---|---|---|
| श्रीएकनाथी भागवत. रे. चा. ... ... | २ | ० |
| ,, ,, . सुटी. ... ... | १ | ८ |
| श्रीजैमिनीअश्वमेध. ... ... | १ | ० |
| श्रीगुरुचरित्र. मोठें अक्षर ... ... | १ | ० |
| श्रीहरिविजय. ,, ... ... | १ | ० |
| श्रीपांडवप्रताप. सोळा पेजी ... ... | १ | ० |
| श्रीभक्तिविजय. ,, ... ... | ० | १२ |
| श्रीरामविजय. ,, ... ... | ० | १२ |
| श्रीहरिविजय. ,, ... ... | ० | १० |
| श्रीदासबोध. ,, ... ... | ० | ८ |
| श्रीदासबोध. ३२ पेजी गुटका कापडी ... ... | ० | १० |
| ,, ,, रेशमी ... ... | ० | १२ |
| श्रीगुरुचरित्र. ३२ पेजी रेशमी ... ... | ० | ८ |
| ,, ,, कापडी ... ... | ० | ६ |
| श्रीसंतलीलामृत. ३२ पेजी सुटी ... ... | ० | ८ |
| श्रीशिवलीलामृत. रेशमी ... ... | ० | ४ |
| ,, सुटी ... ... | ० | ३ |
| श्रीरुक्मिणीस्वयंवर. रेशमी ... ... | ० | ४ |
| ,, ,, सुटी ... ... | ० | ३ |
| श्रीमद्भगवद्गीता मूळ. ३२ पेजी पुस्तक ... | ० | १ |
| ,, ,, रेशमी ... | ० | २ |

वरील किंमतीशिवाय ट. ख. निराळा पडेल.

मॅनेजर, आर्यभूषण प्रेस, पुणें.